CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | सोमवार, २५ मे २०२६ | वर्ष ४ थे अंक ७७ | पाने १२ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



हिंदू जात पात, पंथ, पूजा पद्धती कोणतीही असो. राष्ट्र म्हणून आपण सर्व हिंदू आहोत या सत्याच्या प्रस्थापनेसाठीच संघाचा जन्म झाला आहे.

**स्व. मधुभाई कुलकर्णी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# लवकरच व्यापार करार

## अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री रुबियो यांचा विश्वास ● इराणबाबत लवकरच चांगली बातमी

◆ **नवी दिल्ली, २४ मे**

भारत आणि अमेरिका यांच्यात दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या व्यापार कराराला लवकरच अंतिम स्वरूप मिळणार असून दोन्ही देशात व्यापार करार होईल, असे स्पष्ट प्रतिपादन अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रूबियो यांनी म्हटले आहे. तसेच येत्या काही दिवसांत इराणच्या मुद्यावर जगाला चांगली बातमी मिळू शकते, असे संकेतही त्यांनी दिले.

मार्को रुबियो सध्या भारताच्या दौऱ्यावर आहेत, हैदराबाद हाऊस येथे भारत अमेरिका द्विपक्षीय बैठकीनंतर भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्यासोबत संयुक्त पत्रपरिषदेला रुबियो संबोधित करत होते. रुबियो यांनी शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासोबतच्या व्यापारी संबंधांबाबत कोणतीही काल्पनिक भीती निर्माण केलेली नाही. उलट त्यांनी जागतिक व्यापार संतुलनातील त्रुटींकडे लक्ष वेधले आहे. भारत आणि अमेरिका हे दोन्ही देश येत्या काळात द्विपक्षीय व्यापार कराराला अंतिम रूप देण्याबाबत अत्यंत सकारात्मक आहेत, असा विश्वास रुबियो यांनी व्यक्त केला.

इराणबाबत बोलताना ते म्हणाले की, पुढील काही तासांत कदाचित जगाला एक चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. या संभाव्य करारामुळे जगाला इराणच्या अणू शस्त्रास्त्रांच्या भीतीपासून कायमची मुक्ती मिळेल, अशी आशा आहे.

ज्या मुद्यावर आम्ही भारतासोबत काम करत आहे, त्याची यादी आणि व्याप्ती भारत हा अमेरिकेचा सर्वात मोठा भागिदार असल्याचे दाखवतो.जगातील अमेरिकेच्या अशा मोजक्या मित्र देशात भारताचा समावेश आहे.



### ऊर्जा स्रोतांच्या विविधतेवर भर : एस. जयशंकर

यावेळी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी जागतिक ऊर्जा बाजारातील स्थिरतेला भारताचा पाठिंबा असल्याचे सांगितले. होर्मूझची सामुद्रधुनी परिसरातील वाढत्या तणावाचा विचार करता, भारत आपल्या देशांतर्गत गरजांसाठी ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण करणे सुरूच ठेवेल, असे जयशंकर यांनी स्पष्ट केले. ■

### व्हिसा नियमातील बदल सर्वांसाठी

व्हिसा नियमातील बदल भारताला डोळ्यासमोर ठेऊन नाही अमेरिकेने आपल्या व्हिसा नियमात केलेला मोठा बदल भारताला डोळ्यासमोर ठेऊन केलेला नाही. भारताला त्रास देण्यासाठी करण्यात आलेला हा बदल नाही, तर जागतिक भूमिकेतून केला आहे. आम्ही सध्या संक्रमणावस्थेतून जात आहे, कोणत्याही देशाच्या संक्रमणाकाळात असतात, तशा अडचणी यातही आहे. भारताला त्रास देण्यासाठी व्हिसा नियमात बदल आम्ही केला नाही, असे ते म्हणाले. ■

**पाकिस्तानसोबतचे संबंध मंत्रीच्या आड येणार नाहीत**

भारत आणि अमेरिकेतील संबंध अजिबात खालावलेले नाहीत. पाकिस्तान किंवा इतर कोणत्याही देशासोबतचे अमेरिकेचे असलेले संबंध भारतासोबतच्या मैत्रीच्या आड येणार नाहीत, असा पुनरुच्चार अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी केला आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*

# उघडणार 'तेल'मार्गाचे द्वार

## 'होर्मुझ'बाबत इराणने दाखवली तयारी

◆ **तेहरान, २४ मे**

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या वाहतुकीची स्थिती पुढील ३० दिवसांत पूर्वीप्रमाणे होईल, अशी घोषणा करीत इराणने तेलमार्गाचे द्वार लवकरच खुले होणार असल्याचे संकेत दिले. म्हणजेच युद्धापूर्वी होर्मुझमधून जितकी जहाजे जायची, तितकीच वाहतूक सुरू होईल. इराणचे हे वक्तव्य संपूर्ण जगाला दिलासा देणारे आहे.

होर्मुझ सामुद्रधुनी जगासाठी 'लाईफलाईन' आहे. युद्ध सुरू झाल्यापासून कित्येक देशांत इंधनाचे संकट उद्‌भवले आहेत तसेच अर्थव्यवस्थांवर अत्यंत नकारात्मक परिणाम झाला आहे. आता होर्मुझ महिनाभरात पूर्वीप्रमाणे होईल, असे सांगितले जात आहे. उपरोक्त वृत्त इराणच्या तसनीम वृत्तसंस्थेने दिले.

मागील काही महिन्यांपासून मध्यपूर्वेत मोठ्या प्रमाणावर तणाव वाढला आहे. इराण आणि इतर देशांमधील तणावांमुळे या मार्गाने जाणाऱ्या जहाजांची संख्या घटली. जहाजांचे मालक आणि तेल कंपन्यांमध्ये भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे कच्च्या तेलाचा पुरवठा मंदावला आहे आणि जगभरातील तेलाच्या दरांवर आणि बाजाराची स्थिती गंभीर झाली आहे. ◀*(वृत्तसंस्था)*





### भारताला मिळणार दिलासा

होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक पुन्हा नियमित झाल्यास भारतासाठी हा मोठा दिलासा ठरेल. कारण, भारत आपल्या एकूण गरजेच्या ८० टक्के कच्चे तेल आयात करतो आणि त्यातील मोठा भाग होर्मुझमधूनच येतो. ■

### सर्व आघाड्यांवरील युद्ध संपावे : बघाई



**इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई म्हणाले, करारामध्ये युद्ध संपवण्यासाठी आवश्यक असलेले मुख्य मुद्दे आणि आम्हाला आवश्यक असलेल्या इतर महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश असावा. त्यानंतर पुढील ३० ते ६० दिवसांत अधिक तपशिलावर चर्चा केली जाईल आणि अखेरीस अंतिम करार होईल. होर्मुझ खुली करणे हा वाटाघाटींचा एक महत्त्वाचा भाग आहे. आम्हाला लेबनॉनसह सर्व आघाड्यांवरील युद्ध संपवायचे आहे आणि आर्थिक निर्बंध उठवून घ्यायचे आहेत.** ■

**अमेरिका-इराण कराराच्या जवळ : डोनाल्ड ट्रम्प**

*(वृत्त शेवटच्या पानावर)* ▸

## महत्त्वाचे

### रत्न भंडार यादीचे काम जूनपर्यंत पुढे ढकलले

**पुरी** : सध्याचे उष्ण व दमट हवामान आणि चंदन यात्रा विधी लक्षात घेऊन पुरी येथील जगन्नाथ मंदिराने रत्न भंडारात सुरू असलेली मौल्यवान वस्तूंची मोजणीचे काम जून महिन्यापर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. श्री जगन्नाथ मंदिर प्रशासनाने यापूर्वी २६,२८, २९ आणि ३० मे रोजी आणखी चार दिवस वस्तूंच्या मोजणीचे काम करण्याचा निर्णय घेतला असला, तरी या दिवसांमध्ये हे काम स्थगित करण्याचा निर्णय घेतला, असे मंदिर प्रशासनाचे मुख्य प्रशासक अरबिंद पाढी यांनी पत्रकारांना सांगितले. सध्या सुरू असलेली उष्णतेची लाट, भाविकांची मोठी गर्दी आणि आगामी स्नान पौर्णिमा उत्सवाची तयारी या बाबी लक्षात घेऊन प्रशासनाने काही दिवसांसाठी वस्तूंच्या मोजणीचे काम थांबवण्याचा निर्णय घेतला, असे त्यांनी सांगितले. ■

### नागरी सेवा पूर्वपरीक्षेला ५.४९ लाख उमेदवार

**नवी दिल्ली** : रविवारी पार पडलेल्या नागरी सेवा पूर्वपरीक्षेला जवळपास ५.४९ लाख उमेदवार बसले, असे केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) सांगितले. यावर्षी प्रथमच तोतयागिरी रोखण्यासाठी आणि परीक्षा प्रक्रियेची सचोटी बळकट करण्यासाठी, आयोगाने परीक्षा केंद्रांवर उमेदवारांच्या 'रीअल-टाईम फेस अथाँटिफिकेशन' प्रणालीची अंमलबजावणी केली. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या 'नॅशनल ई-गव्हर्नन्स डिव्हिजन'ने स्वदेशी बनावटीने विकसित केलेली प्रणाली सर्व परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे कार्यरत ठरली, असे यूपीएससीने एका निवेदनात म्हटले आहे. यूपीएससीने राबवलेली ही कदाचित सर्वांत मोठी रिअल-टाईम फेस अथाँटिफिकेशन प्रक्रिया होती आणि तिचे १०० टक्के यश ही आयोगाच्या सचोटीविषयक प्रक्रियांमधील एक मोठी प्रगती आहे, असे त्यात नमूद करण्यात आले आहे.

### सत्तुर व लाकडाने मारुन वृध्द शेतकऱ्याचा खून

**सोलापूर** : सत्तुर व लाकडाने मारुन एका वृध्द शेतकऱ्याचा खून करण्यात आल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील डोंबरजवळगे येथे घडली. बाबुसाब अलिसो जमादार (वय-६२, रा.डोंबरजवळगे, ता.अक्कलकोट) असे खून झालेल्या वृध्द शेतकऱ्याचे नाव आहे. यातील मयत बाबुसाह जमादार हे शनिवार, दि.२३ मे रोजी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास राहत्या घराजवळ असताना अज्ञात कारणावरुन त्यांचे शेजारी मौलासा लालसा मकानदार, दाऊद मकानदार यांच्यासह तिघा जणांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत सत्तुर, लाकडाने हल्ला केला. या मारहाणीत बाबुसाब जमादार हे गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडले. त्यांना उपचाराकरिता पुतण्या शमशूर जमादार यांनी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान रविवार, २४ मे रोजी पहाटे २.३० वाजता त्यांचा मृत्यू झाला. याबाबत सिव्हिल पोलीस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



**नीट पेपरफूट प्रकरण**

# पेपरफुटीची अजब 'केमिस्ट्री'; प्राध्यापिका सीबीआयच्या रडारवर

◆ **पुणे, २४ मे**

नीट-यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणाचा तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसे नवे आणि धक्कादायक तपशील समोर येत आहेत. भौतिकशास्त्र विषयातील प्रश्नफुटीनंतर आता रसायनशास्त्र विषयातील प्रश्नसंचही बाहेर गेल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. या पृष्ठभूमीवर राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (एनटीए) पॅनेलवरील एका रसायनशास्त्र तज्ज्ञ प्राध्यापिकेचे नाव सीबीआयच्या रडारवर आले आहे.

पुण्यात अटक करण्यात आलेल्या मुख्याध्यापिका मनीषा हवालदार यांच्या चौकशीतून या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. चौकशीत त्यांनी एका विद्यार्थ्याला भौतिकशास्त्र विषयाशी संबंधित प्रश्न दिल्याचे कबूल केल्याची माहिती सूत्रांनी दिली. हे प्रश्न भाषांतर आणि रिव्हर्स ट्रान्सलेशनच्या माध्यमातून तयार करण्यात आले होते. विशेष म्हणजे, संबंधित माहिती एनटीएशी संबंधित असलेल्या रसायनशास्त्र विषयाच्या एका महिला तज्ज्ञ प्राध्यापिकेच्या सूचनेवरून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आल्याचेही तपासात उघड झाल्याचे सांगितले जात आहे.

संबंधित प्राध्यापिका पुण्यातील एका नामांकित महाविद्यालयात गेल्या तीन दशकांहून अधिक काळ रसायनशास्त्र विषय शिकवत असून, एनटीएच्या तज्ज्ञ पॅनेलशी संबंधित आहे. त्यामुळे आता प्रश्नपत्रिका तयार करण्याची प्रक्रिया, भाषांतर, तसेच प्रश्नसंच हाताळणाऱ्या व्यक्तींची भूमिकाही तपासाच्या केंद्रस्थानी आली आहे.

सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणात विविध स्तरांवर चौकशी सुरू केली असून, प्रश्नपत्रिका तयार होण्यापासून ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचेपर्यंतच्या संपूर्ण साखळीचा तपास केला जात आहे. राजस्थानमध्ये नीट परीक्षेपूर्वी काही विद्यार्थ्यांकडे संशयास्पद प्रश्नसंच आढळल्यानंतर या प्रकरणाचा उलगडा झाला होता. त्यानंतर, सुरू झालेला तपास आता पुणे, लातूर, नाशिकसह विविध शहरांपर्यंत पोहोचला आहे. तपास यंत्रणांच्या मते, प्रश्नपत्रिकेचे भाषांतर, प्रिंटिंग, डिजिटल ट्रान्सफर आणि वितरण या टप्प्यांपैकी कुठेतरी गळती झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आता एनटीएच्या अंतर्गत प्रक्रियेवरही तपास यंत्रणांचे विशेष लक्ष केंद्रीत झाले आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*

### आणखी नावे येणार समोर

नीट-यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणात आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगर येथून ११ जणांना अटक करण्यात आली आहे. मुख्याध्यापिका मनीषा हवालदार यांना सोमवारी दिल्लीतील सीबीआय न्यायालयात हजर केले जाणार असून, पुढील चौकशीत आणखी काही नावे समोर येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. ■

### मोटेगावकरची ४० कोटींची जमीन

या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरसीसी क्लासेसचा संचालक शिवराज मोटेगावकर याने पुण्यातील वारजे भागात ५१ गुंठे जमीन खरेदी केल्याची माहिती तपासात समोर आली. २०२३ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या या जमिनीचे बाजारमूल्य सुमारे ३५ ते ४० कोटी रुपये असल्याचे सूत्रांनी सांगितले. ■

# बजरंग दल कार्यकर्त्याची दगडांनी ठेचून हत्या

### कारला घेराव घालून केला गोतस्करांनी हल्ला

◆ **उमरखेड, २४ मे**

गोवंश तस्करी रोखणाऱ्या बजरंग दल कार्यकर्त्याची गोतस्करांनी अमानुष आणि अत्यंत निर्घृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना येथून ५ किमी अंतरावरील सुकळी (ज.) येथे शनिवारी मध्यरात्री घडली. गजानन मारोती सुरोशे (३२) असे मृत कार्यकर्त्याचे नाव आहे. याप्रकरणी दोन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरून एमएच-२९/बीई-८९१५ क्रमांकाच्या बोलेरो पिकअप वाहनाने गोवंशांची उमरखेडच्या दिशेने तस्करी होत असल्याची माहिती बजरंग दल कार्यकर्त्यांना मिळाली. याआधारे कार्यकर्त्यांनी बिजोरा टोल नाक्यावर सापळा रचून संशयास्पद वाहन अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र, दुचाकीला कट मारून तस्करांनी पळ काढला.



गजानन सुरोशे

गजानन सुरोशे यांनी तातडीने आपल्या कारने पाठलाग सुरू केला. यावेळी तस्करांच्या वाहनाचा टायर फुटला. तरीही त्यांनी आपले वाहन सुकळीच्या दिशेने वळविले. गजानन सुरोशे यांचे वाहन मागोमाग सुकळी गावात शिरताच दबा धरून बसलेल्या तस्करांनी त्यांच्या गाडीला घेराव घातला आणि दगड व लाकडी दांड्यांनी हल्ला केला. आरोपींनी गाडीची तोडफोड करून गजानन सुरोशे यांना बाहेर खेचले आणि निर्घृण वार केले. माहिती मिळताच पोलिस सहनिरीक्षक विनायक रामोड हे एकटेच घटनास्थळावर पोहोचले. यावेळी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या गजाननला ग्रामस्थांच्या मदतीने तत्काळ उमरखेड शासकीय रुग्णालय व तिथून नांदेड येथे नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली.

**मोक्काअंतर्गत कारवाई करा : बजरंग दल**

वाढता तणाव पाहता पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंत गायकवाड यांनी तत्काळ घटनास्थळ गाठले. संवेदनशील भागात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. आरोपींना शोधून मोक्काअंतर्गत कठोर कारवाई करा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा बजरंग दलाने दिला आहे. आरोपींकडील वाहन उमरखेड तालुक्यातील एका कुप्रसिद्ध गोतस्कराचे असल्याची चर्चा आहे. दरम्यान, उमरखेड पोलिस ठाण्यात आ. किसन वानखेडे, भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा व पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी जमावाला शांत केले. ◀*(तभा वृत्तसेवा)*



आगामी गंगा दशहरा महोत्सवाच्या पृष्ठभूमीवर हरिद्वार येथे गंगा नदीच्या किनारी असलेल्या 'हर की पौडी' येथे रविवारी हजारो भाविकांनी पवित्र स्नान केले.

# तृणमूलचा शेवटचा बालेकिल्ला उद्‌ध्वस्त

### भाजपा उमेदवाराचा लाखभर मतांनी विजय

◆ **कोलकाता, २४ मे**

पश्चिम बंगालच्या फाल्ता विधानसभा मतदारसंघात रविवारी झालेल्या फेरनिवडणुकीत भाजपाने एक लाखांहून मतांच्या फरकाने विजय मिळवला.



हा मतदारसंघ दीर्घकाळापासून तृणमूल काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जायचा. तो भाजपाने उद्‌ध्वस्त केला. या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा उमेदवार चौथ्या क्रमांकावर घसरला. तो अनामत रक्कमही वाचवू शकला नाही. १,४९,६६६ मते मिळवत भाजपाच्या देबांगशू पांडा यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पधी सीपीआयचे (एम) संभू नाथ कुर्मी यांचा १,०९,०२१ मतांच्या फरकाने पराभव केला. कुर्मी यांना ४०,६४५ मते, तर काँग्रेसचे अब्दुर रज्जाक मोल्ला १०,०४८ मते घेऊन तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

फाल्ता प्रचारमोहिमेतील एकेकाळी सर्वाधिक चर्चेत असलेल्या चेहऱ्यांपैकी एक तृणमूलचे जहांगीर खान केवळ ७,७८३ मते मिळवून चौथ्या क्रमांकावर घसरले आणि त्यांची अनामत रक्कम जप्त झाली. मतदानाच्या दोन दिवस आधी, खान यांनी माघार घेत असल्याचे जाहीर केले होते. मात्र, त्यावेळी उमेदवारी मागे घेणे शक्य नसल्याने त्यांचे नाव इव्हीएमवर कायम राहिले. फेरमतदानात भाजपाने ७१.२ टक्के मतांचा वाटा मिळवला. हा २०११ मधील ३६.७५ टक्क्यांच्या तुलनेत मोठी उसळी दर्शवतो, तर दुसरीकडे तृणमूल काँग्रेसचा वाटा केवळ ३.७ टक्क्यांवर आला. ◀*(वृत्तसंस्था)*

# पाकिस्तान-बांगलादेश सीमा होणार अभेद्य

## निगराणीसाठी एआय-आधारित तंत्रज्ञान, वर्षभरात प्रकल्पाची अंमलबजावणी

◆ **नवी दिल्ली, २४ मे**

पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील आंतरराष्ट्रीय सीमा आता कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात् एआयच्या मदतीने अभेद्य होणार आहे. सीमेवर लावण्यात येणारे स्मार्ट फेन्सिंग मजबूत सुरक्षा जाळ्याच्या योजनेचा भाग असेल, ज्याची अंमलबजावणी पुढील एका वर्षात केली जाईल.

या प्रकल्पांतर्गत स्थापित करण्यात येणाऱ्या उपकरणांमध्ये ड्रोनविरोधी गस्ती वाहने, रडार, लाँग रेंज रिकॉनिसन्स अँड ऑब्झर्वेशन प्रणाली, फॉरवर्ड-लुकिंग इन्फ्रारेड, थर्मल कॅमेरे, एक व्यापक एकात्मिक सीमा व्यवस्थापन प्रणाली, निगराणीसाठी एआय-आधारित तंत्रज्ञान असलेले रोबोट आणि ड्रोन कमांडो यांचा समावेश आहे. या उपकरणांमुळे बीएसएफला सीमेवरील संवेदनशील भागांवर चौवीस तास देखरेख ठेवणे सोपे होईल अशी माहिती बीएसएफच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले. बीएसएफने बांगलादेश सीमेवरील सुरक्षेसाठी महिला कमांडोंची दुर्गा ड्रोन स्क्वॉड्रन तयार केली आहे. या कमांडोंना ड्रोन डावपेच आणि आक्रमक, संरक्षणात्मक कारवायांमध्ये प्रशिक्षित केले आहे. या कमांडोंना रात्रीच्या कारवाया, पेलोड इंटिग्रेशन आणि आरएफ जॅमर्स व कायनेटिक इंटरसेप्टर्ससह ड्रोनविरोधी तंत्रज्ञानामध्ये प्रशिक्षित केले जात आहे.



**जुन्या कुंपणाचेही तंत्रज्ञानामध्ये रूपांतर**

सर्वसमावेशक एकात्मिक सीमा व्यवस्थापन प्रणाली सेन्सर्स आणि नेटवर्क्सच्या माध्यमातून कार्य करते. ही प्रणाली जम्मू आणि काश्मीर, पंजाब आणि राजस्थानमध्ये स्थापित केली जात आहे. राजस्थानमधील जुन्या कुंपणाचेही या तंत्रज्ञानामध्ये रूपांतर केले जाईल. मल्टी-सेन्सर तंत्रज्ञानाचा वापर सुरक्षेसाठी करण्यात येईल. हे फॉरवर्ड-लुकिंग इन्फ्रारेड तंत्रज्ञान आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे ते लांब अंतरावरून निरीक्षण करू शकते आणि धुक्यात व दाट अंधारातही दिसू शकते.

**लेझर रेंजफाइंडरचा वापर**

सीमेवर सुरक्षेसाठी पहिल्यांदाच लेझर रेंजफाइंडरचा वापर केला जाईल. यामुळे अचूक अंतराचे मोजमाप करणे शक्य होईल. हे तंत्रज्ञान अंगभूत होकायंत्र आणि जीपीएसच्या साहाय्याने, ते लक्ष्याचे अचूक निर्देशांक प्रदान करते. हे तंत्रज्ञान विशेषतः दूरस्थपणे चालवले जाते, ज्यामुळे त्याचा वापर बंकर किंवा नियंत्रण कक्षातून करता येतो. सीमेवर फायबर-ऑप्टिक लिंक असल्यास, ते अनेक किलोमीटरच्या अंतरावरून कार्य करू शकते. ◀*(वृत्तसंस्था)*

### ड्रोनविरोधी गस्ती वाहन तैनात

इंद्रजाल, देशातील पहिले ड्रोनविरोधी गस्ती वाहन, १० किलोमीटरच्या त्रिज्येमध्ये ड्रोन शोधेल. पाच किलोमीटरच्या त्रिज्येमध्ये ड्रोनचे सायबर-टेकओव्हर होईल. ड्रोनविरोधी तोफ सीमेवर तैनात असेल. रोबोट्स आणि रडार देखील तैनात केले जाणार आहेत. पर्वत, नद्या, ओढे आणि अत्यंत संवेदनशील भागांमध्ये एआय-शक्तीवर चालणाऱ्या रोबोट्सद्वारे सीमा सुरक्षा पुरवली जाईल. ■

# १२ खासदारांना संसदरत्न पुरस्कार

## महाराष्ट्रातील सर्वाधिक पाच जणांचा समावेश






◆ **नवी दिल्ली, २४ मे**

संसदेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १२ खासदारांसह चार संसदीय स्थायी समित्यांची 'संसदरत्न पुरस्कार-२०२६'साठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील सर्वाधिक पाच खासदारांचा समावेश आहे. लोकसभा आणि राज्यसभेतील खासदारांच्या संसदीय कामगिरीच्या आधारे यंदा १० लोकसभा खासदार आणि दोन राज्यसभा सदस्यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रातून शिवसेनेचे डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, भाजपाच्या डॉ. मेधा कुलकर्णी, स्मिता वाघ, हेमंत सावरा यांची निवड करण्यात आली. अन्य खासदारांमध्ये जगदंबिका पाल, पी. पी. चौधरी, निशिकांत दुबे, प्रवीण पटेल, विद्युत महतो, लुबाराम चौधरी, नरहरी अमीन यांचाही पुरस्कार विजेत्यांमध्ये समावेश आहे. संसद सदस्यांच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ पर्यंतच्या संसदीय कामगिरीच्या आधारे ही निवड करण्यात आल्याचे प्रियदर्शनी राहुल यांनी स्पष्ट केले. ◀*(वृत्तसंस्था)*

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### भारतीय वंशाचे दोघे ब्रिटनमध्ये महापौर

**लंडन :** मूळचे हरयाणाच्या रोहतक येथील रहिवासी असलेल्या दहिया कुटुंबातील दोन सदस्यांनी ब्रिटनमध्ये महापौरपदाची निवडणूक जिंकली. परवीन राणी आणि त्यांचा मुलगा, तुषार कुमार ब्रिटनमध्ये महापौर म्हणून निवडून आले. सामाजिक कार्य आणि लेबर पार्टीमधील सहभागातून राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण करणारे ते भारतीय वंशाचे पहिले स्थलांतरित आहेत. २३ वर्षीय तुषार एल्स्ट्री आणि बोरहॅमवुड टाऊन कौन्सिलचे महापौर म्हणून निवडून आले आहेत, ज्यामुळे ते ब्रिटनमध्ये महापौरपद भूषवणारे सर्वात तरुण भारतीय वंशाचे व्यक्ती ठरले आहेत. वयाच्या २० व्या वर्षीच तो नगरसेवक म्हणून निवडून आला होता. तुषारची आई ४५ वर्षीय परवीन राणी हर्ट्समेअर बोरो कौन्सिलच्या महापौरपदी निवडून आल्या आहेत. विशेष असे की, तुषार सध्या किंग्ज कॉलेज लंडनमधून राज्यशास्त्रात पदवी घेतलेली असून, त्याने युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनमध्ये पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेत असतानाच महापौरपदाची निवडणूक जिंकली. तुषारची राजकारणात येण्याची कहाणी खूप प्रेरणादायी आहे.

### जन्मदातीला पोटच्या मुलाने जिवंत जाळले

**धुळे :** अनंत यातना सहन करत मुलाचे संगोपन करून वाढवले, मात्र त्यानेच क्षुल्लक कारणातून जन्मदातीला आगीच्या ज्वाळात ढकलून देत तिला जाळून टाकले. मन सुन्न करणारी ही घटना धुळे शहरातून समोर आली आहे. लग्नासाठी विरोध करणाऱ्या आईवर एका तरुणाने केरोसीन ओतले आणि आग लावली. होरपळून आईचा मृत्यू झाला. प्रदीप खैरनार असे आरोपीचे, तर ६५ वर्षीय जिजाबाई खैरनार मृत आईचे नाव आहे. आईची हत्या केल्यानंतर आरोपी पळून गेला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपी तरुण गेल्या काही दिवसांपासून लग्नासाठी तगादा लावत होता. मात्र, काही कौटुंबिक कारणांमुळे वृद्ध आईचा या लग्नाला तूर्तास विरोध होता. याच कारणावरून आई आणि मुलामध्ये कडाक्याचे भांडण झाले. आपल्या लग्नात आई अडथळा ठरत असल्याचा राग डोक्यात ठेवून आरोपी मुलाने आईच्या अंगावर केरोसीन ओतले आणि तिला जिवंत पेटवून दिले.

### विवाह जवळ असताना नवरदेवाचा दुर्दैवी अंत

**जळगाव:** जळगाव जिल्ह्यातील दहिगाव येथे लग्नाच्या अवघ्या दहा दिवस आधी एका २७ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. घरात लग्नाची लगबग सुरू असतानाच घडलेल्या या घटनेमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. योगेश यशवंत पाटील असे मृत तरुणाचे नाव असून ४ जून रोजी त्याचा विवाह होणार होता. मात्र, लग्नाच्या तयारीत असतानाच रोटावेटरच्या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, योगेश पाटील हे दहिगाव येथील शेतकरी शोभराज रमेश महाजन यांच्या शेतात ट्रॅक्टरद्वारे रोटावेटरचे काम करत होते. कामादरम्यान अचानक तोल जाऊन ते ट्रॅक्टरच्या मोठ्या चाकाखाली अडकले आणि गंभीर जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. ट्रॅक्टर काही काळ सुरूच राहिल्याने घटनेचे गांभीर्य आणखी वाढले.

# तंत्रज्ञानाला संस्कृतीशी अनुरूप आकार देणे आवश्यक

### सुनील आंबेकर यांचे प्रतिपादन




स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना सुनील आंबेकर

◆ **कोल्लम्, २४ मे**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची उभारणी आणि जोपासना ही एका अत्यंत स्पष्ट वैचारिक पायावर झाली आहे, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले. स्वयंसेवकांचे अथक परिश्रम आणि समाजाचा सक्रिय पाठिंबा यामुळेच संघाच्या १०० वर्षांच्या प्रवासाला बळकटी मिळाली, असे त्यांनी नमूद केले.

संघ शताब्दी कार्यक्रमांचा एक भाग म्हणून कोल्लममधील चिन्नाकडा येथील 'नानी हॉटेल'मध्ये आयोजित 'प्रबुद्ध और संगमम्'मध्ये ते 'संघाचा वैचारिक पाया' या विषयावर संबोधित करीत होते.

संघाने वसाहतवादी राजवटीखालील समाजाच्या उत्थानासाठी भारतीय मूल्यांनुसार कार्य केले. स्वयंसेवकांनी केवळ परिस्थितीवर प्रतिक्रिया देण्याऐवजी, आपल्या मूळ विचारसरणीवर आधारित आपल्या कार्याची दिशा निश्चित केली आणि काळाने ही कृती योग्य असल्याचे सिद्ध केले. हा एक प्रकारचा न्यायच आहे की, ज्या शाळेत संघ संस्थापक डॉक्टर हेडगेवारजी यांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांचे निर्बंध झुगारून 'वंदे मातरम्'चा जयघोष केला होता, त्याच शाळेत आता 'वंदे मातरम्' साजरा केला जातो, असे सुनील आंबेकर यांनी सांगितले.

राष्ट्राचा धर्म, संस्कृती आणि जीवन आपण आपल्या स्वतःच्याच दृष्टिकोनातून अभिव्यक्त करणे आवश्यक आहे, अशी संघाच्या संस्थापकांची ठाम धारणा होती. म्हणूनच, भारताचे वैशिष्ट्य हे हिंदुत्व आहे आणि हे एक हिंदू राष्ट्र आहे, असे त्यांनी कोणत्याही प्रकारच्या शंकेला वाव न ठेवता घोषित केले, असे सुनील आंबेकर म्हणाले. हिंदुत्व हे असे सार आहे, जे आपल्या संपूर्ण समाजाला एकसंध ठेवते आणि आपले परस्परसंबंध दृढ करते. जो कुणी हिंदू जीवनमूल्यांचे पालन करतो, तो हिंदू होय. हा केवळ एक धर्म नाही, तर ती एक जीवनपद्धती आणि एक संस्कृती आहे, असे आंबेकर यांनी स्पष्ट केले.

डॉक्टर हेडगेवारजी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची संकल्पना समाजातील केवळ एक संस्था म्हणून नव्हे, तर समाजाचीच संस्था म्हणून केली होती. संघ कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही; कुणीही त्यात सहभागी होऊ शकते. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता प्रत्येकापर्यंत पोहोचणे, हीच आजच्या काळाची गरज आहे, यावर सुनील आंबेकर यांनी स्पष्ट केले.

दक्षिण केरळम् प्रांत प्रचारक एस. सुदर्शनन् यांनी पंचपरिवर्तन या विषयावर भाषण केले. डॉ. आर. के. भुदेशी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कोल्लम महानगर सह संघचालक डॉ. जी. मोहन, एस. आर. राजीव, एस. रंजन यांचाही सहभाग होता. ◂(वृत्तसंस्था)

### राष्ट्रीय एकता, देशभक्तीबाबत तडजोड नाही

हिंदू धर्मामध्ये अनेक पंथांचा समावेश होतो. धर्म ही अशी आचारसंहिता आहे, जी या सर्व पंथांना योग्य मार्गावर मार्गदर्शन करते. 'हिंदू राष्ट्र' आणि 'हिंदू धर्म' हे दोन्ही सर्वसमावेशक आहेत आणि हिंदुत्वात असे काहीही नाही, ज्यामुळे विभाजन होईल. राष्ट्रीय एकता आणि देशभक्तीबाबत संघ कधीही तडजोड करणार नाही, असे सुनील आंबेकर यांनी स्पष्ट केले.

### 'संघम्' प्रदर्शित

रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त कोची विश्व संवाद केंद्राने तयार केलेल्या 'संघम्' हा लघुपट सुनील आंबेकर यांच्या हस्ते प्रदर्शित करण्यात आला. संघ शताब्दी वैचारिक सभेचा भाग म्हणून चिन्नाकडा येथील नानी हॉटेल सभागृहात प्रीमियर स्क्रीनिंग झाले.

# अमेरिका-इराण कराराच्या जवळ : ट्रम्प

### युरेनियमचा साठा सोपवण्यास सहमती

◆ **वॉशिंग्टन, २४ मे**

इराणसोबतच्या वाटाघाटी बहुतांश पूर्ण झाल्या आहेत आणि दोन्ही देशात लवकरच करार होईल. इराण समृद्ध युरेनियमचा साठा सोपवण्यास तयार असल्याने कराराचा मार्ग मोकळा झाला आहे. होर्मुझ सामुद्रधुनी लवकच खुली होईल, अशी माहिती राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून दिली.

मित्र देशांच्या मध्यस्थीने इराणसोबत चर्चा सुरू आहे. कराराचा भाग म्हणून त्यांनी युरेनियमचा साठा सोपवण्यास सहमती दर्शवली आहे. होर्मूझ समुद्र मार्ग पुन्हा खुला करण्यासाठी दोन्ही देश कराराच्या अगदी जवळ आहेत. पुढील ३० ते ६० दिवसांत या संवर्धित युरेनियमच्या साठ्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचे ट्रम्प यांनी सांगितले. इराणने पाकिस्तानमार्फत पाठवलेल्या शांतता प्रस्तावाचा आढावा घेण्यात आला. अमेरिका, इराण आणि मित्र देशांमध्ये कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी विस्तृत चर्चा झाली.



यात्यतिरिक्त, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी माझे दूरध्वनीवरून संभाषण झाले. कराराच्या अंतिम बाबी आणि तपशिलांवर सध्या चर्चा सुरू आहे आणि लवकरच त्याची घोषणा केली जाईल. या कराराच्या इतर अनेक घटकांपैकी एक होर्मुझची सामुद्रधुनी लवकरच खुली केली जाईल.

**प्रस्तावात काय आहे?**

अंतरिम कराराच्या मसुद्यात युद्ध समाप्तीच्या अधिकृत घोषणेचा समावेश आहे. त्यानुसार, इराणच्या अणुकार्यक्रमावरील वाटाघाटी पुढील दोन महिने सुरू राहतील. त्या बदल्यात, इराण होर्मुझची सामुद्रधुनी खुली करेल आणि अमेरिका इराणी बंदरांवरील आर्थिक नाकेबंदी उठवेल. ◂(वृत्तसंस्था)

### आखाती देशांचा ट्रम्प यांना पाठिंबा

आखाती देशांच्या नेत्यांनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना इराणने प्रस्तावित केलेला आराखडा स्वीकारण्यास प्रोत्साहित केले. ही चर्चा अत्यंत सकारात्मक होती आणि सर्व नेत्यांनी वाटाघाटींद्वारे कोंडी फोडण्यात मिळवलेल्या महत्त्वपूर्ण यशाचे कौतुक केले. हा करार या टप्प्यापर्यंत आणण्यात पाकिस्तान आणि कतारने मध्यस्थांची महत्त्वाची भूमिका बजावल्याची माहिती एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला दिली.

### आयएसआयच्या टोळीत जाण्याचा प्रयत्न फसला

◆ **हैदराबाद, २४ मे**

पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयचा पाठिंबा असलेल्या एका गुन्हेगारी टोळीत सामील होण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आणि त्यांच्यामार्फत शस्त्रे मिळवण्याच्या आरोपाखाली एका तरुणाला अटक केली, असे पोलिसांनी रविवारी सांगितले. उत्तरप्रदेशातील झायेद खान दोन महिन्यांपूर्वी हैदराबादला आला होता. ◂(वृत्तसंस्था)

# तापमानवाढीबरोबच आता नवतपाचा 'ताप'

### २ जूनपर्यंत राज्यात तापमानाचा कहर | उष्माघाताचा धोका वाढणार

◆ **नागपूर, २४ मे**

राज्यातील बहुतांश जिल्ह्याचे तापमान ४२ डिग्री सेल्सियसच्या वर गेले असून, उष्णतेच्या लाटेमुळे होरपळ सुरू आहे. अशातच सोमवार, २५ जूनपासून नवतपाची सुरुवात होत असून, २ जूनपर्यंत अर्थात नऊ दिवसापर्यंत उच्च तापमानाचा कहर कायम राहणार आहे. पर्यायाने उष्माघाताचा धोका कायम असून या काळात आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागणार आहे.

दरवर्षी मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नवतपाचा काळा सुरू होतो. यंदा नवतपाची सुरुवात २५ मेपासून ते २ जून रोजीपर्यंत आहे. नवतपादरम्यान उन्हाळा अधिक रौद्र रुप धारण करतो. या काळात सामान्य दिवसांपेक्षा तापमान खूप जास्त असते आणि हवेतील आर्द्रता कमी होते. उष्णतेचा शरीरावर वेगाने परिणाम होऊ शकतो, यामुळेच नवतपाचा काळ अधिक धोकादायक मानला जातो तसेच उष्माघाताचाही धोका वाढतो.



**उष्ण वाऱ्याची स्थिती वाढणार**

हिंदू पंचांगानुसार, जेव्हा सूर्य रोहिणी नक्षत्रात प्रवेश करतो, तेव्हा नवतपाची सुरुवात होते. यावेळी रोहिणी नक्षत्र सूर्याच्या अगदी जवळ पोहोचते. या काळात सूर्याची किरणे पृथ्वीवर लंबवत पडतात. त्यामुळे जमिनीतील ओलसरपणा आणि गारवा सूर्य शोषुन घेतो आणि त्यामुळे उष्मा असह्य होतो. ज्योतिषीय गणितानुसार यंदा २५ मे रोजी नवतपा सुरू होणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# लाल किल्ला प्रकरणातील बॉम्ब बनवण्यासाठी 'एआय'चा गैरवापर

### एनआयएचा आरोपपत्रात दावा




◆ **नवी दिल्ली, २४ मे**

दिल्लीतील लाल किल्ला परिसरात झालेल्या कार बॉम्बस्फोट प्रकरणाच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील आरोपीने दहशतवादी कृत्य आणि बॉम्ब बनवण्यासाठी एआय मंचाचा गैरवापर केल्याचे एनआयएने आरोपपत्रात म्हटले आहे. या आरोपीचा जागतिक दहशतवादी संघटना अल-कायदाशी संबंध असल्याचे समोर आले.

१० नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या दिल्लीतील कार बॉम्बस्फोट प्रकरणी एनआयएने १४ मे रोजी ७,५०० पानांचे आरोपपत्र दाखल केले. या आरोपपत्रात अनेक धक्कादायक खुलासे करण्यात आले आहेत. आरोपींनी आयईडी बनवण्यासाठी आणि वापरण्यासाठी अत्यंत सूक्ष्म आणि प्रयोगशाळेच्या दर्जाची पद्धत अवलंबली होती, असे आरोपपत्रात म्हटले आहे. आरोपींनी रॉकेटवर आधारित आयईडी देखील तयार केले होते आणि जम्मू-काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील काझीगुंडच्या जंगलात त्यांची चाचणीही घेतली होती. या प्रकरणातील एक मुख्य आरोपी अन्सार गझवात-उल-हिंद या दहशतवादी मॉड्युलचा इन-हाउस इंजिनीअर (अंतर्गत अभियंता) म्हणून काम करीत होता. या संघटनेचे थेट संबंध 'अल-कायदा इन द इंडियन सबकॉन्टिनेंट'शी आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने आणि त्यांच्याशी संबंधित सर्व संघटनांना दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले आहे. डॉ. आदिल हा जासीरला पिठीसाखर आणि एनपीके खताच्या स्वरूपातील पोटॅशियम नायट्रेटसह इतर आयईडी साहित्य पुरवत होता. तर डॉ. उमर रॉकेट आयईडीवर संशोधन करून जासीरला मार्गदर्शन करीत होता. डिजिटल आणि एआय प्लॅटफॉर्मचा गैरवापर कसा केला गेला, यावर प्रकाश टाकताना आरोपपत्रात म्हटले आहे की, जासीरने युट्यूब आणि चॅटजीपीटीचा वापर करून रॉकेट कसे बनवावे आणि त्यात मिश्रणाचे प्रमाण किती असावे, याबद्दल शोध घेतला होता. ◂(वृत्तसंस्था)

### अल-फलाह विद्यापीठात कटकारस्थान

आरोपपत्रात दिलेल्या माहितीनुसार, मुख्य आरोपी जासीर बिलाल वानी याने २०२४-२५ दरम्यान या कटासाठी तांत्रिक सहाय्य पुरवण्यासाठी हरयाणातील फरिदाबाद येथील अल फलाह युनिव्हर्सिटीच्या कॅम्पसमध्ये दोन ते तीन वेळा मुक्काम केला होता. डॉ. आदिल अहमद राथर याने जासीरची ओळख डॉ. उमर उन नबीशी करून दिली होती.

# नदीत बुडून आठ जणांचा मृत्यू

◆ **बंगळुरू, २४ मे**

कर्नाटकच्या कारवार जिल्ह्यातील थट्टे हक्कालु नदीत रविवारी सात महिलांसह आठ जणांचा बुडून मृत्यू झाला, तर दोन जण अजूनही बेपत्ता आहे. भटकलजवळ घडलेल्या या दुर्घटनेनंतर प्रशासनाने आणि बचाव पथकांनी व्यापक शोधमोहीम सुरू केली आहे.

या घटनेवर शोक व्यक्त करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मृतकांच्या वारसांना दोन लाखांची मदत घोषित केली. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या दुःखद घटनेबद्दल शोक व्यक्त करत मृताच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची सानुग्रह मदत जाहीर केली. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, शिराली गावातील १४ जण गोड्या पाण्यातील शिंपले गोळा करण्यासाठी नदीत उतरले होते. नदीकाठच्या स्थानिक समुदायांकडून हे एक हंगामी काम केले जाते. पाण्याची पातळी नीट न तपासताच ते नदीच्या खोल भागात उतरले. पाण्याचा प्रवाह अचानक वाढला, तेव्हा एक-दोन जण वाहून गेले, त्यांना वाचवण्यासाठी इतरांनी नदीत उडी घेतली, ज्यामुळे आणखी लोक वाहून गेले. आतापर्यंत आठ मृतदेह सापडले असून, दोन जण अजूनही बेपत्ता आहेत. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, मानवतावादी दृष्टिकोनातून, राज्य सरकार या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची मदत देईल. ◂(वृत्तसंस्था)



भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त दिल्लीतील लाल किल्ल्यात जनजाती सांस्कृतिक समागमचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी तैलचित्रांना अभिवादन करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

### नितीशकुमार यांना मिळणार विशेष राजशिष्टाचार

**प्रदीर्घकाळ** बिहारचे मुख्यमंत्रिपद भूषवणारे जदयुचे नेते नितीशकुमार बिहार सोडून दिल्लीत म्हणजे राष्ट्रीय राजकारणात आले. बिहारच्या राजकारणाची आतापर्यंत नितीशकुमार यांच्याशिवाय कल्पना करता येत नव्हती, पण आता मात्र त्यांच्याशिवाय बिहारचे राजकारण पुढे जात आहे. बिहारमधून राजकारण संन्यास घेतांना नितीशकुमार यांनी आपल्या मुलाचे निशांतकुमार यांचे राजकीय पुनर्वसन केले. सम्राट चौधरी यांच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश करवून घेतला. नितीशकुमार यांनी केलेल्या या त्यागाचा सर्वात मोठा राजकीय फायदा भाजपाला झाला. कधी नव्हे तो बिहारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री सत्तारुढ झाला.

नितीशकुमार यांनी एकप्रकारे राजकीय बलिदान केले. त्यामुळे त्यांना त्यांच्या या राजकीय त्यागाचे काही बक्षीस देणे आवश्यक होते. तसे ते त्यांना देण्याचा निर्णय झाला आहे.

राजशिष्टाचाराचा भाग म्हणून त्या त्या राज्यातील मुख्यमंत्र्याची गाडी धावपट्टीवर थेट विमानाच्या जवळ नेली जाते. मात्र आता राज्याचे माजी मुख्यमंत्री असल्यामुळे हे भाग्य नितीशकुमार यांना मिळणार आहे. बिहारची राजधानी पाटण्यात आणि देशाची राजधानी दिल्लीत नितीशकुमार यांची गाडी थेट धावपट्टीवर विमानाच्या जवळ नेण्याची विशेष अनुमती देण्यात आली आहे. आतापर्यंत विद्यमान मुख्यमंत्र्यानाच ही अनुमती मिळत होती, माजी मुख्यमंत्र्यांना ती दिली जात नव्हती. आता मात्र नितीशकुमार यांच्या रुपात देशातील पहिल्या माजी मुख्यमंत्र्यालाही हा राजशिष्टाचार उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

नितीशकुमार यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त केंद्र सरकारकडून मिळालेली ही मोठी भेट म्हणायला हरकत नाही. कोणत्याही अधिकृत सरकारी पदावर नसलो तरी राजकारणातील आपले महत्व अजूनही कमी झाले नाही, याचे समाधान यातून नितीशकुमार यांना दीर्घकाळ मिळत राहील, यात शंका नाही.

●● ●●

### वेणुगोपाल यांचा इगो यामुळे तरी शांत होईल...

**काँग्रेसचे** संघटन महासचिव के.सी. वेणुगोपाल यांना केरळच्या मुख्यमंत्रिपदाने हुलकावणी दिली. मुख्यमंत्रिपदाच्या स्पर्धेत व्ही. डी. सतीशन याच्याशिवाय रमेश चेन्नीथला आणि वेणुगोपालही होते. सतीशन यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली. मुख्यमंत्रिपदाचे दावेदार असलेल्या रमेश चेन्नीथला यांचा सतीशन यांच्या मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला, एवढेच नाही तर त्यांना गृहमंत्रिपद देण्यात आले. चेन्नीथला हे काँग्रेसचे अतिशय ज्येष्ठ नेते आहेत, श्रीमत इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या काळातही त्यांनी काम केले. त्यामुळे त्यांच्या ज्येष्ठत्वाचा आदर राखत राहुल गांधी यांनी त्यांचा मंत्रिमंडळात समावेश केला. त्यामुळे केरळमधील तीनपैकी दोन नेत्याचे राजकीय पुनर्वसन झाले आहे, यातून वेणुगोपालच सुटले, त्यांच्या




हाती भोपळा आला. वेणुगोपाल नाईलाज म्हणून अतिशय जड अंतकरणाने सतीशन यांच्या शपथविधी समारंभाला उपस्थित राहिले.

केरळचे मुख्यमंत्रिपद मिळाले नसले तरी वेणुगोपाल यांनी नाराज होण्याचे कारण नाही. कारण पक्षातील त्यांचे तिसरे स्थान कायम आहे. मल्लिकार्जुन खडगे आणि राहुल गांधी यांच्यानंतर पक्षसंघटनेत वेणुगोपाल यांचा तिसरा क्रमांक लागतो. सोनिया गांधी आणि प्रियांका वढेरा यांना या यादीत जोडले तर वेणुगोपाल पाचव्या क्रमांकावर जातात. दिल्लीत आलेल्या काँग्रेसच्या मुख्यमंत्र्याला आणि अन्य नेत्यांनाही खडगे आणि राहुल गांधी यांना भेटण्याआधी वेणुगोपाल यांची भेट घ्यावी लागते. त्यामुळे आता केरळचे मुख्यमंत्री म्हणून दिल्लीत आल्यानंतर सतीशन यांनाही वेणुगोपाल यांच्या दरबारात हजेरी लावावी लागेल. कारण वेणुगोपाल हे दिल्लीतील सतीशन यांचे बॉस आहेत. त्यामुळे आपल्या बॉसगिरीचा तोरा दाखवायची वारंवार संधी त्यांना मिळणार आहे. स्वतः ला मुख्यमंत्री होता आले नसले तरी अनेक मुख्यमंत्री आपल्या दरबारात हजेरी लावतात, याचे समाधान त्यांना मिळत राहील.

●● ●●

### काँग्रेसने टाकले भाजपाच्या पावलावर पाऊल

**भाजपाच्या** वा त्याच्या मित्रपक्षाच्या कोणत्याही मुख्यमंत्र्याचा शपथविधी समारंभ धुमधडाक्यात होत असतो. शपथविधी समारंभाला पंतप्रधानांपासून अनेक केंद्रीय मंत्री तसेच भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित राहतात. मुख्यमंत्र्याचा शपथविधी समारंभ हा एक मोठा सोहळा असतो, त्याला इव्हेंटचे स्वरुप दिले जाते. काँग्रेसला मात्र अशी संधी गेल्या १२ वर्षात फार कमी म्हणजे नाहीच्या बरोबर मिळाली. यावेळी केरळमध्ये अशी संधी काँग्रेसला मिळाली. त्यामुळे त्या संधीचे सोने करण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला. भाजपाच्या धर्तीवर नवीन मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन यांचा शपथविधी सोहळा करण्यात आला. तिरुवनंतपूरच्या सेंट्रल स्टेडियममध्ये हा शपथविधी सोहळा झाला.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियांका वढेरा यावेळी उपस्थित होते. काँग्रेस सांसदीय पक्षाच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यावेळी उपस्थित राहू शकल्या नाही. मात्र कर्नाटकचे मुख्यमंत्री सिध्दरामैया, उपमुख्यमंत्री शिवकुमार, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, हिमाचलप्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदरसिंग सुक्खू , छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यावेळी उपस्थित होते. इंडिया आघाडीतील काही मित्रपक्षांचे नेतेही यावेळी उपस्थित होते. केरळचे माजी मुख्यमंत्री पिनाराई विजयन राजशिष्टाचाराचा भाग म्हणून शपथविधी समारंभाला उपस्थित होते.

तामीळनाडूचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री जोसेफ विजय यांना या शपथविधी समारंभासाठी निमंत्रित करण्यात आले होते, पण त्यांनी या समारंभापासून स्वतःला दूर ठेवण्याचा निर्णय घेतला. तामीळनाडूतील विजय यांच्या सरकारला काँग्रेसचा पाठिंबा आहे. काँग्रेसच्या दोन मंत्र्याचाही विजय यांच्या मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे, तरीसुध्दा विजय केरळमध्ये सतीशन यांच्या शपथविधी समारंभाला उपस्थित राहिले नाही. यातून त्यांनी आपण काँग्रेसला एका मर्यादेपेक्षा जास्त महत्व देणार नाही, हे दाखवून दिले.

● **दिल्लीवाला**

# सासूला पाठीवर घेऊन सुनेची पायपीट

### बँकेच्या अटीमुळे तळपत्या उन्हात पाच किमी प्रवास

◆ **रायपूर, २४ मे**

देश डिजिटल क्रांतीच्या गप्पा मारत असताना, ग्रामीण भारतातील व्यवस्थेचे क्रूर वास्तव समोर आणणाऱ्या एका घटनेने देशाला सुन्न केले आहे. केवळ पेन्शनचे पैसे मिळवण्यासाठी एका सुनेला तिच्या ९० वर्षांच्या वृद्ध सासूला पाठीवर घेऊन, तळपत्या उन्हात, नदी-नाले आणि खडकाळ रस्ते पार करत तब्बल ५ किलोमीटर पायपीट करावी लागली.

ही घटना छत्तीसगडच्या सरगुजा जिल्ह्यातील कुनिया जंगलपारा गावात घडली आहे. सुखमनिया बाई असे या सुनेचे नाव आहे. तिची ९० वर्षांची सासू चालण्याफिरण्याच्या पलीकडे आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून सुखमनिया आपल्या सासूला पेन्शनचे पैसे मिळवून देण्यासाठी असेच पाठीवर घेऊन बँकेत आणत आहे. ४२ अंश तापमानात सुखमनिया सासूला पाठीवर बसवून, जंगलातील पाऊलवाटा आणि नदी-नाले पार करत नर्मदापूर येथील सेंट्रल बँक गाठताना कॅमेऱ्यात कैद झाली.

समाज माध्यमावर या महिलेचा व्हिडीओ प्रसारित झाला. कोरोना काळात छत्तीसगड सरकारने दुर्गम भागात ज्येष्ठ नागरिकांना आणि दिव्यांगांना घरपोच पेन्शन देण्यासाठी बँक सखी योजना सुरू केली होती. डिजिटल ट्रान्झॅक्शनद्वारे घरीच पैसे देणे या योजनेचे उद्दिष्ट होते. मात्र, या अत्यंत दुर्गम भागात ही योजना कोलमडली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### माझ्याकडे दुसरा पर्यायच नाही

सुखमनियाने सांगितले की, पेन्शनचे १५०० रुपये मिळवण्यासाठी अंगठ्याचे ठसे किंवा बँक अधिकाऱ्यांसमोर प्रत्यक्ष हजेरी लावावीच लागते. त्याशिवाय बँक पैसे देत नाही. गावात वाहतुकीचे कोणतेही साधन नाही, त्यामुळे सासूला पाठीवर वाहून आणण्याशिवाय माझ्याकडे दुसरा पर्यायच उरला नाही.

# सरन्यायाधीशांची टिप्पणी पक्षपाती

### ज्येष्ठ वकील, निवृत्त सनदी अधिकाऱ्यांची पत्रातून नाराजी

◆ **नवी दिल्ली, २४ मे**

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी देशातील बेरोजगार तरुणांसंदर्भात आणि पर्यावरण कार्यकर्ते कार्यकर्त्यांवर केलेल्या टिप्पणीवर नाराजी व्यक्त करत देशातील ७१ ज्येष्ठ वकील आणि निवृत्त सनदी अधिकाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाला खुले पत्र पाठवले आहे. सरन्यायाधीशांची टिप्पणी पक्षपाती आणि पूर्वग्रहातून असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले.

सर्वोच्च न्यायालय आणि सरन्यायाधीशांना लिहिलेल्या एका खुल्या पत्रात बेरोजगार तरुण आणि राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाच्या एका आदेशाविरुद्धच्या अपिलाच्या सुनावणीदरम्यान पर्यावरण याचिकाकर्त्यांबद्दल केलेल्या टिप्पणीवर चिंता व्यक्त केली. ७१ स्वाक्षऱ्या असलेले हे खुले पत्र घटनात्मक आचारण गटाने जारी केले होते. वक्तव्यांमधून पक्षपात आणि पूर्वग्रह दिसून येतो आणि देशाच्या सर्वोच्च न्यायिक संस्थेकडून असे वक्तव्य येणे चिंताजनक आहे. एका पर्यावरणाशी संबंधित एका सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी म्हटले की, आम्हाला भारतातील असा एकही प्रकल्प दाखवा, जिथे पर्यावरण कार्यकर्ते म्हणतात की, देशाच्या प्रगतीसाठी आम्ही या प्रकल्पाचे स्वागत करतो. तसेच दुसऱ्या एका प्रकरणात देशातील बेरोजगार झुरळासारखे व्यवस्थेवर हल्ला करतात. त्यांची टिप्पणी बोगस पदवीच्या संदर्भात होती. या टिप्पणीवर पत्रातून नाराजी व्यक्त करण्यात आली. त्यांची ही टिप्पणी लेखी आदेशाचा भाग नव्हती. ◂(वृत्तसंस्था)

CMYK



जगभरातील अनेक देशांमध्ये आर्थिक आणि संसाधनांचे संकट सुरू आहे, तर भारतात परिस्थिती खूप चांगली आहे. तेव्हा नागरिकांनीही आपली जबाबदारी समजून घेतली पाहिजे आणि अनावश्यक खर्च टाळला पाहिजे.
- **जॅकी श्रॉफ**, अभिनेते


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोमवार, २५ मे २०२६ ३


प्रसाद लाड नावाचा आमदार म्हणतो की हत्ती अख्खा गेला आणि आता फक्त शेपूट राहिले आहे. लाड यांनी आधी आपल्या आमदारकीचा राजीनामा द्यावा आणि मग बोलावे. हॉटेलवाले, झाडूपोच्छा करणारी टीनपाट माणसे जरांगेचे उंबरठे झिजवत आहेत.
- **लक्ष्मण हाके**, ओबीसी आंदोलक



# बलुचिस्तानात ट्रेनवर आत्मघाती हल्ला

## ३० सैनिक ठार, ८२ लोक जखमी

- बीएलएने घेतली हल्ल्याची जबाबदारी
- रेल्वे स्थानकाची इमारत-रूळ उद्ध्वस्त



### अत्याचाराचा सूड घेतला

**बलुच लिबरेशन आर्मीच्या मजीद ब्रिगेड या आत्मघाती पथकाने एका पत्रकाद्वारे या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. त्यांनी म्हटले की, क्वेटा लष्करी छावणी येथून सैन्याला घेऊन जाणाऱ्या ट्रेनला आमच्या फिदायीन पथकाने अत्यंत सुनियोजितपणे लक्ष्य केले. पाकिस्तानी लष्कराकडून बलुचिस्तानी नागरिकांवर सुरू असलेल्या अत्याचाराचा सूड घेतला.**

◆ **क्वेट्टा, २४ मे**

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील क्वेट्टा येथील चमन फाटकाजवळ लष्करी जवान प्रवास करत असलेल्या जाफर एक्सप्रेसला स्फोटकाने भरलेल्या टेम्पोने धडक दिली, यात ट्रेनला आग लागली आणि अनेक डबे रुळावरून घसरले. या घटनेत ३० सैनिकांचा मृत्यू झाला असून, ८२ लोक जखमी आहे. शक्तिशाली स्फोटात क्वेट्टा रेल्वे स्थानकाची इमारत आणि रूळ उद्ध्वस्त झाले. बलुच लिबरेशन आर्मीने (बीएलए) या स्फोटाची जबाबदारी स्वीकारली आहे.

क्वेटा लष्करी छावणी येथून सुरक्षा दलाच्या जवानांना पेशावरकडे घेऊन जाणाऱ्या प्रवासी ट्रेनला रविवारी सकाळी लक्ष्य करून आत्मघाती बॉम्बस्फोट घडवून आणला. क्वेटा लष्करी छावणीतून प्रवाशांना घेऊन निघालेली ही ट्रेन अवघ्या काही अंतरावर असणाऱ्या चमन फाटकाजवळ पोहोचताच एका वाहनाच्या साहाय्याने हा शक्तिशाली आयईडी स्फोट घडवून आणण्यात आला. या ट्रेनमधून पाकिस्तान लष्कराचे ३०० हून अधिक जवान प्रवास करत होते. त्यांनाच लक्ष्य करून हा हल्ला करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की, ट्रेनची एक बोगी पूर्णपणे उद्ध्वस्त झाली असून इतर तीन बोगी रुळावरून घसरल्या. स्फोटानंतर ट्रेनला भीषण आग लागली. रेल्वेची बोगी पूर्णपणे जळून कोळसा झाला, यात ३० सैनिकांचा होरपळून मृत्यू झाला, तर ८० लोक गंभीर जखमी आहे. स्फोटाच्या तीव्रतेमुळे रेल्वे ट्रॅकच्या आजूबाजूला असलेल्या घरांचे आणि वाहनांचेही मोठे नुकसान झाले.

**बचावकार्य युद्धपातळीवर; शोधमोहीम सुरू**

माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि आपत्कालीन यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. सर्व जखमींना तातडीने क्वेटा येथील सिव्हिल रुग्णालय आणि लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसराला वेढा घातला असून शोधमोहीम सुरू आहे. ढिगाऱ्याखाली अजूनही काही प्रवासी अडकले असण्याची शक्यता असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

### देशभरात मेघगर्जना, मुसळधार पावसाचा इशारा

◆ **नवी दिल्ली, २४ मे**

देशात तीव्र उष्णतेच्या लाटांमध्ये मान्सूनचा वेग वाढत असून हवामानातील मोठ्या बदलांची चिन्हे स्पष्ट होत आहेत. भारतीय हवामान विभागने दिलेल्या ताज्या अंदाजानुसार जम्मू-काश्मीरपासून केरळपर्यंत आणि गुजरातपासून ईशान्य भारतापर्यंत बहुतांश राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये पुढील काही दिवसांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट, जोरदार वारे आणि मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार केरळ, लक्षद्वीप, तामिळनाडू आणि ईशान्य भारतातील राज्यांमध्ये आजपासूनच मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशी-रोहिंग्यांना परत पाठविण्यासाठी 'होल्डिंग सेंटर'

### शुभेन्दू सरकारचा निर्णय

◆ **कोलकाता, २४ मे**

राज्यात अवैध वास्तव्य करणाऱ्या विदेशी नागरिकांबाबत पश्चिम बंगाल सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. अवैध बांगलादेशी आणि रोहिंग्यांना परत पाठवण्यासाठी 'होल्डिंग सेंटर' उभारण्याचा निर्देश राज्य सरकारने दिला आहे.

याबाबत शुभेन्दू सरकारने पश्चिम बंगालमधील सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना लिखित निर्देश आणि मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. आपापल्या जिल्ह्यांमध्ये



होल्डिंग सेंटर उभारण्यासाठी जमीन शोधावी आणि पुढील कार्यवाही वेगाने करावी, असे सरकारने जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले.

सर्वाधिक घुसखोर असलेले सीमावर्ती जिल्हे आणि ठिकाणांवर पश्चिम बंगाल सरकारने लक्ष केंद्रित केले आहे. अवैध वास्तव्य करणाऱ्यांवर करडी नजर ठेवण्यासाठी होल्डिंग सेंटर उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. बंगालमधील वेगवेगळ्या भागांतून पकडलेल्या रोहिंग्या आणि बांगलादेशी घुसखोरांना थेट तुरुंगात पाठवण्याऐवजी या सेंटरमध्ये पाठवले जाईल.

या घुसखोरांची ओळख पूर्णपणे पटवली जाईपर्यंत आणि त्यांना परत कायदेशीररीत्या त्यांच्या देशात पाठवण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना या होल्डिंग सेंटरमध्ये ठेवले जाईल. (वृत्तसंस्था)

### विधानसभा निवडणुकीदरम्यान दिले होते आश्वासन

**बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान घुसखोरांना हाकलले जाईल, असे आश्वासन भाजपाने दिले होते. भाजपाने आसाममधील घुसखोरी संपुष्टात आणली, त्याच प्रकारने बंगालमधील घुसखोरीही संपवली जाईल, असे अमित शाह यांनी प्रचारसभांना संबोधित करताना सांगितले होते. सत्ता आल्यानंतर आता शुभेन्दू सरकार यांच्या नेतृत्वातील सरकार हे आश्वासन पूर्ण करीत आहे.**

# रशियाच्या हल्ल्याने युक्रेनची दाणादाण

## ● २२ नागरिक ठार, ८० गंभीर जखमी ● ७०० ड्रोन, क्षेपणास्त्रांचा मारा

◆ **कीव्ह, २४ मे**

युक्रेनने शुक्रवारी केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून रशियाने शनिवारी रात्री कीव्ह शहरासह विविध भागात ७०० पेक्षा अधिक ड्रोन आणि ओरेश्निक क्षेपणास्त्राने मारा केला. रात्रभर झालेल्या हल्ल्यात युक्रेनमधीव अनेक इमारती, रुग्णालये उद्ध्वस्त झाले, यात २२ नागरिक ठार, तर ८० पेक्षा अधिक जखमी झाले.

अण्वस्त्र वाहून नेण्यास सक्षम असलेले ओरेश्निक क्षेपणास्त्राच्या हल्ल्याने युक्रेनमध्ये दहशतीची परिस्थिती निर्माण झाली आहे. युक्रेनच्या संरक्षण विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, रशियाने निवासी भागात केलेल्या हवाई हल्ल्याने इमारतीसह पायाभूत सुविधांचे नुकसान झाले आहे. राजधानी कीव्ह शहरावर हल्ल्यासाठी पहिल्यांदा ओरेश्निक बॅलिस्टिक क्षेपणास्त्राचा वापर केला. युक्रेनच्या दिशेने ५० हून अधिक क्षेपणास्त्रे आणि ७०० हून अधिक ड्रोनचा मारा करण्यात आला. गेल्या एका वर्षातील हा सर्वात मोठा हल्ला आहे. रात्री १



वाजतापासून पहाटे ५ वाजेपर्यंत जोरदार स्फोट झाले. कीव्हचे महापौर विटाली क्लिट्स्को यांनी सांगितले की, शहराच्या जवळपास प्रत्येक भागात नुकसानीची नोंद झाली आहे. अनेक निवासी इमारती, घरे, सुपरमार्केट, शॉपिंग सेंटर्स, कार्यालये, गोदामे आणि वाहनांचे नुकसान झाले आहे. काही इमारतींचे अनेक मजले पूर्णपणे कोसळले. (वृत्तसंस्था)

### नाटो देशांची हवाई संरक्षण यंत्रणा सक्रिय

**युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी इशारा दिला की, रशियाने केलेल्या हल्ल्याला ताकदीने प्रत्युत्तर दिले जाईल. सरकारी कार्यालये, निवासी इमारती आणि शहराच्या मध्यवर्ती भागातील शाळेजवळील इमारतींना रशियाच्या हवाई दलाने लक्ष्य केले. दरम्यान पोलंडसह नाटो देशांनी लढाऊ विमाने सज्ज ठेवले असून, हवाई संरक्षण यंत्रणांना सतर्क ठेवण्याचे आदेश देण्यात आले.**

### ओरेश्निक क्षेपणास्त्र किती धोकादायक?

- **ओरेश्निक हे एक रशियन हायपरसॉनिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे.**
- **ध्वनीच्या १० पट अधिक त्याचा वेग असून, एकावेळी अनेक लक्ष्यावनर मारा करते**
- **शक्तिशाली शस्त्र जमिनीखाली तीन, चार किंवा त्याहून अधिक मजले, बंकर नष्ट करण्यास सक्षम आहे.**
- **हे क्षेपणास्त्र ५,५०० किमी अंतरापर्यंत आण्विक हल्ला करण्यास सक्षम आहे.**

### रशियन ताब्यातील भागावर हल्ला

**युक्रेनने शुक्रवारी रात्री रशियन ताब्यात असलेल्या लुहान्स्कमधील स्टारोबिल्स्क परिसरात हल्ला केला होता. रशियाचा आरोप आहे की, हा हल्ला एका वसतिगृहावर झाला, ज्यात १८ मुलांचा मृत्यू झाला. त्यानंतर राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी संरक्षण मंत्रालयाला प्रतिहल्ल्याची योजना तयार करण्याचे आदेश दिले होते.**

## चित्रपट वार्ता

### 'हेरा फेरी- ३'ला पुन्हा धक्का



**मुंबई** : प्रेक्षकांच्या दीर्घ प्रतीक्षेत असलेल्या 'हेरा फेरी' या सुपरहिट फ्रँचायझीच्या तिसऱ्या भागाला पुन्हा एकदा मोठा धक्का बसला आहे. कायदेशीर वाद आणि निर्मितीतील अडचणींमुळे आधीच चर्चेत असलेला हा चित्रपट आता प्रमुख कलाकारांपैकी एक असलेल्या परेश रावल यांच्या माघारीमुळे पुन्हा अनिश्चिततेच्या गर्तेत सापडला आहे. गेल्या वर्षी या चित्रपटाच्या शूटिंगची तयारी सुरू असतानाच परेश रावल यांनी अचानक प्रोजेक्टमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर हे प्रकरण कायदेशीर पातळीवर पोहोचले होते. मात्र काही काळानंतर त्यांनी पुन्हा एकदा बाबूराव ही लोकप्रिय भूमिका साकारण्यासाठी तयारी दर्शवल्याने चाहत्यांमध्ये आशा निर्माण झाली होती.

### 'राजा शिवाजी'ची सिंहगर्जना कायम



**मुंबई** : अभिनेता रितेश देशमुख दिग्दर्शित आणि मुख्य भूमिकेत असलेल्या'राजा शिवाजी' या ऐतिहासिक चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर आपली मजबूत पकड कायम ठेवली आहे. प्रदर्शित झाल्यानंतर २३ दिवस उलटूनही चित्रपटाची कमाई स्थिर असून प्रेक्षकांचा उत्साह कायम असल्याचे चित्र दिसत आहे. १ मे रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून चित्रपटगृहांबाहेर अजूनही गर्दी पाहायला मिळत आहे. चित्रपटाने पहिल्याच आठवड्यात सुमारे ५२.६५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला होता. दुसऱ्या आठवड्यातही हा वेग कायम राहून २४.३० कोटी रुपयांची कमाई झाली. तिसऱ्या आठवड्यातही चित्रपटाने स्थिर कामगिरी करत २२ व्या दिवशी सुमारे ७० लाख रुपयांची कमाई केली. आकडेवारीनुसार चित्रपटाची एकूण कमाई आतापर्यंत ९०.७७ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. मराठी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांमध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने मराठी आवृत्तीत अधिक मजबूत कामगिरी केल्याचे दिसून येत आहे.

### रणदीपने नाकारली होती औरंगेजेबाची भूमिका

**मुंबई** : 'छावा' चित्रपटातील औरंगजेबाची भूमिका मिळाली होती. पण तत्कालीन परिस्थिती पाहून ही भूमिका करण्यास नकार दिल्याचे अभिनेता रणदीप हुड्डाने म्हटले आहे. एका मुलाखतीत बोलताना रणदीप म्हणाला की, दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर माझ्याकडे 'छावा' चित्रपटात औरंगजेबाच्या भूमिकेसाठी आले होते. त्यावेळी मी स्वातंत्र्यवीर सावरकर चित्रपटाचे शूटिंग पूर्ण केले होते. तसेच मी एका कोर्ट प्रकरणातही अडकलो होतो. तसेच माझे वजन खूप कमी झाले होते आणि डोकेही मुंडवले होते. सोबतच त्यावेळी हिंदू-मुस्लिमबद्दल खूप चर्चा सुरू होती. ही सर्व परिस्थिती पाहता मी त्या मार्गावर पुढे जाण्यास नकार दिला. 'छावा'मध्ये औरंगजेबाची भूमिका अक्षय खन्नाने साकारली जी तुफान लोकप्रिय ठरली. २०२५ मध्ये प्रदर्शित झालेला छावा चित्रपट मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरला आणि त्याने जगभरात ७९५ कोटींहून अधिक कमाई केली होती.



# आफ्रिकन देशांचा प्रवास टाळावा

### भारतीय नागरिकांसाठी सरकारच्या सूचना

◆ **नवी दिल्ली, २४ मे**

काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदानमध्ये इबोला विषाणूच्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, भारत सरकारने आफ्रिकन देशांमध्ये अनावश्यक प्रवास टाळण्याचा सूचना जारी केल्या आहे. जागतिक आरोग्य संघटनेने इबोलाचा उद्रेक ही आंतरराष्ट्रीय चिंतेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी म्हणून घोषित केल्यानंतर सरकारने मार्गदर्शक सूचना प्रसिद्धिपत्रकातून दिल्या आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो आणि युगांडामधील इबोलाचा उद्रेक ही आंतरराष्ट्रीय चिंतेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी म्हणून घोषित केली आहे. अशातच भारत सरकारने आपल्या नागरिकांना काँगो, युगांडा आणि दक्षिण सुदानमध्ये अनावश्यक प्रवास टाळण्याच्या सूचना आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने दिल्या. प्रसिद्धीपत्रकानुसार, दक्षिण सुदानसह, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो आणि युगांडाला लागून असलेल्या देशांमध्ये रोगप्रसाराचा उच्च धोका आहे. इबोला हा एक विषाणूजन्य रक्तस्रावी ताप आहे, जो विषाणूच्या बुंदीबुग्यो स्ट्रेनमुळे होतो. हा एक गंभीर आजार असून त्यात मृत्यूचे प्रमाण जास्त आहे. सध्या, बुंदीबुग्यो विषाणू स्ट्रेनमुळे होणाऱ्या इबोला रोगाला प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्यावर उपचार करण्यासाठी कोणतीही लस किंवा विशिष्ट उपचारपद्धती नाही, त्यामुळे भारतीय नागरिकांनी या देशांचा प्रवास टाळावा. भारतात बुंदीबुग्यो विषाणू स्ट्रेनमुळे होणाऱ्या इबोला रोगाचा एकही रुग्ण आढळलेला नाही. (वृत्तसंस्था)

# 'व्हाईट हाऊस'बाहेर गोळीबाराचा थरार



### इराण मुद्यावर बैठकीवेळी घटना, हल्लेखोराला कंठस्नान

◆ **वाशिंग्टन, २४ मे**

अमेरिकेतील व्हाईट हाऊसमध्ये पुन्हा एकदा गोळीबार झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व्हाईट हाऊसमध्ये इराण मुद्यावर बैठक घेत असताना हा हल्ला झाला. या हल्ल्यादरम्यान सुरक्षा रक्षकांनी तत्काळ प्रतिसाद दिला. त्यामुळे हल्लेखोर नासीर बेस्ट या २१ वर्षीय तरुणाला कंठस्नान घालण्यात आले.

गोळीबाराचा थरार सुरू होता, तेव्हा तिथे काही पत्रकारही उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या डोळ्यांनी प्रत्यक्षात हा थरार अनुभवला. त्यातील काही पत्रकारांनी जीव वाचवण्यासाठी टेबलाखाली आश्रय घेतला. स्थानिक वेळेनुसार शनिवारी सायंकाळी ६ वाजता व्हाईट हाऊसजवळ एका बंदूकधाऱ्याने गोळीबार केला. अमेरिकेच्या सिक्रेट सर्व्हिस एजंट्सनी या हल्लेखोराला चकमकीत ठार केले. गोळीबारात एक नागरिक जखमी झाला. हल्लेखोराने आपल्या बॅगमधून शस्त्र काढले आणि गोळीबार सुरू केला. या घटनेच्या वेळी ट्रम्प व्हाईट हाऊसमध्ये इराण मुद्यावर बैठक घेत होते. परंतु त्यांच्यावर या घटनेचा कोणताही परिणाम झाला नाही, असे सिक्रेट सर्व्हिसचे कम्युनिकेशन चीफ अँथनी गुग्लिएल्मी यांनी एका निवेदनात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# काश्मिरात दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त

## सुरक्षा दलाची बारामुल्लात कारवाई, मोठ्या प्रमाणात स्फोटके जप्त

◆ **श्रीनगर, २४ मे**

उत्तर काश्मीरमध्ये सुरक्षा दलांनी संयुक्त शोध मोहीम राबवत दहशतवाद्यांचे अनेक अड्डे उद्ध्वस्त केले. बारामुल्ला जिल्ह्यातील क्रेरी परिसरात केलेल्या कारवाईत २३ स्फोटके आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले.

उत्तर काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील क्रेरी परिसरात दहशतवाद्यांच्या उपस्थितीबद्दल सुरक्षा दलांना गोपनीय माहिती मिळाली



होती. यानंतर, लष्कर आणि स्थानिक पोलिसांनी निलासर परिसरात संयुक्त शोध मोहीम सुरू केली. कारवाईदरम्यान, सुरक्षा दलांनी परिसरातील दहशतवाद्यांचा अड्डा उद्ध्वस्त करण्यात आला. तेथून मोठ्या प्रमाणात स्फोटके आणि इतर साहित्य जप्त करण्यात आल्याची माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. दरम्यान यापूर्वी, उत्तर काश्मीरमधील बांदीपोरा जिल्ह्यातील अरागम भागातील खंजपत्री जंगलातील एक मोठा दहशतवादी तळ उद्ध्वस्त केला होता. डोंगराळ भागात शोध घेत असताना, सुरक्षा दलांना नैसर्गिक गुहा आढळून आल्या. या लपण्याच्या ठिकाणी रोजच्या वापरातील कपडे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, अन्न आणि भांडीदेखील सापडली. (वृत्तसंस्था)

### विमानतळावर ४८ कोटींचा हायड्रोपोनिक गांजा जप्त

**नवी दिल्ली** : येथील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाने मोठी कारवाई करत तब्बल ४८ कोटी रुपये किमतीचा हायड्रोपोनिक गांजा जप्त केला आहे. बँकॉकहून आलेल्या दोन थायलंड नागरिकांकडून हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असून, अलीकडच्या काळातील विमानतळावरील ही सर्वात मोठ्या ड्रग्ज कारवाईंपैकी एक मानली जात आहे. विमानतळाचे सीमाशुल्क आयुक्त अरविंद सरन यांनी ही माहिती दिली.

# ट्विशा शर्मावर अंतिम संस्कार; दुसऱ्यांदा केले शवविच्छेदन

◆ **भोपाळ, २४ मे**

भोपाळ येथील ट्विशा शर्माचे रविवारी दुपारी दुसऱ्यांदा शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर सायंकाळी भोपाळ येथे तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान याप्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली आहे. सुनावणीसाठी सोमवारची तारीख निश्चित करण्यात आली आहे.



भोपाळ येथील एम्स रुग्णालयात तीन तास शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर मृतदेह नातेवाईकांकडे सोपविण्यात आला.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांचे खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी घेणार आहे. न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि विपुल मनुभाई पांचोली हे देखील या खंडपीठाचा भाग आहेत. हे प्रकरण शनिवारी, २३ मे रोजी सायंकाळी ६:२३ वाजता सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आले होते. सासरच्या घरी ट्विशाच्या झालेल्या अनैसर्गिक मृत्यू प्रकरणी कथित संस्थात्मक भेदभाव आणि प्रक्रियात्मक अनियमिततेचा आरोप यात करण्यात आला आहे.

मध्य प्रदेश उच्च न्यायालयात याच प्रकरणाची सुनावणी सोमवारी होणार आहे. तथापि, मध्य प्रदेश उच्च न्यायालय ट्विशाच्या सासू, माजी न्यायाधीश राजबाला सिंह यांच्या अटकपूर्व जामिनाच्या अर्जावर सुनावणी घेणार आहे, ज्याविरोधात मध्य प्रदेश सरकारने याचिका दाखल केली आहे. (वृत्तसंस्था)

# स्पेसएक्स स्टारशिपची मोहीम फत्ते





## यशस्वी उड्डाणानंतर हिंद महासागरात सुरक्षितपणे उतरण्यात यश

◆ **टेक्सास, २४ मे**

मानवाला चंद्र आणि मंगळ ग्रहावर घेऊन जाण्याचा दावा करणारे एलन मस्क यांच्या सर्वात महत्त्वाकांक्षी स्पेसक्राफ्ट स्टारशिपची यशस्वी चाचणी झाली. टेक्सासवरून लॉन्च झालेले रॉकेट अंतराळात यशस्वी उड्डाण केल्यानंतर हिंद महासागरात सुखरूप उतरले.

टेक्सासच्या दक्षिण टोकावरील स्टारबेस प्रक्षेपण पॅडवरून उड्डाण केल्यानंतर इंजिनमध्ये बिघाड झाला. यामुळे रॉकेट नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला होता. तरीही, सुमारे एक तासानंतर स्टारशिप स्पेसक्राफ्ट हिंद महासागरात सुरक्षितपणे उतरण्यात यशस्वी झाले.

स्पेएक्सने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, स्टारशिप मालिकेची यापूर्वीही अनेक प्रक्षेपणे झाली, परंतु तिसऱ्या पिढीतील (व्ही-३) या विकसित केलेल्या रॉकेटची ही पहिलीच चाचणी होती आणि स्टारशिपची १२ वी चाचणी होती. भारतीय वेळेनुसार शनिवारी सकाळी याचे प्रक्षेपण करण्यात आले.

या चाचणीचा मुख्य उद्देश रॉकेट यशस्वीरित्या प्रक्षेपित करणे, त्याला वर घेऊन जाणे, वरच्या भागापासून (स्टारशिप) वेगळे करणे आणि नंतर इंजिन पुन्हा सुरू करून समुद्रात (गल्फ ऑफ अमेरिका) ठरलेल्या ठिकाणी सुरक्षितपणे उतरवणे हा होता. (वृत्तसंस्था)

### अंतराळाची प्रदक्षिणा करून माघारी

**लॉन्चिंगनंतर स्टारशिप आपल्या बूस्टरपासून वेगळे झाले. अंतराळात पृथ्वीची प्रदक्षिणा घालत पुन्हा पृथ्वीकडे परतले. शास्त्रज्ञांनी याच्या लँडिंगसाठी हिंद महासागरातील एका निर्जन भागाची आधीच निवड केली होती, जिथे स्पेसएक्सची टीम आणि ट्रॅकिंग शिप्स आधीपासूनच तैनात होत्या. स्टारशिप पृथ्वीच्या वातावरणात परतले, तेव्हा त्याचा वेग कमी करण्यासाठी लँडिंग बर्न प्रक्रिया सुरू करण्यात आली. पाण्यात पडण्यापूर्वी अवघ्या काही सेकंद आधी रॉकेटने स्वतःला सरळ (लँडिंग ओरिएंटेशन) केले, हे या मोहिमेमधील सर्वात कठीण आणि आव्हानात्मक काम मानले जात होते.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# हा पराभव जिव्हारी लागायला हवा...

गेल्या काही दशकांत शिक्षण क्षेत्रात अत्यंत धोकादायक असा प्रवाह वाढताना दिसतो आहे आणि त्याचे नाव ठेवले गेले आहे- डमी कॉलेज संस्कृती. विद्यार्थ्याने नावाला कुठल्या तरी महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा, पण प्रत्यक्षात कॉलेजमध्ये जायचेच नाही. वर्षभर खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये बसायचे आणि कॉलेज केवळ उपस्थिती, अंतर्गत गुण आणि बोर्ड किंवा विद्यापीठाच्या प्रक्रियांसाठी वापरायचे. अनेक शहरांत ही गोष्ट इतकी सामान्य झाली आहे की जे काही सुरू आहे ते चुकीचे आहे, असे कुणालाच वाटत नाही. या स्थितीमुळे शिक्षणाचा आत्माच हरवत चालला आहे. मेडिकल आणि इंजिनीअरिंग प्रवेशाच्या वाढत्या शर्यतीमुळे खाजगी क्लासेसचे जाळे प्रचंड वाढले. सुरुवातीला हे क्लासेस विद्यार्थ्यांना अभ्यासात मदत करणारे आणि स्पर्धेसाठी तयार करणारे माध्यम होते. हळूहळू त्यांनी शिक्षण व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहाची जागा घेतली. आता बहुसंख्य पालकांचे आणि विद्यार्थ्यांचे मत असे झाले आहे की, शाळा आणि महाविद्यालये या केवळ औपचारिकता आहेत. खरे शिक्षण कोचिंग क्लासेसमध्येच मिळते. अनेक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची बाके रिकामी दिसतात. शहरांमध्ये तर महाविद्यालये आणि त्यातही अकरावी-बारावीचे वर्ग अत्यंत भकास दिसतात. परीक्षेच्या वेळा वगळता प्रयोगशाळा रिकाम्या असतात. ग्रंथालयात औदासीन्य असते. कोचिंग क्लासेसमध्ये मात्र गर्दी असते. भल्या सकाळपासून रात्रीपर्यंत बॅचेस चालू असतात. या संपूर्ण प्रक्रियेत व्यक्तिमत्त्व विकास, वैचारिक जडणघडण, सामाजिक जाणीव या गोष्टी मागे पडतात.

डमी कॉलेज संस्कृती फोफावण्यामागे आर्थिक आणि संस्थात्मक साटेलोटे आहेच. उघड गुपित असे की, अनेक खाजगी क्लासेस आणि महाविद्यालयांमध्ये अनौपचारिक करार असतात. विद्यार्थी कॉलेजला आला नाही तरी त्याची उपस्थिती लावली जाते, अंतर्गत गुण दिले जातात. काही ठिकाणी तर पालकांना स्पष्ट सांगितले जाते की- ‘‘कॉलेजची चिंता करू नका...आम्ही पाहून घेतो...’’ हे सारे उघडपणे सुरू असते. त्यामुळे शिक्षण विभागाला त्याची माहिती नसते असे म्हणताच येत नाही. परिणाम असा होतो की, मोठा पगार घेणारे शाळा किंवा महाविद्यालयांचे शिक्षक शिकवायला येतात, पण विद्यार्थीच नसतात. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील जिवंत संवाद आता होत नाही. चर्चासत्रे, वादविवाद, सांस्कृतिक कार्यक्रम, विद्यार्थी संघटना हे सारे जणू चुकीचे होते आणि आता जे सुरू आहे तेच योग्य आहे, असे वाटण्यासारखी परिस्थिती आहे. खरे तर शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे सामाजीकरण होते. वेगवेगळ्या आर्थिक, सामाजिक, भाषक पृष्ठभूमीचे विद्यार्थी एकत्र येतात. एकमेकांची मते समजून घेतात. नेतृत्व विकसित होते. अनेकांना आयुष्यभराचे मित्र तेथे मिळतात. काहींना स्वतःमधील सुप्त गुणांचा आविष्कार होतो. डमी कॉलेज संस्कृतीमुळे विद्यार्थ्यांचे हे संपूर्ण सामाजिक जगच संकुचित झालेले आहे. एक वर्ग संपला की लगेच दुसरी बॅच सुरू होते. शिक्षण कमी आणि उत्पादन प्रक्रिया अधिक. विद्यार्थ्यांचे शारीरिक, मानसिक आरोग्य राहिले बाजूला. पुढे येते ते निकालांचे बाजारछाप प्रदर्शन. टॉपर विद्यार्थ्यांचे फोटो, मोठे होर्डिंग्ज, जाहिराती इत्यादी. हजारो विद्यार्थ्यांपैकी मोजकी यशस्वी उदाहरणे पुढे करून उर्वरित विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक दबाव तयार केला जातो. अशा जाहिराती पाहून पालकांनाही वाटते की आपल्या मुलाने या शर्यतीत राहिलेच पाहिजे. त्यातून कुटुंबात ताण निर्माण होतो. शिक्षक पूर्वी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच, शिक्षक मंडळी त्यांच्या स्वभावाकडे, अडचणींकडे, मानसिक स्थितीकडे लक्ष देत असत. आता हा व्यवहार शुल्कापुरता मर्यादित झाला आहे. क्लासेस फी घेतात, टेस्ट घेतात आणि निकाल दाखवतात. पालकांना समाधान वाटते की मुलगा ‘‘योग्य ट्रॅकवर’’ आहे. पण तो खरोखर आनंदी आहे का, त्याला काय समजते आहे, त्याचा वैचारिक विकास होतो आहे का, असे सारे प्रश्न कुणालाच पडत नाहीत. अशा परिस्थितीत महाराष्ट्राचे शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणतात त्याप्रमाणे सर्व महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती सक्तीची करणे आवश्यक आहे यात वाद नाही. विद्यार्थी प्रत्यक्ष कॉलेजमध्ये येतो की नाही, याची डिजिटल नोंद असली पाहिजे आणि पुरेशी उपस्थिती नसल्यास परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जाऊ नये. उपस्थितीचे नियम केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष अंमलात आले पाहिजेत. मात्र, केवळ तांत्रिक उपायांनी हा प्रश्न सुटणार नाही. शिक्षण खात्यातील भ्रष्टाचार हे या समस्येचे महत्त्वाचे कारण आहे. संस्थांच्या व शिक्षकांच्या मान्यतांमध्ये, नियुक्त्यांमध्ये आणि आर्थिक प्रक्रियांमध्ये भ्रष्टाचाराच्या तक्रारी सतत होत असतात. शालार्थ घोटाळ्याचे मुद्दे अजूनही चर्चेत आहेत. ‘नीट’चा पेपर अशाच साट्यालोट्यातून फुटला हेही वास्तव. यात सुधारणा करायची असेल तर शैक्षणिक यंत्रणेचे प्रशासन पारदर्शक करावे लागेल. कोचिंग क्लासेसना नियंत्रणात आणावे लागेल आणि महाविद्यालयांना जबाबदार धरावे लागेल. डमी कॉलेज संस्कृतीचा सर्वांत मोठा तोटा माणूस घडण्याच्या प्रक्रियेत होत आहे. आपण आता सुधारलो नाही तर पुढील काही वर्षांत आपल्याकडे सामाजिक समज अत्यल्प असलेली पिढी तयार होईल. शिक्षणाची चर्चा झाली की लगेच गुण, रँक, पर्सेंटाईल, कट-ऑफ, सिलेक्शन या गोष्टी सर्वांच्या डोळ्यासमोर येतात. पालकांपासून संस्थांपर्यंत सर्वांचे लक्ष केवळ निकालांवर केंद्रित झाले आहे. कोचिंग क्लासेसचे ध्येयच मर्यादित असते. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त गुण मिळवून देणे एवढेच त्यांचे काम. त्यामुळे तेथे शिकवण्याची पद्धतही तशीच असते. वेग, तंत्र, शॉर्टकट, ट्रिक्स, प्रश्नांचा पॅटर्न, वेळ व्यवस्थापन या गोष्टींवर भर असतो. पण, ही तांत्रिक बाजू म्हणजे शिक्षणाचा केवळ एक भाग आहे, संपूर्ण शिक्षण नव्हे. शाळा किंवा महाविद्यालयीन शिक्षणाचा गाभा वेगळा असतो. वर्गात एखाद्या मुद्यावर चर्चा होते, विद्यार्थी त्यात सहभागी होतात, वेगवेगळे दृष्टिकोन समोर येतात. ही प्रक्रिया व्यक्तिमत्त्व घडवणारी असते. विद्यार्थी विचार करायला शिकतो. समाजात मतभेद असतात, विविधता असते, अनेकदा संघर्षही असतो हे त्याला महाविद्यालयाच्या वर्गात समजते. डमी कॉलेज संस्कृतीमुळे विद्यार्थ्यांचे हे नैसर्गिक सामाजिक शिक्षण संपत चालले आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत कोचिंग क्लासेसमध्ये बसणारा विद्यार्थी फक्त स्पर्धात्मक जगात वावरतो. त्याच्या आयुष्याचे ध्येय रँक हेच बनते. तो सतत तुलना, स्पर्धा आणि दडपण यांच्या वातावरणात जगतो. याउलट, महाविद्यालयीन वातावरण विद्यार्थ्याला समाजाची ओळख करून देते. ग्रामीण भागातून आलेला विद्यार्थी शहरातील वास्तव पाहतो. आर्थिकदृष्ट्या सक्षम मुलांना संघर्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांचे आयुष्य समजते. वेगवेगळे समुदाय, भाषा, विचारसरणी, संस्कृती यांचा परिचय होतो. काही जण पहिल्यांदा सार्वजनिक मंचावर बोलतात. काहींना नाटक, साहित्य, संगीत, राजकारण, सामाजिक कार्य यांची आवड तेथे गवसते. अनेकांना स्वतःची ओळखच कॉलेजमध्ये मिळते. कोचिंग क्लासेस यातले काहीही देऊ शकत नाहीत. कारण त्यांची रचना परिपक्व माणूस घडवण्यासाठी नव्हे जास्तीचे गुण देण्यासाठीच असते. कॉलेजमधील निवांत चर्चा, ग्रंथालयात बसून वाचन, मित्रांशी मतभेद-चर्चा, शिक्षकांशी संवाद या गोष्टी आता वेळ वाया घालविणाऱ्या मानल्या जाऊ लागल्या आहेत. प्रत्येक मिनिटाचा आर्थिक आणि स्पर्धात्मक हिशेब लावला जातो. ही मानसिकता धोकादायक आहे. शेवटी समाजाला फक्त भरपूर गुण घेऊन बाहेर पडणारे युवक नको असतात. समाजाला विचार करणारे, प्रश्न विचारणारे, संवेदनशील आणि सामाजिक भान असलेले नागरिक लागतात. अशी माणसे कोचिंग क्लासेसमध्ये तयार होत नाहीत. त्यासाठी जिवंत वातावरण असलेली महाविद्यालयेच हवीत. या विषयाकडे सर्वांचे दुर्लक्ष झाल्यामुळे आता महाविद्यालयांची जागा कोचिंग क्लासेसने घेतलेली आहे. महाविद्यालये फक्त नावापुरती उरली आहेत. हा संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेचा पराभव आहे. हा पराभव सर्वांच्या जिव्हारी लागला पाहिजे. आपली शिक्षण व्यवस्था संचालित करणाऱ्यांच्या जिव्हारी तो अद्याप लागला नसेल तर शिक्षणाचा गाडा लवकरच चिखलात रुतेल हे सांगण्यासाठी भविष्यवेत्ता नको.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# चिनी गुलाब आणि रशियन काटे!

व्हाईट हाऊसच्या दालनात आता चिनी गुलाब फुलणार आणि सोबत रशियन काटेही असणार! अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतिन यांच्या एका मागोमाग झालेल्या चीन दौऱ्यांचे हे एकमेव फलित मानले जाते.

राष्ट्रपती ट्रम्प यांनी अगदी चुकीच्या वेळी चीनला भेट देत चीनला एक जागतिक ‘महासत्ता’ म्हणून मान्यता दिली. १९९० च्या दशकात सोवियत नेते मिखाईल गोर्बाचोव्ह यांनी आपल्याच देशाचे विखंडन करीत, अमेरिकेला जगाची एकमेव महासत्ता बनविले होते आणि ३६ वर्षांनंतर अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्याच देशाचे खच्चीकरण करीत एकप्रकारे चीनला महासत्ता घोषित केले. आता जगात पुन्हा दोन महासत्ता स्थापित झाल्या आहेत. एक अमेरिका आणि दुसरी चीन!

**आण्विक सर्वोच्चता :** जगातील ९ देशांजवळ आण्विक शक्ती आहेत. यातील उत्तर कोरिया, पाकिस्तान, रशिया हे तीन आण्विक शक्ती असलेले देश चीनच्या बाजूने आहेत तर ब्रिटन, फ्रान्स, भारत तटस्थ आहेत आणि फक्त इस्रायलच काय तो अमेरिकेच्या बाजूने आहे. इराणने आण्विक शक्ती प्राप्त केल्यास आणखी एक आण्विक देश चीनच्या गोटात सामील झालेला असेल. म्हणजे जगातील सर्वांत मोठी आण्विक शक्ती चीनजवळ असेल.

**वेळच चुकली :** राष्ट्रपती ट्रम्प यांची चीन दौऱ्याची वेळ साफ चुकली. इराणने मध्यपूर्वेतील अमेरिकेची लष्करी तळे बेचिराख केल्याची छायाचित्रे साऱ्या जगात प्रसारित होत आहेत. अमेरिकन प्रसार माध्यमांनीच ती सर्वप्रथम दाखविली. काही लष्करी तळे तर एवढी निकामी झाली आहेत की त्यांचा वापर थांबविण्यात आला आहे. आजवर अभेद्य मानल्या जाणाऱ्या एफ-३५ या लढाऊ विमानासही इराणने लक्ष्य करण्यात यश मिळविले. अमेरिकेच्या मित्र देशांना- कुवैत, सौदी अरेबिया, बहरीन, संयुक्त अरब अमिरात, कतार- यांनाही इराणने जायबंदी केले. एका लहान देशाने अमेरिकेसारख्या महासत्तेस जेरीस आणले असताना, ट्रम्प यांनी चीनच्या दौऱ्यावर जावे यासारखा आत्मघातकी निर्णय नव्हता.

**सल्ला झुगारला :** राष्ट्रपती ट्रम्प यांनी इराण युद्धाचे कारण सांगून आपला चीन दौरा स्थगित ठेवावा असा सल्ला त्यांना देण्यात आला होता. उपराष्ट्रपती व्हान्स व परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो या दोघांनीही असा सल्ला दिला होता. पण, ट्रम्प कुणाचेही ऐकण्याच्या मन:स्थितीत नसल्याने त्यांनी आपल्याच सहकाऱ्यांचा सल्ला ऐकण्याचा प्रश्नच नव्हता. उलट चीनने युद्धबंदीसाठी इराणवर दबाव टाकावा यासाठी आपल्याला या दौऱ्यात प्रयत्न करता येतील असा ट्रम्प यांचा युक्तिवाद होता. इराण हा चीनचा जिवलग साथीदार, व्यापाराचा भागीदार. आपल्या भागीदारावर आणि अमेरिकेच्या कट्टर शत्रूवर चीन कसा दबाव टाकणार? चीनने अमेरिका-इराण युद्धापासून स्वतःला दूर ठेवण्याचा निर्णय घेतला. मात्र, मागून इराणला सर्वप्रकारचे लष्करी तंत्रज्ञानही तो पुरवीत आहे.



**गुलाबाचे बी :** राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या चीन दौऱ्यात काय मिळविले असा प्रश्न विचारला जात आहे. बोईंगसाठी २०० विमानांची ऑर्डर, बीन्सचा पुरवठा यासारख्या बाबी ट्रम्प सांगत असले तरी त्यांच्या पदरी फक्त गुलाबाचे बी पडले आहे, जे चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिन पिंग यांनी अमेरिकेला देऊ केले आहे. राष्ट्रपती ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमधील ओव्हल कार्यालयाचा काही भाग जमीनदोस्त केला असून त्याठिकाणी ते अत्याधुनिक सभागृह बांधणार आहेत. यासाठी तेथील गुलाबाच्या बगीच्याचाही बळी देण्यात आला. तेथे ट्रम्प हे बी लावणार आहेत. म्हणजे व्हाईट हाऊसच्या प्रांगणात चिनी गुलाब फुललेले दिसतील. मात्र, सोबत रशियाचे काटेही असतील. ट्रम्प यांच्या पाठोपाठ चीनमध्ये जाऊन रशियाचे राष्ट्रपती पुतिन यांनी अमेरिकेच्या विरोधातील आपली मोर्चेबांधणी अधिक बळकट केली आहे.

**चीनने ठणकावले :** राष्ट्रपती ट्रम्प यांच्या दौऱ्याचे निमित्त साधून चीनने तैवानबाबत अमेरिकेला ठणकाविले. तैवानबाबत अमेरिकेने कोणताही हस्तक्षेप करू नये अशा करड्या शब्दात चिनी राष्ट्रपती जिन पिंग बोलले. यावर ट्रम्प काहीच बोलले नाहीत. अखेर तैवानबाबत अमेरिकेची भूमिका स्पष्ट करण्याची जबाबदारी की कामगिरी परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांच्यावर येऊन पडली. रुबियो यांनी परखड शब्दात चीनला सुनावले. तैवानबाबत अमेरिकेच्या भूमिकेत कोणताही बदल झालेला नाही आणि कोणत्याही देशाने बळजबरीने तैवानबाबत निर्णय घेऊ नये, असे रुबियो यांनी स्पष्ट केले.

**रुबियोंचे नामकरण :** मार्को रुबियो हे चीनविरोधी भूमिका घेणारे नेते म्हणून ओळखले जातात. मागील काही वर्षांत त्यांनी चीनच्या विरोधात सातत्याने भूमिका घेतली आहे. चीनने त्याची दखल घेत रुबियो यांच्या चीन प्रवेशावर प्रतिबंध घातला होता. हाँगकाँगबाबत त्यांनी चीनच्या धोरणांचा जोरदार विरोध केला होता. त्याचा परिणाम म्हणजे रुबियो यांना चीनमध्ये प्रवेश नव्हता. पण, आता ते परराष्ट्र मंत्री म्हणून राष्ट्रपती ट्रम्प यांच्यासोबत चीनला येणार असल्याने, त्यांचा चीन प्रवेश रोखणे शक्य नव्हते. यासाठी चीनने नवी युक्ती शोधून काढली. त्यांनी रुबियो यांचे नावच बदलले. यासाठी चिनी आद्याक्षरांचा फायदा उललण्यात आला आणि रुबियो यांचे नामकरण मार्को लू असे करण्यात आले. म्हणजे राष्ट्रपती ट्रम्प यांच्यासोबत मार्को रुबियो यांच्याऐवजी मार्को लू गेले होते अशी नोंद चिनी दस्तावेजात करण्यात आली आहे.

**भारताची भूमिका :** भारत या साऱ्या घटनाक्रमाकडे शांतपणे पाहत आहे. चीन व अमेरिका या दोन्ही देशांशी भारताचे चांगले संबंध आहेत. इराण आणि इस्रायलसोबतही भारताचे जवळचे संबंध आहेत. भारताने या युद्धात मध्यस्थी करावी असा आग्रह इराणतर्फे केला जात असला तरी पाकिस्तान यात मध्यस्थी करीत असल्याने भारताने यात न पडण्याचा निर्णय घेतला व तो योग्य मानला जातो.

**स्थिती गंभीर :** दरम्यान, इराण-अमेरिका युद्धात साऱ्या जगाची व भारताची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचे मानले जाते. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी केली आहे. याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने इराणच्या बंदरांची नाकेबंदी केली आहे. या दोन नाकेबंदीत जगाच्या अर्थव्यवस्थेची नाकेबंदी होत आहे. आता तर फक्त पेट्रोलियम पदार्थांचाच तुटवडा जाणवत आहे. एकदा का भारतात पेरणीचा हंगाम सुरू झाला की रासायनिक खतांचा तुटवडा जाणवू लागेल व त्याचा परिणाम देशाच्या कृषी उत्पादनावर होणार आहे. ते झाल्यास अन्नधान्याचे एक अभूतपूर्व संकट देशात तयार होऊ शकते.

**रुपयाची घसरण :** २८ फेब्रवारी रोजी हे युद्ध सुरू झाल्यापासून रुपयाची सुरू झालेली घसरण अद्याप थांबलेली नाही. येणाऱ्या काही दिवसांत वा आठवड्यांत एका डॉलरसाठी १०० रुपये मोजावे लागतील. याचा दुसरा अर्थ युद्ध सुरू झाल्यानंतर डॉलरच्या तुलनेत रुपयाची १० टक्के घसरण झाली आहे. याचा मोठा अर्थ म्हणजे देशावरील विदेशी कर्ज १० टक्के वाढणार आहे. भारत सरकारसाठी हे एक मोठे आव्हान राहणार असून, ते हाताळण्याची तयारी सरकारने सुरू केली आहे. वाढती महागाई, बेरोजगारी, पेट्रोलियम पदार्थांचा सुरळीत पुरवठा व रासायनिक खतांची उपलब्धता अशा या चार प्रमुख आघाड्यांवर सरकारला काम करावे लागणार आहे.

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# सालंकृत कन्यादान कशाला?

आपल्या देशात जन्म, मरण, लग्न, सणवार अशा क्षणांना अतिशय महत्त्वाचे स्थान दिले जाते. या प्रत्येक क्षणाशी अर्थकारण निगडित आहे. त्यातही लग्न हा विषय अतिशय जिव्हाळ्याचा असल्याने त्याच्यासोबतची आर्थिक गणितंही बरीच मोठी आहेत. घरात मुलगी जन्माला आल्यापासून तिच्या लग्नाचा विषय घरच्यांमध्ये अक्षरशः भिनलेला असतो. मुलीचे शिक्षण नीट झाले पाहिजे, हा विचार आता कुठे समाजात रुजतोय. पण, त्याच्यासोबत लग्नाचा विचार पिच्छा पुरवतोच. मग लग्नासाठी आई-वडिलांकडून सोन्याचा दागिना दिला पाहिजे, ही अघोषित परंपरा पिढ्यान्‌पिढ्या सुरू आहे. अर्थात, दागिना हा एखादा दागिना नसतो. लग्नाची बोलणी करणारे मुलाकडील ‘चतुर’ लोक याला ‘सालंकृत कन्यादान’ म्हणतात. आम्हाला काही नको, तुम्ही मुलीचे सालंकृत कन्यादान करणारच ना, असे वाक्य ते हमखास फेकून मारतात. मग मुलीकडील बोलणी करणारे म्हणतात, हो-हो, आम्ही यथाशक्ती सालंकृत कन्यादान करूच. या सालंकृत कन्यादान शब्दाचा जेव्हा आढावा घेतला तेव्हा लक्षात आले की, त्यात डोक्यापासून पायापर्यंतच्या सर्व अलंकारांचा समावेश होतो. म्हणजे वडिलांकडून मुलीला इतके सोने मिळणारच आहे. यासाठी मग त्या मुलीच्या वडिलांची काय ससेहोलपट होईल, याची कोणाला तमा नसते. पण, आता काळ बदलला आहे, असे आपण म्हणत असू तर अशा परंपरांमध्येही बदल व्हायलाच हवा. विशेष म्हणजे, मुलाकडच्या मंडळींनी आपल्या होणाऱ्या सुनेला मंगळसूत्रापलीकडे फार काही देणे अपेक्षित नसते. तरीही आजकाल बरेच काही दिले जाते. म्हणजे दोन्ही पक्षांकडून नवरीवर सोन्याची नुसती लयलूट असते. असो. पण, मुळात लग्नात सालंकृत कन्यादान केले नाही तर काय बिघडणार आहे?



यावर काही ‘जाणते’ लोक तर्क सांगतात की, सोने अडल्या-नडल्या वेळी कामी येणार. म्हणून सोने खरेदी करण्याची परंपरा आपल्या देशात आहे. मुलीच्या भविष्यातील अडल्या-नडल्या वेळेसाठी सोनेच दिले पाहिजे, ही सक्ती कशाला? तुमच्याकडे पैसा असेल तर तिला एफडी करून द्या. आजकाल गुंतवणुकीच्या हजारो योजना आहेत. त्यातील एखाद्या सरकारी बँकेतील उत्तम योजनेत तिच्या नावाने पैसे गुंतवा. तो पैसा तिला यथावकाश सोपवा आणि तुला जेव्हा खऱ्या अर्थाने गरज पडेल तेव्हाच तो वापर हे सांगून ठेवा. तिच्या मिळकतीतून तिला बचत करायला शिकवा. ही सवय तिच्यावर वाईट वेळ येऊच देणार नाही. त्यासाठीही आजकाल एसआयपी आणि राष्ट्रीयीकृत बँकांच्या पीपीएफसारख्या असंख्य योजना आहेत. आजकाल तर बहुतांश सरकारेदेखील मुलीच्या जन्मापासून तिच्यासाठी पैशाची तरतूद करून ठेवतात. पण, हा पैसा तिच्या लग्नासाठी म्हणून वापरण्यापेक्षा तिला पायावर उभे करण्यासाठी वापरला जावा. ती आत्मनिर्भर झाली तर तिला भविष्यकाळात सोन्याचीही कमतरता राहणार नाही आणि सोने विकण्याचीही गरज पडणार नाही.

याचाच दुसरा विचार म्हणजे, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या वर्षभरात सोने खरेदी करू नका, असे आवाहन केले आहे. आपण नाहीच खरेदी केले सोने तर काय बिघडणार आहे? काहीही बिघडणार नाही. आपल्या देशाच्या भल्यासाठी त्यांनी केलेले हे आवाहन आपण सहकार्य केले तरच यशस्वी ठरणार आहे. कधीकाळी देशावर अशी वेळ आली होती जेव्हा तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी लोकांना एक वेळेच्या जेवणाचा त्याग करा, असे आवाहन केले होते. जेव्हा देशाचे नेतृत्व आपल्या नागरिकांना कळकळीने काही गोष्टी सांगत असेल तेव्हा त्याचा सकारात्मक विचार व्हायला हवा. आज जागतिक स्तरावर असणारे वातावरण संघर्ष आणि तणावाचे आहे. अशा स्थितीत देशाची अर्थव्यवस्था सांभाळणे हे फार मोठे आव्हान सरकारसमोर आहे. म्हणून त्यांच्या वतीने या आव्हानाला पेलण्यासाठी आपण त्याचे ‘आवाहन’ अंगीकारणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी वाट्टेल त्या इच्छांना आणि अनिष्ट परंपरांना मुरड घालावी लागली तरीही बेहत्तर, पण देशहित सर्वोपरी असावे. मुलीच्या लग्नात तिच्या अंगावर सोन्याचे दागिने नसतील तर बापाला वाईट वाटेल. पण, पुढील काळाच्या दृष्टीने तर समाजाने लग्न व्यवस्थेतून सोन्याच्या दागिन्यांनाच फाटा दिला तर तिच्या जन्मासोबतच तिच्या लग्नाचा खर्च दिसणार नाही आणि पर्यायाने मुलीच्या जन्माचा आनंद द्विगुणित होईल.

७७५५९३८८२२

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# काटकसरीचे राजकारण

जागतिक संकटाच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधानांचा विदेश दौरा उलटसुलट चर्चांचा ठरलेला आहे. परंतु त्याची गरज काय होती, सद्यःस्थितीत त्याचे महत्त्व काय आहे आणि भारतासाठी त्याचे परिणाम काय आहेत हे जाणून घेणे देशवासीयांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे.

अलिकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोल-डिझेलची बचत करण्याचे, अनावश्यक परदेश प्रवास टाळण्याचे आणि काही काळ सोने खरेदी न करण्याचे आवाहन केले. पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक तेलबाजार अस्थिर झाला आहे आणि त्याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होत आहे. भारत हा जगातील मोठ्या तेल आयातदार देशांपैकी एक असल्यामुळे वाढत्या कच्च्या तेलाच्या किमती, परकीय चलन साठ्यावर येणारा ताण आणि वाढती आयात ही सरकारसाठी चिंता बनली आहे. त्यासाठी पंतप्रधानांनी काटकसरीचे आवाहन भारतीयांना केलेले आहे. १९६५ च्या युद्धाच्या वेळेला त्यावेळेसचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी सुद्धा एक वेळ उपवास करण्याचे आवाहन केले होते. परंतु त्यावेळेला याला राजकीय चष्म्यातून पाहिले गेले नव्हते. लालबहादूर शास्त्रींना मानणाऱ्या लोकांना अंधभक्त म्हटले जात नव्हते. मोदींना मानणारे मात्र अंधभक्त ठरतात.

या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारमधील अनेक मंत्र्यांनी आपले विदेश दौरे कमी केले किंवा रद्द केले. महाराष्ट्र सरकारमधील मंत्र्यांनी सुद्धा आपले विदेश दौरे रद्द केले. त्यामुळे विरोधकांकडून प्रश्न उपस्थित करण्यात आले की, जेव्हा देशवासीयांना काटकसरीचा सल्ला दिला जात आहे, तेव्हा पंतप्रधानांनी स्वतः विदेश दौरा का काढला? परंतु या प्रश्नाचे उत्तर भारताच्या परराष्ट्र धोरणात आणि जागतिक राजकारणातील भारताच्या भूमिकेत दडलेले आहे. जगावर जेव्हा युद्धाचे ढग दाटलेले आहेत अशा परिस्थितीत शत्रू मित्रांच्या कल्पना बदलत असतात. आपल्याला चांगल्या पुरवठादारांचा शोध आहे तसाच जगातील अनेक देशांना चांगल्या ग्राहक राष्ट्रांचा सुद्धा शोध असतोच. युद्ध हे जगाकरिता संकट असले तरी त्यातून काही संधी सुद्धा निर्माण होऊ शकतात हे समजण्यासाठी राजनीतिक कूटबुद्धीची आवश्यकता असते. समाज माध्यमांवर तलवार चालविणारे आणि व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी हे समजू शकत नाहीत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या महत्त्वपूर्ण विदेश दौऱ्यामध्ये संयुक्त अरब अमिरात, नेदरलॅण्ड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या देशांचा समावेश होता. या सर्व देशांशी भारताचे आर्थिक, ऊर्जा, संरक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील संबंध अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. दौऱ्याची सुरुवात संयुक्त अरब अमिरातपासून झाली. पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थिती लक्षात घेता हा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला गेला. येथे पंतप्रधानांनी ऊर्जा सुरक्षा, दीर्घकालीन गॅस पुरवठा, गुंतवणूक आणि सागरी सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण चर्चा केली. भारताच्या ऊर्जा गरजांसाठी संयुक्त अरब अमिरात हा एक महत्त्वाचा भागीदार मानला जातो. जागतिक तेल संकटाच्या काळात ऊर्जा पुरवठा स्थिर ठेवणे भारतासाठी अत्यंत आवश्यक आहे. यानंतर पंतप्रधानांनी नेदरलॅण्ड्सला भेट दिली. या भेटीदरम्यान भारत आणि नेदरलॅण्ड्स यांनी ‘धोरणात्मक भागीदारी’ची घोषणा केली. सेमीकंडक्टर, हरित हायड्रोजन, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा क्षेत्रांमध्ये १७ करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. आजच्या डिजिटल आणि तंत्रज्ञानावर आधारित जगात सेमीकंडक्टरचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. भारताला इलेक्ट्रॉनिक्स आणि तंत्रज्ञान क्षेत्रात स्वावलंबी बनवण्यासाठी हे सहकार्य महत्त्वपूर्ण ठरू शकते.

स्वीडन दौऱ्यामध्ये दोन्ही देशांनी धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करण्यावर भर दिला. हरित ऊर्जा, संरक्षण उत्पादन, नवतंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्रात सहकार्य वाढवण्याचे ठरले. स्वीडन हा नवनवीन कल्पना आणि शाश्वत तंत्रज्ञानाकरिता जगभरात ओळखला जाणारा देश आहे. त्यामुळे भारताच्या ‘मेक इन इंडिया’आणि ‘हरित’ धोरणांना या भागीदारीमुळे चालना मिळू शकते.

नॉर्वेमध्ये पंतप्रधानांनी तिसऱ्या भारत-नॉर्डिक परिषदेत सहभाग घेतला. विशेष म्हणजे मागील ४३ वर्षांनंतर भारतीय पंतप्रधानांनी नॉर्वेला भेट दिली. या परिषदेमध्ये हवामान बदल, हरित ऊर्जा, सागरी अर्थव्यवस्था, आर्क्टिक क्षेत्रातील सहकार्य आणि डिजिटल विकास यासारख्या विषयांवर चर्चा झाली. नॉर्डिक देश हे पर्यावरणपूरक विकास आणि उच्च जीवनमानासाठी ओळखले जातात. त्यामुळे भारतासाठी या देशांशी सहकार्य वाढवणे भविष्यात महत्त्वाचे ठरू शकते.

दौऱ्याच्या शेवटी पंतप्रधानांनी इटलीला भेट दिली. येथे इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्याशी उच्चस्तरीय चर्चा झाली. दोन्ही देशांनी संबंधांना ‘विशेष धोरणात्मक भागीदारी’चा दर्जा दिला. संरक्षण, व्यापार, उत्पादन उद्योग, तंत्रज्ञान आणि भूमध्य समुद्र क्षेत्रातील सहकार्य यावर विशेष भर देण्यात आला. युरोपियन राष्ट्रांशी भारताचे वाढते संबंध जागतिक राजकारणात भारताची भूमिका अधिक मजबूत करत आहेत. पंतप्रधानांचा विदेश दौरा हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसतो. तो देशाच्या आर्थिक, सामरिक आणि राजनैतिक हितांशी जोडलेला असतो. विशेषतः युद्धसदृश परिस्थिती, तेलसंकट किंवा जागतिक आर्थिक अस्थिरता निर्माण झाल्यास राष्ट्रप्रमुखांचे प्रत्यक्ष संवाद अधिक महत्त्वाचे ठरतात. अशा वेळी आंतरराष्ट्रीय संबंध मजबूत ठेवणे, ऊर्जा पुरवठा सुरक्षित करणे, व्यापारसंबंध टिकवणे आणि भारताच्या हितांचे संरक्षण करणे ही मोठी जबाबदारी असते. याच कारणामुळे पंतप्रधानांचा विदेश दौरा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. भारताला ऊर्जा सुरक्षितता, खतांचा पुरवठा, संरक्षण सहकार्य आणि व्यापार यासाठी विविध देशांशी सतत संपर्क ठेवावा लागतो. आंतरराष्ट्रीय संकटाच्या काळात अनेक निर्णय केवळ दूरध्वनी किंवा ऑनलाईन बैठकीत होत नाहीत; त्यासाठी प्रत्यक्ष भेटी, विश्वासाचे वातावरण आणि उच्चस्तरीय चर्चा आवश्यक असतात.

पंतप्रधानांनी नागरिकांना केलेले आवाहन हे ‘काटकसरीचे राजकारण’ नसून ‘राष्ट्रीय संसाधनांचे संरक्षण’ या दृष्टीने असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. ऊर्जा सुरक्षिततेच्या दृष्टीने या दौऱ्याचे महत्त्व मोठे आहे. भारताने मागील काही वर्षांत रशिया, मध्यपूर्व आणि इतर देशांसोबत तेल व गॅस पुरवठ्याचे विविध पर्याय उभे केले आहेत. जागतिक संकटात भारताला पुरेसा पुरवठा मिळावा यासाठी उच्चस्तरीय चर्चा आवश्यक असतात. अशा दौऱ्यांमुळे भारताला दीर्घकालीन करार, कमी दरात पुरवठा किंवा नवीन गुंतवणूक संधी मिळू शकतात.एकंदरीत पाहता, पंतप्रधानांचा हा विदेश दौरा जागतिक संकटाच्या पृष्ठभूमीवर भारताच्या आर्थिक, सामरिक आणि ऊर्जा हितांचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे. नागरिकांसाठी काटकसर आणि सरकारसाठी सक्रिय परराष्ट्र हालचाली या दोन्ही गोष्टी एकाच वेळी चालू राहू शकतात, हेच या संपूर्ण घडामोडीतून स्पष्ट होते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## तीन तिघाडा काम बिघाडा आणि ‘नीट’चा अजब योगायोग!

‘तीन तिघाडा काम बिघाडा’ ही मराठीतील जुनी म्हण आपण नेहमीच ऐकतो. एखाद्या कामात किंवा निर्णयात तिघे एकत्र आले की ते काम ठरवून बिघडणार, असा या शब्दांचा सरळ अर्थ. परंतु, नुकत्याच गाजलेल्या नीट परीक्षा पेपरफुटीच्या प्रकरणात या तीन आकड्याने आणि म्हणीने जो काही चमत्कार घडवला आहे, तो पाहिला की हा केवळ योगायोग नसून निसर्गाचाच काहीतरी अदृश्य न्याय असावा असे वाटू लागते. बातमीतील गांभीर्यामध्ये लपलेली ही एक अजब गंमत वाचकांसमोर आणण्याचा हा एक छोटासा प्रयत्न. लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या कष्टावर पाणी फेरून या महाभागांनी जो काम बिघाडा केला आहे, त्याचा धागा शेवटी या तीनच्या आकड्यावरच येऊन थांबला आहे.

डॉक्टर बनू पाहणाऱ्यांच्या या क्षेत्रात, भ्रष्टाचाऱ्यांनी मात्र अंकशास्त्राचा एक अजब पॅटर्न राबवला आहे की काय, असे खालील योगायोग पाहिल्यावर वाटते. नीट परीक्षेचे मूळ विषय तीन जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र! यामध्ये



सापडलेल्या आरोपींमधील प्रमुख तीन आरोपींचे प्रथम नाव तीन अक्षरी त्यातील साम्य. ज्या शैक्षणिक पॅटर्नचे नाव संपूर्ण देशात प्रसिद्ध आहे, त्यात ही तीन अक्षरे. पाल्यासाठी पेपर विकत घेणाऱ्या डॉक्टरचे आडनाव तीन अक्षरी. पेपरच्या घोळाचे भाषांतर करणारा महाभाग तीन अक्षरी. ज्या मुख्य आरोपीच्या क्लासचे नाव अख्ख्या महाराष्ट्रात गाजले, तेही तीन अक्षरी! अगदी राजस्थानमध्ये ज्या व्यक्तीने या घोटाळ्याची प्रथम तक्रार केली, त्याचे आडनाव ही तीन अक्षरी. नेहमी भ्रष्टाचार पकडण्यासाठी तपास यंत्रणांना जंगजंग पछाडावे लागते. परंतु इथे या तीनच्या आकड्यानेच स्वतःहून पोलिसांना आणि जनतेला सुगावा लावून दिला की काय, अशी शंका येते. संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे तीनतेरा वाजवणारा हा खेळ शेवटी या तीनच्या चक्रातच अडकला असून, या त्रिकुटाचा पर्दाफाश करणारा निसर्गाचा हा न्याय खरोखरच अजब म्हणावा लागेल!

**अविनाश देशपांडे**/पुणे

## वाचक पत्रे

## शासकीय कर्मचारी, वाढत्या सुविधा आणि रखडलेला विकास

देश प्रगत होत आहे, तंत्रज्ञान वाढत आहे, शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सुविधा आणि सुरक्षितता सतत वाढत आहेत. वेतन आयोग, निवृत्तिवेतन, विविध भत्ते, सुट्ट्या, कार्यालयीन सुविधा, डिजिटल यंत्रणा या सर्व गोष्टी कर्मचाऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी दिल्या जातात. परंतु, या वाढत्या सुविधांच्या तुलनेत विकासकामांचा वेग का वाढत नाही?

आज अनेक गावांमध्ये रस्ते अर्धवट आहेत, पाणी योजना कागदावरच आहेत, शासकीय कार्यालयांमध्ये सामान्य नागरिकांचे वेळेवर काम होत नाही, फाईल एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर फिरत राहते. नागरिक कर भरतो, शासन निधी देते, कर्मचारी सुविधा घेतात; पण विकासाची गती मात्र अनेकदा मंदच दिसते. सुविधा मिळणे चुकीचे नाही. प्रत्येक कर्मचाऱ्याला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. परंतु सुविधा जबाबदारी वाढवतात की फक्त अपेक्षा वाढवतात, हा खरा प्रश्न आहे. जेव्हा कार्यालयीन वेळेपेक्षा नियमांचे कारण पुढे केले जाते, तेव्हा सामान्य माणूस त्रस्त होतो. काही ठिकाणी ‘कामापेक्षा प्रक्रिया’ मोठी झाली आहे. वास्तविक पाहता, विकास कामात अडथळा केवळ निधीअभावी नसतो; तर निर्णय घेण्यातील विलंब, कागदी प्रक्रिया, जबाबदारी टाळण्याची मानसिकता आणि कार्यक्षमतेचा अभाव हीसुद्धा मोठी कारणे आहेत. अनेक प्रामाणिक अधिकारी उत्कृष्ट काम करतात, पण संपूर्ण व्यवस्थेची प्रतिमा काही निष्क्रियतेमुळे मलिन होते. आज गरज आहे ती सुविधा विरुद्ध सेवा या समतोलाची. सरकारी नोकरी ही केवळ सुरक्षितता नसून लोकसेवेची जबाबदारी आहे, ही भावना पुन्हा जागी करावी लागेल. विकासाचा वेग वाढवायचा असेल तर कार्यालयीन शिस्त, वेळेची किंमत, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व अनिवार्य करावे लागेल.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

## जनगणना की आर्थिक सर्व्हे

पूर्वी जनगणनेत केवळ घरातील सदस्यांची संख्या आणि वार्षिक उत्पन्न यासारख्या माहितीवर भर दिला जात असे. मात्र, २०२६ च्या जनगणनेसाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीत अनेक बारीकसारीक आणि कौटुंबिक जीवनशैलीशी निगडित प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

उदा. घरात खोल्यांची संख्या किती आहे, कुटुंबात विवाहित जोडपी किती आहेत, मोबाईल डेटा वापरता की वायफाय असे निरनिराळे प्रश्न विचारले जात आहेत. जर जनगणना केली जात आहे तर हे प्रश्न का विचारले जात आहेत की जनगणनेच्या आडून आर्थिक सर्व्हे करत असून सरकारी योजना बंद करण्याचा मानस आहे का? काही कर्मचाऱ्यांकडे ओळखपत्र नसल्यामुळे त्यांनी घरोघरी जाऊन असे प्रश्न विचारल्यामुळे संशय निर्माण होत आहे. अशा वेळी प्रशासनाने खुलासा करणे आवश्यक आहे.

**माधव ताटके**/पुणे

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...




### महाराष्ट्र क्रिकेट निवड चाचणी कॅम्पसाठी सोलापूरच्या चौघींचा समावेश

**सोलापूर, दि. २४-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन अंतर्गत पुणे येथे होणाऱ्या सिनियर महिला निवड चाचणी कॅम्पसाठी येथील साक्षी वाघमोडे, आर्या उमाप, भक्ती पवार व स्नेहा शिंदे यांची निवड झाली आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या पाच टी-२० निमंत्रित सामन्यांतील कामगिरीवर ही निवड झाली आहे. निमंत्रित सामन्यांमध्ये सोलापूर संघाकडून खेळताना आर्या उमापने २११, साक्षी वाघमोडेने १९६ धावा केल्या होत्या. भक्ती पवारने १० व स्नेहा शिंदेने ८ बळी अशी कामगिरी केली. पुढील निवड चाचणी कॅम्प पुणे या ठिकाणी होत आहे. त्यांच्या निवडीबद्दल सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप माने, चेअरमन रणजितसिंह मोहिते-पाटील, व्हा. चेअरमन श्रीकांत मोरे, उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, मुकुंद जाधव, नितीन देशमुख व संयुक्त सेक्रेटरी धैर्यशील मोहिते पाटील आणि चंद्रकांत रेंबर्सु यांच्यासह स्नेहल जाधव, किरण मणियार, सारिका कुरुलकर व मानसी जाधव यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



### शाहू स्पोर्टस् क्लब अंत्रोळीच्या खो-खो प्रशिक्षण शिबिरास सुरवात

**सोलापूर, दि. २४ मे-**

शाहू स्पोर्ट्स क्लब दक्षिण सोलापूरच्या उन्हाळी खो-खो प्रशिक्षण शिबिरास अंत्रोळी येथे सुरवात झाली. या शिबिरास सदानंद गुजले हे प्रशिक्षण देत आहेत. या शिबिराचे उद्घाटन जि. प. शाळा अंत्रोळी येथ शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकांत कोकरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी राष्ट्रीय खो खो पंच श्रीरंग बनसोडे, शाहू स्पोर्ट्स दक्षिण सोलापूरचे खजिनदार नागनाथ म्हमाने, ज्येष्ठ नागरिक चंद्रकांत कोकरे आदी उपस्थित होते.



### आपत्कालीन सज्जतेसाठी रेल्वे प्रवासी तिकीट तपासणीसांची कार्यशाळा

**सोलापूर, दि. २४ मे-**

गाड्यांमधील सुरक्षा आणि आपत्कालीन सज्जता वाढवण्याच्या महत्त्वपूर्ण उद्देशाने, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने सोलापूर स्थानकावर 'प्रवासी तिकीट तपासनीस' यांच्यावर भर दिला आहे. 'प्रवासी तिकीट तपासनीस' यांच्यासाठी एक सर्वसमावेशक सुरक्षा कार्यशाळा आणि अग्निशामक यंत्रांच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन केले. यात गाड्यांमध्ये आणि स्थानक परिसरात आगीशी संबंधित आपत्कालीन प्रसंगांना प्रभावीपणे तोंड देण्यासाठी आवश्यक असलेले व्यावहारिक ज्ञान आणि आत्मविश्वास रेल्वेच्या या आघाडीच्या कर्मचाऱ्यांना मिळवून देण्यावर या कार्यशाळेत प्रामुख्याने भर देण्यात आला. गाड्यांमध्ये घडणाऱ्या असामान्य घटनांच्या वेळी 'संरक्षणाची पहिली फळी' आणि 'सर्वात आधी प्रतिसाद देणारे' म्हणून तिकीट तपासनीस बजावत असलेली महत्त्वपूर्ण भूमिका ओळखून, ही अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन प्रतिसादाची विशेष कार्यशाळा केवळ सोलापूर विभागातील तिकीट तपासनीस यांच्यासाठीच आयोजित करण्यात आली होती. याव्यतिरिक्त, सुरक्षा विभागातर्फे आग आणि धूर शोध प्रणाली, अलार्म चेन पुलिंग आणि बिघाड दर्शवणारी व ब्रेक लावणारी प्रणाली या यंत्रणांना वेगळे करण्याबाबतचा एक विशेष माहितीपर व्हिडिओ दाखवण्यात आला. धावत्या गाड्यांमध्ये वाल्व्ह कसे चालवावेत आणि आपत्कालीन यंत्रणा कशा हाताळाव्यात याविषयी मिळालेली माहिती सहभागी तिकीट तपासनीस यांच्यासाठी

### खते, बियाणे खरेदी करताना बळीराजाने काळजी घ्यावी : डीलर्स असोसिएशन

**सोलापूर, दि. २४ मे-**



खरीप हंगाम २०२६ सुरू होत असताना बियाणे, खते व कीडनाशके खरेदी करताना आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन सोलापूर सीड्स फर्टीलायझर्स अँड पेस्टिसाइड डीलर्स असोसिएशनचे सचिव बालाजी चौगुले यांनी केले आहे. श्री. चौगुले म्हणाले, शेतकऱ्यांनी बियाणे किंवा कोणतेही कृषीखत खरेदी करताना बियाण्याच्या पिशवीवरील कंपनीचे नाव, लॉट क्रमांक, लेबल क्रमांक, किंमत, जर्मिनेशन टक्केवारी, उत्पादन/अंतिम मुदत, प्रक्रिया पद्धती आदी माहिती तपासावी. बियाणे, खते किंवा कीडनाशके खरेदी केल्यानंतर बिल, बॅग व टॅग जतन करून ठेवावे. सोयाबीन पेरणीसाठी किमान १०० मिली पाउच व तदनुसार पेरणी प्रक्रिया काटेकोर पाळावी. ट्रकद्वारे आलेल्या बियाण्याची जास्त हालचाल झाल्यास पेरणीत नुकसान होते. बियाणे विक्रेत्यांनी बियाण्याची अंकुरण क्षमता, प्रक्रिया, उपचार, हमी मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट करावी. तर कीडनाशकांच्या वापरासाठी शिफारस केलेली नवीन औषधे व योग्य प्रमाण याची माहिती घ्यावी. वाहतूक किंवा अयोग्य साठवणुकीमुळे बियाण्याचे नुकसान होणार नाही याची शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी. तसेच पावत्यांद्वारे व्यवहार करणे आणि ऑनलाईन पेमेंटचे पुरावे जतन करणे अनिवार्य आहे.

# 'मे' महिन्यातच पाऊस; शेतकऱ्यांची खते, बियाणांची जुळवाजुळव सुरु

- यंदा जिल्ह्यात ४ लाख ९९ हजार हेक्टरवर होणार पेरणी
- २ लाख ५१ हजार ९०० मेट्रिक टन इतका खत उपलब्ध
- जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मे-**

खरीप हंगामात मागील वर्षी ४ लाख १७ हजार हेक्टर क्षेत्र खरीप हंगामासाठी पेरणी झालेली होती तर यावर्षी ४ लाख ९९ हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी होणार आहे. यासाठी खते व बियाणे शेतकऱ्यांना वेळेत उपलब्ध होतील याचेही नियोजन झालेले असून, बफर स्टॉक ही उपलब्ध आहे. दरम्यान, जिल्ह्याला दोन लाख ५१ हजार ९०० मेट्रिक टन इतका खत उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

दरम्यान, मे महिन्यातच आभाळाचे गाडगुड, वादळी वारे येवून पाऊसही एक दिवसाआड पडू लागल्याने बळीराजाही आता वेळेत पेरणी करण्यासाठी खते, बि-बियाणांची जुळवाजुळव करू लागल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, चांगली ओल गेल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणीची गडबड करू नये, असेही आवाहन केले आहे.

जिल्ह्यातील बळीराजाची पेरणीपूर्व तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. खरीप पेरणीसाठी जमिनीमध्ये किमान २.५ ते ३ इंच (५ ते ७.५ सेमी) खोलीपर्यंत ओल असणे आवश्यक असते. बियाण्याची योग्य उगवण होण्यासाठी जमिनीत ७५ ते १०० मिमी (७.५ ते १० सेमी) पावसाची किंवा सिंचनाची गरज असते. सलग २ ते ३ दिवस चांगला पाऊस पडून जमिनीत आवश्यक ओलावा निर्माण झाल्यावरच पेरणी करावी. मूठभर माती घेऊन ती घट्ट दाबल्यास तिचा गोळा तयार झाला पाहिजे आणि तो खाली टाकल्यावर तुटला, तर जमिनीत पेरणीयोग्य ओलावा आहे असे समजावे. शेतात पाणी साचल्यावर (चिखल होऊन) पेरणी



केल्यास बियाणे कुजण्याची शक्यता असते. पेरणीच्या वेळी ओलाव्याची कमतरता असल्यास बियाण्याजवळ खते देऊ नयेत, अन्यथा मुळे जळू शकतात.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले पुढे म्हणाले की, शेतकरी बांधवांसाठी केळी लागवड, फळ लागवड, पीक परिस्थितीत होत असलेला बदल, पीक कर्ज वाटप, नमो शेतकरी योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा अनुदान, पीएम किसान सन्मान निधी, माती परीक्षण पत्रिका यामध्ये आपला जिल्हा आघाडीवर आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे आणि स्थानिक आमदारांनी सांगितल्याप्रमाणे आमच्या कृषी विभागाने शेतकऱ्यांना खते व बियाणे वेळेत उपलब्ध देण्याची व्यवस्था केली आहे. तसेच लिंकिंग होणार नाही याची काळजी आम्ही घेणार आहोत.

जेणेकरून खरिपात शेतकऱ्यांना वेळेत आणि चांगली खते, बियाणे देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. जे निविष्ठा विक्रेते लिंकिंग करून शेतकऱ्यांना बोगस खते व बियाणे विकत असतील अशा विरोधात कठोर कारवाई करण्यासाठी आमच्या कृषी विभागाचे कडक धोरण आखले आहे.

**माती परीक्षणासाठी प्रबोधन करणार**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेत जमिनीचे माती परीक्षण करून घेण्याबाबत प्रबोधन करणार आहोत. जिल्ह्याला सध्या एकच माती परीक्षण लॅब आहे. यापुढील काळात प्रत्येक तालुक्याला माती परीक्षण लॅब मिळण्याची मागणी पालकमंत्री गोरे यांच्याकडे केली आहे. यावर्षी फळबाग लागवडीचे उद्दिष्ट दुप्पट करण्याचेही धोरण आम्ही आखत आहोत.




## फारूक सय्यद यांच्या उर्दू साहित्यासाठी केलेल्या कार्याला सोलापूर विसरणार नाही

### बज्मे गालिब ग्रंथालय आयोजित शोकसभेत मान्यवरांचे मनोगत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मे-**

फारूक सय्यद यांनी एक गरीब घराण्यात जन्म घेतलेला माणूस महाराष्ट्राच्या उर्दू साहित्यात आपले नांव उज्वल केले होते. त्यानंतर त्यांनी बाळगोपाळांसाठी एक खास मासिक पुस्तक गुलबुटे या नावाने सुरू केलेली होते.

त्यात त्यांनी बाळगोपाळांना चांगले चांगले कसे द्यावे व इतर माहिती देण्यात येत होती. ते बारावीपर्यंतचे शिक्षण सोलापुरात पूर्ण केले. त्यानंतर मुंबईत जाऊन पुढे शिक्षण चालू ठेवले व उर्दू साहित्य क्षेत्रात आपले नांव उंचावला. हे सर्व कार्य सोलापूर विसरणार नाही, असे मनोगत त्यांचे शिक्षक शाहबुद्दीन चितापुरे, अ. रशीद अर्शद, महिबुब कुमठे, सिराज मोमीन, वजाहत अ. सत्तार, महेमूद नवाज, इक्बाल सय्यद यांनी व्यक्त केले. मीर अफजल मीर आणि हबीब नागपुरी यांनी त्यांच्या जीवनावर आपली कविता सादर केली.

येथील उर्दू साहित्यकार, मासिक गुलबुटेचे संपादक फारूक सय्यद यांचे मुंबई येथे नुकतेच निधन झाले. त्यानिमित्त बज्मे गालिब ग्रंथालयातर्फे शोकसभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी शोकसभेच्या अध्यक्षस्थानी बज्मे गालिब ग्रंथालयाचे अध्यक्ष बशीर परवाज होते तर सचिव डॉ. हारूनरशीद बागबान, फारूक सय्यद यांचे भाच्चे डॉ. आसिफ इक्बाल, सीए मौलाना शेख आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी महिबुब कुमठे यांच्या कुरान पठाणाने सुरूवात करण्यात आली. त्यानंतर प्रास्ताविक सचिव डॉ. हारून रशीद बागबान यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नासिरोद्दीन आळंदकर यांनी केले.

## सु-संस्कृत समाज निर्मितीत ग्रंथालयांचे योगदान महत्वाचे: अय्यूब अहमद यांचे मत



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ मे-**

सु-संस्कृत समाज घडविण्यात वाचनालयांचे नेहमीच योगदान असते. कारण वाचन संस्कृती आत्मसात केल्याशिवाय चांगल्या व सेवाभावी समाजाची आपण कल्पनाच करू शकत नाही, असे मत ऊर्दू-मराठीचे ज्येष्ठ साहित्यिक अय्यूब अहमद नल्लामंदू यांनी व्यक्त केले.

सोलापूर जिल्हा सार्वजनिक वाचनालय संघ आयोजित ''ग्रंथालय व समाज'' या विषयावर व्यक्त केले. ते पुढे म्हणाले, कि जीमप्रमाणे प्रत्येक वार्डामध्ये एक एक ग्रंथालय मनपाच्या वतीने सुरू करावे अशी मागणी ही करण्यात आली.

प्रमुख पाहुणे म्हणून उप-प्राचार्या सुरैय्या परवीन जहागीरदार उपस्थित होते प्राचार्या डॉ. जहागीरदार म्हणाल्या, ग्रंथालय व साहित्यिकांचे नाते जुने आहे. एक चांगला व अभ्यासपूर्ण साहित्यिक घडविण्यात प्राचीन काळापासून आजपर्यंत ग्रंथाल्यांचे मोलाचे योगदान सिद्ध झाले आहे.

कारण आपण अनेकदा पाहिले असेल कि एक चांगला व अभ्यासपूर्ण लेखक आपल्या पुस्तकात शेवटच्या पानावर त्याची नोंदी प्रसिद्ध करत असतो. जेणे करून पुस्तक परिपूर्ण होते. परंतु हे सर्व श्रेय ग्रंथालयांनाच जाते.

सुत्रसंचलन जाफर बांगी यांनी केले. ग्रंथपाल गणेश फंड यांनी आभार मानले. सारिका माडीगर, गितांजली गंभीरे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले

## माळीनगर प्राथमिक आरोग्य केंद्रात राबविली स्वच्छता मोहीम



**अकलूज, दि. २४ मे-**

माळीनगर प्राथमिक आरोग्य केंद्रात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली सकाळी सात वाजता माळीनगर प्राथमिक आरोग्य केंद्राचा परिसर वाढलेली झाडे झुडपे, कागद कचरा, कोपरे भिंती झाडून कचरा गोळा करण्यात आला. येत्या काळात माळीनगर परिसरात स्वच्छता आणि सुशोभीकरण यावर भर देणार असल्याचे विराजसिंह निंबाळकर यांनी सांगितले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य मारुती लोंढे, आरोग्य अधिकारी अमेय फुले, दादासाहेब लवटे यांच्यासह माळीनगर प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य अधिकारी असे सेविका माळीनगर ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचारी महाविद्यालयाचे विद्यार्थी परिसरातील नागरिक जिल्हा परिषद सदस्य ग्रामपंचायत सदस्य यांनी हजेरी लावून सहभाग

## १२ क्विंटल कांदा विक्रीनंतरही खिशातून भरावे लागले ३०१ रुपये

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मे-**

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या वाढत्या आर्थिक संकटाचे विदारक चित्र सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत समोर आले आहे. उत्पादन खर्च, वाहतूक आणि बाजारातील विविध आकारणींच्या ओझ्याखाली शेतकरी अक्षरशः भरडला जात असल्याचे वास्तव एका विक्री पट्टीमुळे पुन्हा अधोरेखित झाले आहे. कांदा विक्रीसाठी बाजारात आलेल्या एका शेतकऱ्याला माल विकून पैसे मिळण्याऐवजी उलट स्वतःच्या खिशातून ३०१ रुपये भरावे लागल्याची धक्कादायक घटना घडली.

श्री सिद्धेश्वर मार्केट यार्डातील सिद्धनाथ ट्रेडर्स येथे संबंधित शेतकऱ्याने



२४ गोण्या कांदा विक्रीसाठी आणला होता. एकूण १२ क्विंटल ८७ किलो कांद्याला केवळ १ हजार ४६८ रुपये इतकाच दर मिळाला. मात्र हमाली, तोलाई, गाडीभाडे आणि इतर खर्चाच्या नावाखाली तब्बल १ हजार ७६९ रुपये ८७ पैसे कपात करण्यात आली. परिणामी, व्यवहाराच्या अखेरीस शेतकऱ्याच्या खात्यात रक्कम जमा होण्याऐवजी ''उर्वरित शिल्लक -३०१ रुपये'' अशी नोंद करण्यात आली.

यावरुन कांदा उत्पादकांच्या अडचणी पुन्हा ऐरणीवर आल्या आहेत. बियाणे, खत, औषधे, मजुरी, वीज व पाणी यांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असताना बाजारात मिळणारे दर मात्र घसरत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहेत. अनेकदा उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित विक्री पट्टी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली असून ''शेतकऱ्याने शेती करायची तरी कशी?'' असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## महाराष्ट्र नाभिक महामंडळाचा वधू-वर मेळावा, सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात

### कर्तृत्ववानांचा गौरव; शिवयोग अंकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ मे-**

महाराष्ट्र नाभिक महामंडळ व समाजामध्ये फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला नाभिक समाजाचा वधू-वर पालक परिचय मेळावा तसेच सामुदायिक विवाह सोहळा शनिवार, दि. २३ मे २०२६ रोजी सोलापूर येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११ वाजता वधू-वर पालक परिचय मेळाव्याने झाली. यावेळी श्री संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सोलापूरच्या खासदार प्रणिताताई शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमास महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे, एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. बापूसाहेब अडसूळ, भाजप नगरसेवक प्रथमेश कोठे, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष रमेश राऊत, उद्योजक नितीन दूरलेकर, वैभव शेटे, कलबुर्गी येथील नाभिक समाजाचे अध्यक्ष शरण बसवेश्वर सूर्यवंशी, पांडुरंग चौधरी, किशोर शेटे, भीमराव गंगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

याच प्रसंगी प्रणिताताई शिंदे, कल्याण दळे, प्रा. डॉ. बापूसाहेब अडसूळ, पांडुरंग चौधरी व वैभव शेटे यांच्या हस्ते वधू-वर परिचय मेळाव्याच्या 'शिवयोग' या विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री लक्ष्मणराव ढोबळे, सौ. कोमलताई ढोबळे, प्रा. डॉ. बापूसाहेब अडसूळ, नगरसेवक संजय कोळी, भीमराव गंगरे, किशोर शेटे, दत्तात्रय वानकर, वैभव शेटे, पांडुरंग चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष सुरवसे यांनी केले, तर उपस्थित मान्यवरांचे आभार शिवशरण सुरवसे यांनी मानले.



**या मान्यवरांचा पुरस्काराने गौरव**

मंगेश चिवटे (शिक्षक मित्र), प्रा. डॉ. बापूराव अडसूळ (शिक्षक भूषण), अश्विनीताई तडवळकर (कला गौरव रत्न), समाजसेवक संजय चिखले (जीवनगौरव), बापूराव चव्हाण (ज्ञानज्योती जीवनगौरव), किरण भांगे व शिवशरण सुरवसे यांना (समाजरत्न), सुदर्शन विभुते व तुकाराम शिंदे, पंढरपूर (जीवनगौरव), नेताजी कॉलेज मोहोळचे प्राचार्य दत्तात्रय काशीद (ज्ञानज्योती जीवनगौरव).

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

सोलापूर येथील तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर तालुका उत्तर सोलापूर येथील सर्व राहिवासीयांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मजरेवाडी येथील मिळकत यांसी जुना सर्व्हे नं. २४७/१, नविन सर्व्हे नंबर ४२/१ यापैकी 'शिवपार्वती नगर' या नावाने ओळखले जाणाऱ्या नगरातील प्लॉट नं. ५५३ यांसी हद्द पुर्वपश्चिम ४० फुट व दक्षिणोत्तर २५ फुट असे एकूण क्षेत्र ९२.९३ चौ.मी. अथवा १००० चौ. फुट इतके आहे. यात १० बाय १० फुट मापाचे पत्र्याचे शेड मारलेली एक खोली असून बाकीची उर्वरीत खुली जागा यांसी सोलापूर महानगरपालिका मिळकत क्र. ६७७७८७ असा आहे.

यांसी चतुःसिमा खालील प्रमाणे :- पुर्वेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं. ५५२ ए, पश्चिम - प्लॉट नं. ५५०, उत्तरेस - प्लॉट नं. ५५४ येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत ही तौफीक सलीम शेख, यांच्या स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असून सदरची मिळकत ही त्यांनी आमचे अशील इरशाद गुलाबरसुल पठाण उर्फ इरशाद रसुलखाँ पठाण यांना कायम खुषखरेदीने देण्याचे मान्य व कबूल करून आमचे अशिलांकडून बरीच इसारा रक्कम स्विकारली व तसा इसारा पावती दस्त बनवून देणार आहे.

सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेली नाही अशी हमी त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे.

तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, लिन, बक्षीसपत्र, कुलमुखत्यार, साठेखत, खरेदीखत, जप्ती, मृत्यूपत्र इजमेंट राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकेचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून १० (दहा) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी, लेखी स्वरूपात नोंदवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाची हिला हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अमेर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख २४/०५/२०२६

सही/-
**ॲड. सहदेव रघुनाथ भडकुंबे**
**बी.कॉम. एलएल.बी., ॲडव्होकेट**
**पत्ता :- ५६, रविवार पेठ, गुजर वस्ती,**
**सोलापूर मो. नं. ९०२८९६६३१७**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## महत्त्वाचे

### फ्रेंच ओपन : युक्रेनच्या मार्टा कोस्त्युकची विजयी सलामी



**पॅरिस** : युक्रेनच्या मार्टा कोस्त्युकने रविवारी फ्रेंच ओपनच्या पहिल्या फेरीत ओक्साना सेलेखमेतेवाचा ६-२, ६-३ अशा फरकाने सहज पराभव करत विजयी सलामी नोंदविली. आपल्या देशातील युद्धाची झळ आता आपल्या घरापर्यंत पोहोचली असतानाही, आपण ज्या प्रकारे आपले लक्ष विचलित होऊ दिले नाही, त्याबद्दल आपल्याला अभिमान वाटतो, असे तिने या वेळी सांगितले. २३ वर्षीय रुआन आणि माद्रिद विजेत्या खेळाडूने या हंगामात क्ले कोर्टवर (मातीच्या कोर्टवर) सलग १२ सामने जिंकण्याची आपली विजयी मालिका कायम राखली. मात्र, रविवारीच पहाटे युक्रेनमध्ये आपल्या आई-वडिलांच्या घराच्या जवळच झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्याच्या बातमीमुळे या विजयाचे महत्त्व काहीसे झाकोळले गेल्याचे तिने नमूद केले. रशियाने चार वर्षांपूर्वी केलेल्या आक्रमणापासून युक्रेनच्या राजधानीवर झालेल्या सर्वात भीषण हल्ल्यांपैकी एका हल्ल्यात कीव्ह आणि आसपासच्या परिसरावर शेकडो ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला होता.

### उत्तर प्रदेशला राष्ट्रीय दिव्यांग टी-२० क्रिकेटचे विजेते

**बंगळुरू** : पाचवी एलीट राष्ट्रीय दिव्यांग टी-२० क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा २०२६ ची सांगता अत्यंत दिमाखदारपणे झाली. या स्पर्धेच्या रोमांचक अंतिम सामन्यात, गतविजेत्या मुंबई संघाचा ४ गडी राखून पराभव करत उत्तर प्रदेश संघ राष्ट्रीय विजेता ठरला. मुंबई संघाने २० षटकांत ७ गड्यांच्या मोबदल्यात १७१ धावांची आव्हानात्मक धावसंख्या उभारली. रवींद्र सांटे याने नाबाद ७१ धावांची शानदार खेळी साकारली, तर विक्रांत केणी याने ५४ धावांचे योगदान दिले. दीपेंद्र सिंग याने नाबाद ५४ धावांची संयमी खेळी करत डावाला भक्कम आधार दिला आणि १८.५ षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात १७३ धावा करत उत्तर प्रदेशला विजयापर्यंत नेले. ही अजिंक्यपद स्पर्धा कर्नाटक राज्य दिव्यांग क्रिकेट संघटनेच्या अधिपत्याखाली आयोजित करण्यात आली होती. ही फिजिकली चॅलेंज्ड क्रिकेट कौन्सिल ऑफ इंडियाची राज्यस्तरीय संस्था आहे.

### राष्ट्रकुल स्पर्धेसाठी रोहित राजपाल यांची शेफ द मिशनपदी नियुक्ती



**नवी दिल्ली** : ग्लासगो येथे होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी रोहित राजपाल यांची शेफ द मिशन म्हणून नियुरक्ती करण्यात आली आहे. भारतीय पथकासाठी रवी बेंगानी यांची उप-शेफ द मिशन म्हणून निवड करण्यात आली आहे. राजपाल यांचा प्रशासकीय अनुभव आणि त्यांचे उत्तम जनसंपर्क हेच त्यांच्या निवडीमागील मुख्य घटक असल्याचे ने नमूद केले आहे. ग्लासगो येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा ही मर्यादित स्वरूपाची आवृत्ती असेल आणि यात भारतीय पथकाचा आकारही तुलनेने लहान असेल. भारताचे डेव्हिस चषक कर्णधार रोहित राजपाल यांची ग्लासगो येथे होणाऱ्या आगामी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी देशाचे शेफ द मिशन म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. रवी बेंगानी हे उप-शेफ द मिशन असतील; तर वंदना राव आणि राहुल स्वामी हे या स्पर्धेसाठीभारतीय पथकासोबत सामान्य संघ व्यवस्थापक म्हणून प्रवास करतील. ही स्पर्धा २३ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान होणार आहे.

# राजस्थान प्ले-ऑफमध्ये, पंजाब बाहेर

## मुंबईवर ३० धावांनी मात

## सामनावीर जोफ्रा आर्चर

◆ **मुंबई, २४ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी वानकेडे स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अखेरच्या चुरशीच्या आयपीएल सामन्यात राजस्थान रॉयल्सने मुंबई इंडियन्सवर ३० धावांनी रोमहर्षक विजय नोंदविला. या विजयाबरोबरच राजस्थानने एकूण १६ गुण घेत चौथे स्थान मिळविले व पंजाब किंग्सला (१५) प्ले-ऑफच्या शर्यतीतून बाहेर केले.

**प्ले-ऑफचे चित्र स्पष्ट**

आता प्ले-ऑफमधील चार संघ निश्चित झाले असून याच रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (१८), गुजरात टायटन्स (१८), सनरायझर्स हैदराबाद (१८) आणि चौथा संघ म्हणून राजस्थान रॉयल्सचा समावेश आहे.

राजस्थान रॉयल्सने २० षटकांत ८ बाद २०५ धवा उभडारून मुंबई इंडियन्ससमोर विजयासाठी २०६ धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु धावांचा पाठलाग करताना मुंबईला मर्यादित षटकांत ९ बाद १७५ धावांपर्यंतच मजल मारता आली.

मुंबई इंडियन्सने आपल्या अखेरच्या सामन्यात नाणेफेक जिंकली आणि वानखेडे स्टेडियमवरील एका उष्ण व दमट दुपारी प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.



राजस्थान रॉयल्सला प्ले-ऑफमध्ये मिळवून दिल्याचा आनंद साजरा करताना कर्णधार रियान पराग

राजस्थान रॉयल्सकडून यशस्वी जयस्वाल व वैभव सूर्यवंशी ही युवा सलामी जोडी मैदानावर आली व त्यांनी ३३ धावांची भागीदारी केली, याच धावसंख्येवर ते तीन चेंडूंच्या अंतराने तंबूत परतले. दीपक चहरने सूर्यवंशीला नमनकडे, तर विल जॅक्सने जयस्वालला बॉशकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. सूर्यवंशीने ४ धावा केल्या, तर जयस्वालने १७ चेंडूंत १ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने २७ धावा केल्या.

पुढे ध्रुव जुरेल (३८), कर्णधार रियान पराग (१४), दासून शनाका (२९), डोनोव्हन फरेरा (१८) व जोफ्रा आर्चरने (३२) छोट्या-छोट्या भागीदारी करत राजस्थानच्या धावसंख्येला आकार दिला. शार्दुल ठाकूरने जोफ्रा आर्चरला बाद केले, तेव्हा राजस्थानने १८ षटकांत ८ बाद १७५ धावांचा टप्पा गाठला होता. डावाच्या अखेरीस अष्टपैलू रवींद्र जडेजा व नांद्रे बर्गरने आपल्या बॅटची चमक दाखवित संघाला २० षटकांत ८ बाद २०५ धावा रचून दिल्या. जडेजाने ११ चेंडूंत नाबाद १९ धावांची, तर बर्गरने नाबाद १० धावांची खेळी केली.

मुंबई इंडियन्सकडून दीपक चहर, शार्दुल ठाकूरने प्रत्येकी २, तर विल जॅक्स, एएम गझनफर व कॉर्बिन बॉशने प्रत्येकी १ बळी टिपला. विजयासाठी धावांचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची त्रेधातिरपीट उडाली. जोफ्रा आर्चर व बर्गर व ब्रिजेश शर्माने प्रभावी मारा करीत रोहित शर्मा (०) व रियान रिकेल्टन (१२) या सलामी जोडीसह नमन धीर (६) व तिलक वर्मा ( ३) या चौघांना नियमित अंतराने तंबूत परत पाठविले. त्यामुळे मुंबई इंडिन्सची ५.१ षटकांत ४ बाद ३८ धावा अशी अवस्था झाली. मात्र त्यानंतर सूर्यकुमार यादव व विल जॅक्सने संघाची पडझड थांबविली व संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला. सूर्यकुमारने ४२ चेंडूंत ३ चौकार व ४ षट्कारांसह ६० धावांची खेळी केली, तसेच विल जॅक्स (३३) व कर्णधार हार्दिक पांड्याने १५ चेंडूंत ३४ धावांची खेळी करत आपल्या मुंबई संघाला विजय मिळवून देण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, परंतु त्यांना लक्ष्य गाठण्यात अपयश आले. मुंबईला २० षटकांत ९ बाद १७५ धावांवर रोखताना राजस्थानच्या जोफ्रा आर्चरने १७ धावांत ३ बळी, नांद्रे बर्गर, ब्रिजेश शर्मा व यश राज पुंजाने प्रत्येकी २ बळी टिपले. राजस्थानला विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलणारा जोफ्रा आर्चर सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

(वृत्तसंस्था)



फिट इंडिया संडे ऑन सायकलमध्ये सहभागी अभिनेता आयुष खुराणा व केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया

# ७५ वा फिट इंडिया संडे ऑन सायकल साजरा

◆ **नवी दिल्ली, २४ मे**

केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी रविवारी येथे आयोजित एका भव्य सायकलिंग कार्यक्रमात सहभाग घेतला. फिट इंडिया संडे ऑन सायकलच्या ७५ व्या आवृत्तीचे आणि राष्ट्रकुल क्रीडा दिनाचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात, त्यांनी लोकांना जवळच्या अंतराच्या प्रवासासाठी सायकलचा वापर करण्याचे आणि तंदुरुस्त राहण्यासाठी सायकल चालवण्याचे आवाहन केले.

येथील प्रसिद्ध साबरमती रिव्हरफ्रंटवर सकाळी ६ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात देशभरातील ८,००० हून अधिक ठिकाणी लोकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

या उपक्रमाद्वारे राष्ट्रकुल क्रीडा दिनाचा गौरव करण्यात आला, तसेच अहमदाबादमध्ये २०२९-३० मध्ये होणाऱ्या ऐतिहासिक राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या तयारीला गती देण्यात आली.

**सेलिब्रिटी आणि खेळाडूंनी केला तंदुरुस्तीचा प्रचार**

देशव्यापी उत्सवाचे नेतृत्व करत, क्रीडा मंत्री मनसुख मांडविया, गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी, अभिनेता आयुष्मान खुराणा आणि ऑलिम्पिक पदक विजेता नेमबाज गगन नारंग यांनी ५,००० सायकलस्वार, खेळाडू, युवा स्वयंसेवक आणि फिटनेसप्रेमींसोबत या कार्यक्रमात सहभाग घेतला. हा कार्यक्रम म्हणजे जनसहभाग आणि क्रीडा भावनेचे एक उत्साही प्रदर्शन ठरले.

२०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी भारताने सुरू केलेल्या तयारीला पाठिंबा दर्शवण्यासाठी, राष्ट्रकुल स्पर्धेतील माजी पदक विजेते आणि ऑलिम्पिकपटू - यात गुरजीत कौर, रजनी एतिमार्पू, सोनिका तांडी, अंजुम मौदगिल, अंकुर मित्तल आणि तृप्ती मुरगुंडे यांचा समावेश होता - तसेच इतर खेळाडू आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरही याप्रसंगी उपस्थित होते.

(वृत्तसंस्था)

# केएल राहुलचे अर्धशतक

## दिल्ली कॅपिटल्स ५ बाद २०३

◆ **कोलकाता, २४ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये रविवारी ईडन्स गार्डन्सवर पावसाच्या व्यत्ययामुळे विलंबाने सुरु झालेल्या कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात केएल राहुलने झळकावलेल्या अर्धशतकाच्या बळावर दिल्ली कॅपिटल्सने २० षटकांत ५ बाद २०३ धावा उभारल्या आणि कोलकात्यासमोर विजयासाठी २०४ धावांचे लक्ष्य ठेवले.

यापूर्वी दुपारच्या सत्रात मुंबईत झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने मुंबई इंडियन्सवर ३० धावांनी विजय नोंदविला आणि पंजाब किंग्सला बाहेर करून प्ले-ऑफमध्ये चौथा संघ म्हणून आपले स्थान निश्चित केले, त्यामुळे कोलकाता वि. दिल्ली दरम्यानचा सामना केवळ औपचारिकता ठरला आहे.

कोलकाताने नाणेफेक जिंकून दिल्लीला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. अभिषेक पोरेल (२२) व केएल राहुलने पहिल्या गड्यासाठी ४० धावांची सलामी भागीदारी करून दिल्लीच्या डावाची चांगली सुरुवात केली. पुढे साहील पारखने (२४) राहुलसोबत दुसऱ्या गड्यासाठी ४७ धावांची भागीदारी केली. केएल काहुलने अक्षर पटेलच्या साथीने आपले वैयक्तिक अर्धशतक साजरे केले. राहुलने पटेलसोबत ३८ धावांची भागीदारी करून दिल्लीला १२.४ षटकांत १२५ धावांवर पोहोचवले, याचवेळी अनुकूल रॉयनै राहुलला बाद केले. केएल राहुलने ३० चेंडूंत ५ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने ६० धावा केल्या. नंतर अक्षरही वरूण चक्रवर्तीच्या फिरकीला बळी पडला. अक्षरने २५ चेंडूंत ३९ धावांची खेळी केली. डेव्हिड मिलरतड २९ धावांची भर घातली. आशुतोष शर्मा (१८) व ट्रिस्टन स्टब्सने नाबाद खेळी करीत दिल्ली कॅपिटल्सला २० षटकांत ५ बाद २०३ धावा रचून दिल्या.





(वृत्तसंस्था)

### आयपीएल गुणतालिका

| संघ | सामने | विजय | पराभव | गुण | नेट रनरेट |
|---|---|---|---|---|---|
| रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू | १४ | ९ | ५ | १८ | ०.७८३ |
| गुजरात टायटन्स | १४ | ९ | ५ | १८ | ०.६९५ |
| सनरायझर्स हैदराबाद | १४ | ९ | ५ | १८ | ०.५२४ |
| राजस्थान रॉयल्स | १४ | ८ | ६ | १६ | ०.१८९ |
| पंजाब किंग्स | १४ | ७ | ६ | १५ | ०.३०९ |
| कोलकाता नाईट रायडर्स | १३ | ६ | ६ | १३ | ०.०११ |
| चेन्नई सुपर किंग्स | १४ | ६ | ८ | १२ | -०.३४५ |
| दिल्ली कॅपिटल्स | १३ | ६ | ७ | १२ | -०.८७१ |
| मुंबई इंडियन्स | १४ | ४ | १० | ८ | -०.५८४ |
| लखनौ सुपर जायंट्स | १४ | ४ | १० | ८ | -०.७४० |

### वैभव सूर्यवंशीचा सर्वाधिक टी-२० धावांचा विक्रम

**मुंबई** : इंडियन प्रीमियर लीगमधील आपल्या प्रभावी आणि लक्षवेधी कामगिरीची परंपरा कायम राखत, वैभव सूर्यवंशीने रविवारी इतिहास घडविला. टी-२० लीगमध्ये सर्वाधिक धावा करणारा किशोरवयीन खेळाडू होण्याचा मान त्याने मिळवला. राजस्थान रॉयल्स संघाकडून खेळणाऱ्या या १५ वर्षीय फलंदाजाला, मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात मैदानात उतरताना हा विक्रम मोडण्यासाठी केवळ दोन धावांची गरज होती. त्याने विल जॅक्सच्या गोलंदाजीवर दुसरी धाव घेत हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. यासह, टी-२० स्पर्धेत एखाद्या किशोरवयीन खेळाडूने केलेल्या सर्वाधिक धावांचा आधीचा विक्रम त्याने अधिकृतपणे मोडीत काढला. २०२६ मध्ये सूर्यवंशीने आतापर्यंत १४ सामन्यांत ४८३ धावा केल्या आहेत. किशोरवयीन फलंदाजांच्या यादीतील यापूर्वीचा विक्रम देवदत्त पडिक्कलच्या नावावर होता.

# गुलवीर सिंगचा ५ हजार मीटरचा नवीन राष्ट्रीय विक्रम

## लॉस एंजेलिस ट्रॅक फेस्ट

◆ **लॉस एंजेलिस, २४ मे**

भारताचा अव्वल लांब पल्ल्याचा धावपटू गुलवीर सिंग याने लॉस एंजेलिस येथे आयोजित लॉस एंजेलिस ट्रॅक फेस्ट स्पर्धेत दुसरे स्थान पटकावताना, ५००० मीटर धावण्याच्या शर्यतीत एक नवीन आऊटडोअर राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला. लॉस एंजेलिस ट्रॅक फेस्ट ही वर्ल्ड ॲथ्लेटिक्स कॉन्टिनेंटल टूर सिल्व्हर दर्जाची स्पर्धा आहे.



या शर्यतीत गुलवीर सिंगने १३ मिनिटे ०३.९३ सेकंदांची वेळ नोंदवली. या कामगिरीसह त्याने स्वतःचाच १३:११.८२ सेकंदांचा असलेला जुना आऊटडोअर राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. २७ वर्षीय गुलवीरने गत वर्षी बोस्टन येथे झालेल्या टेरियर चॅलेंज या इनडोअर स्पर्धेत १२ मिनिटे ५९.७७ सेकंदांची वेळ नोंदविली होती; ५००० मीटर शर्यतीमधील त्याचा तोच विक्रम सध्या त्याचा एकूण राष्ट्रीय विक्रम म्हणून कायम आहे. ही त्याच्या कारकिर्दीतील दुसरी सर्वोत्तम वेळ ठरली आहे.

लॉस एंजेलिसमधील या शर्यतीत, एरिट्रियाचा धावपटू हॅबटॉम सॅम्युअल याने १२:५७.२३ सेकंदांची वेळ नोंदवित प्रथम क्रमांक पटकावला.

(वृत्तसंस्था)

# वर्ल्ड चॅलेंज कपमध्ये प्रणती नायकने पटकावले रौप्यपदक

◆ **ताश्कंद, २४ मे**

ताश्कंद येथे आयोजित एअफआयजी वर्ल्ड चॅलेंज चषक जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत भारताच्या प्रणती नायकने महिलांच्या व्हॉल्ट प्रकारात रौप्यपदक पटकावले.

ओडिशाची रहिवासी असलेली ही ३१ वर्षीय जिम्नॅस्ट प्रणती नायक ही यापूर्वी तीन वेळा आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत पदक विजेती ठरली आहे. तिने शनिवारी अंतिम फेरीत आपल्या दोन व्हॉल्ट्समध्ये अनुक्रमे १२.९५० आणि १२.७०० गुण मिळवले. या गुणांच्या आधारे तिने १३.०२५ ची सरासरी नोंदवित हे पदक निश्चित केले. व्हिएतनामच्या थी क्विन न्हु न्गुयेन हिने १३.३७५ गुणांसह सुवर्णपदक जिंकले, तर उझबेकिस्तानच्या शाखिनाबोनू युसुफोवा हिने १२.९५० गुणांसह कांस्यपदकावर नाव कोरले. अंतिम फेरीत पोहोचलेली आणखी एक भारतीय स्पर्धक, प्रतिष्ठा सामंता हिने १२.८५० गुणांसह सहावे स्थान पटकावले.



रौप्यपदकाची मानकरी जिम्नॅस्ट प्रणती नायक

**चिकाटीचा आधार मिळाला : प्रणती नायक**

गत काही महिन्यांचा काळ आव्हानात्मक होता; परंतु पुन्हा जोमाने उभारी घेण्यासाठी चिकाटी व श्रद्धेचा तिला मोलाचा आधार मिळाला, असे स्पर्धेनंतर प्रणती नायक म्हणाली. प्रणती भुवनेश्वर येथील ओडिशा/ इंडिया जिम्नॅस्टिक्स हाय परफॉर्मन्स सेंटरमध्ये सराव करते. संयम, चिकाटी आणि श्रद्धेची फळे तुम्हाला नेहमीच मिळतात, असे ती म्हणाली.

(वृत्तसंस्था)

# भारतीय नौदलाच्या गुरिंदरवीरला सुवर्ण

◆ **रांची, २४ मे**

भारतीय नौदलाचा धावपटू गुरिंदरवीर सिंग याने रांची येथे इतिहास रचला. त्याने १०० मीटर शर्यतीत १०.०९ सेकंदांची राष्ट्रीय विक्रमी वेळ नोंदवित सुवर्णपदक पटकावले आणि २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता मिळविली.

गुरिंदरवीरने १०.०९ सेकंदांची राष्ट्रीय विक्रमी वेळ नोंदविली आणि या शर्यतीत १०.१० सेकंदांपेक्षा कमी वेळेत धावणारा तो पहिला भारतीय पुरुष धावपटू ठरला.

या २५ वर्षीय धावपटूने यापूर्वीच्या राष्ट्रीय विक्रमामध्ये ०.०६ सेकंदांची सुधारणा केली. उपांत्य फेरीतगुरिंदरवीरने १०.१७ सेकंदांची वेळ नोंदवत सर्वप्रथम एक नवीन विक्रम प्रस्थापित केला होता; परंतु अवघ्या काही मिनिटांतच अनिमेष कुजूर याने १०.१५ सेकंदांची वेळ नोंदवत तो विक्रम मोडीत काढला. मात्र, अंतिम फेरीत गुरिंदरवीरने १०.०९ सेकंदांची ऐतिहासिक वेळ नोंदवत आपला विक्रम पुन्हा एकदा स्वतःच्या नावावर केला.

पुरुषांच्या १०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक जिंकल्यानंतर भारतीय नौदलाकडून धावपटू गुरिंदरवीर सिंग याचे विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले.



फिनिश लाईन पार करताना गुरिंदरवीर सिंग व अनिमेष कुजूर

भारतातील सर्वात वेगवान पुरुष अशा शब्दांत नौदलाकडून त्याला एका पोस्टमध्ये संबोधण्यात आले. गुरिंदरवीरची ही कामगिरी त्याची गती, समर्पण आणि जिगरबाज वृत्तीचे यथार्थ दर्शन घडविवते. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याला २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धा आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा या दोन्ही स्पर्धांसाठी पात्रता मिळवणेही शक्य झाले, असे नौदलाने नमूद केले आहे.

(वृत्तसंस्था)

# गुकेशला लय मिळविण्याची संधी

## नॉर्वे बुद्धिबळ आजपासून

◆ **ओस्लो, २४ मे**

सोनवारपासून येथे प्रतिष्ठित नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. स्पधेच्या पहिल्या फेरीत विश्वविजेता डी. गुकेशला आपल्या मोहिमेच्या प्रारंभी अव्वल दर्जाच्या खेळाडूंविरुद्ध संयम आणि कौशल्याच्या आणखी एका कठीण परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे. या स्पर्धेत त्याला आपल्या विश्वविजेतेपदाच्या बचावापूर्वी आपला फॉर्म परत मिळविण्याची संधी मिळेल.



डी. गुकेश



आर. प्रज्ञानंद

या अव्वल दर्जाच्या खेळाडूंमध्ये माजी प्रथम विश्वमानांकित नॉर्वेचा मॅग्नस कार्लसेन आघाडीवर आहे . स्पर्धेत गुकेश याच्याशिवाय भारतीय स्टार आर. प्रज्ञानंद याचाही समावेश आहे. ओस्लोच्या निसर्गरम्य परिसरात आणि तेथील सुंदर फ्योर्ड्समध्ये देशाची पहिल्या विजेतेपदाची प्रदीर्घ प्रतीक्षा संपवण्याचे ध्येय एका बलाढ्य भारतीय पथकाने ठेवले आहे.

या स्पर्धेत खुल्या व महिला या दोन्ही गटांतील जगातील सहा सर्वोत्तम खेळाडू सहभागी होतील.

**भारताचे सशक्त प्रतिनिधित्व**

आता जागतिक बुद्धिबळातील एक बलाढ्य शक्ती म्हणून प्रस्थापित झालेल्या भारताचे या स्पर्धेत चार प्रतिनिधी असतील, खुल्या गटात गुकेश आणि प्रज्ञानंद, तर महिलांच्या गटात कोनेरू हम्पी आणि विश्वचषक विजेती दिव्या देशमुखचा समावेश आहे. मात्र, या चारही भारतीय खेळाडूंना स्पर्धा जिंकणे अजिबात सोपे असणार नाही, कारण जागतिक क्रमवारीत अव्वल व स्थानिक आवडता खेळाडू कार्लसेन, फ्रान्सचा स्टार अलीरेझा फिरौजा, जर्मनीचा व्हिन्सेंट केमर आणि अनुभवी अमेरिकन खेळाडू वेस्ली सो यांचा समावेश असलेल्या बलाढ्य खेळाडूंच्या गटाचे नेतृत्व करत आहे. महिलांच्या गटात, दोन भारतीय प्रतिनिधींसोबतच, पाच वेळा विश्वविजेती आणि विद्यमान विश्वविजेती जू वेनजुन, नॉर्वेची गतविजेती ॲना मुझीचुक, विद्यमान विश्व ब्लिट्झ चॅम्पियन बिबिसारा असाउबायेवा आणि चीनची वेगाने उदयास येणारी स्टार झू जिनर यांचा समावेश आहे. नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या स्वरूपानुसार, खुल्या आणि महिला गटांमध्ये प्रत्येकी सहा खेळाडू १० फेऱ्यांमध्ये स्पर्धा करतात.

(वृत्तसंस्था)

# विश्वचषक नेमबाजीसाठी भारतीय संघाची घोषणा

◆ **नवी दिल्ली, २४ मे**

भारत २४ ते ३१ मे दरम्यान म्युनिक येथे होणाऱ्या आयएसएसएफ रायफल/पिस्तूल विश्वचषक स्पर्धेत आपला २२ सदस्यीय संघ उतरवणार आहे. यामध्ये दोन ऑलिम्पिक पदके जिंकणारी मनू भाकर, मिश्र सांघिक स्पर्धेशिवाय दोन वैयक्तिक पिस्तूल स्पर्धांमध्येही सहभागी होणार आहे.

संघात अनुभव, तारुण्याचा सुरेख संगम

या संघात अनुभवी खेळाडू आणि युवा नेमबाजांचा सुरेख मेळ साधण्यात आला आहे; ही स्पर्धा नेमबाजी क्षेत्रातील वर्षातील प्रमुख स्पर्धांपैकी एक मानली जाते, असे नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियाने (एनआरएआय) रविवारी एका संघाची घोषणा करताना सांगितले.

मनू भाकरच्या जोडीनेच, ऑलिम्पियन आणि जागतिक अजिंक्यपद स्पर्धेची पदक विजेती ईशा सिंग सुद्धा दोन वैयक्तिक पिस्तूल स्पर्धांमध्ये सहभागी होईल. या हंगामात पहिल्यांदाच भारताचे आघाडीचे नेमबाज देशाबाहेर जाऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च दर्जाच्या स्पर्धेत सहभागी होत आहेत.



मनू भाकर व ईशा सिंग

या स्पर्धेची सुरुवात २६ मे रोजी महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रिसिजन स्टेजने (अचूकता फेरीने) होईल. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूलची पात्रता फेरी आणि महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन्सची एलिमिनेशन फेरी (बाद फेरी) पार पडेल; यासोबतच पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल स्पर्धेची पात्रता फेरीही होईल.

या स्पर्धेतील पहिले अंतिम सामने पुरुषांची १० मीटर एअर पिस्तूल आणि पुरुषांची १० मीटर एअर रायफलहे देखील स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी नियोजित आहेत. म्युनिक येथील विश्वचषकात ८० देशांमधील एकूण ६९६ नेमबाज सहभागी होण्याची अपेक्षा आहे. एप्रिलमध्ये ग्रॅनाडा येथे झालेल्या या हंगामातील पहिल्या रायफल/पिस्तूल विश्वचषकात भारताने एक सुवर्णपदक जिंकले होते. म्युनिक येथील स्पर्धेत भारताचे अव्वल मानांकन असलेले रायफल आणि पिस्तूल नेमबाज सहभागी होतील व त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील अत्यंत कडव्या स्पर्धेचा सामना करावा लागेल.

(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सांगोला तालुक्यात वादळी पावसाने घरांचे, फळबागांचे मोठे नुकसान

**सांगोला,दि.२४ मे -**

सांगोला तालुक्यातील पश्चिम भागात रविवार दि.२४ मे रोजी दुपारी वादळी वाऱ्यासह जोराचा पाऊस पडला. काही ठिकाणी गारपीटही झाली. परिणामी अनेक ठिकाणी फळबागांचे नुकसान झाले. चोपडी, नाझरे, बलवडी, सोमेवाडी, हातीद, उदनवाडी, गौडवाडी, पाचेगाव खुर्द या परिसरात दुपारी अडीच ते साडेतीनच्या दरम्यान वादळी वाऱ्यासह जोराचा पाऊस तर काही ठिकाणी गारांचा पाऊस झाला. उन्हापासून संरक्षण करण्यासाठी त्याचबरोबर विविध प्रकारच्या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी डाळिंबाच्या पिकावर आवरण झाकले होते. ते आवरण अनेक बागांमध्ये फाटले आहे. फळांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत. चोपडी येथील चौगुले मळा येथे असणाऱ्या लक्ष्मण चौगुले, अशोक चौगुले, नामदेव डोंगरे यांच्या डाळिंबाच्या बागेवर केलेले आच्छादन वाऱ्याने फाटून गेले आहे. डाळिंबाची झाडेही उन्मळून पडली आहेत. बलवडी येथील सिद्धेश्वर शिंदे यांच्या डाळिंबाच्या बागेचे व सोमेवाडी येथील चक्रधारी खांडेकर यांच्या आंबा बागेचे नुकसान झाले आहे. पाचेगाव खुर्द येथील संतोष भंडगे यांचे राहते घराचे पत्रे उडून पडले. मात्र कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही.

### आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत कै. विठ्ठलरावजी शिंदे प्रशालेचे यश

**कुर्डूवाडी, दि. २४ मे-**

इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत सोजरताई बहुउद्देशीय विकास मंडळ निमगाव टे. संचलित.कै. विठ्ठलरावजी शिंदे प्रशाला अंबाड, या विद्यालयातील श्रुती सरवदे (२१६) तसेच आरती टोणपे (१६८) या शिष्यवृत्तीसाठी पात्र झाल्या आहेत. विद्यार्थ्यांना ननवरे ए. एच., तांबोळी एफ. जे. आणि चव्हाण डी. एल. यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थिनी व त्यांना मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.आ. संजय शिंदे तसेच संस्थेचे सचिव प्राचार्य रीजेश ठोंबरे, विद्यालयाचे प्राचार्य जवानसिंग रजपूत, माध्यमिक विभागाचे प्रमुख एम.एस. पाटील, उच्च माध्यमिक विभागाचे प्रमुख व्ही.एन. घाडगे, यशवंत प्रायमरी स्कूल, अंबाडचे प्राचार्य एस.आर. होनमोटे यांनी अभिनंदन केले.





### नागेश कोरे सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्ह्यातून २ वर्षाकरीता तडीपार

**सोलापूर, दि. २४ मे-**

गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असलेला नागेश शिवलिंग कोरे ( वय-५३, रा. म्हेत्रे वस्ती, कुमठा नाका, सोलापूर) यास सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्हयातून २ वर्षाकरीता तडीपार करण्यात आले आहे. आरोपी नागेश कोरे याच्या विरुध्द सन २०१७,२०२१, व २०२५ या कालावधीमध्ये गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा, मारामारी करणे, खुल्या प्लॉटची व घर बांधकामाची खोटी कागदपत्रे बनवुन सामान्य जनतेची घरजागा जबरदस्तीने बळकावणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याचेविरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५६ (१) (अ) (ब) अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने पोलिस उप-आयुक्त (परिमंडळ) -प्रितम यावलकर यांनी आरोपी नागेश कोरे यास सोलापूर शहर व उर्वरीत सोलापूर जिल्हा येथून दोन वर्षाकरीता तडीपार केल्याची माहिती फौजदार एन. एस. कानडे यांनी दिली आहे.



### कृषीमंत्री भरणे यांनी घेतली धोत्रे यांची भेट

**पंढरपूर,दि.२४ मे -**

मनसे नेते दिलीप धोत्रे हे कार अपघाता काही दिवसांपूर्वी गंभीर जखमी झाले होते. उपचारानंतर प्रकृतीत सुधारणा झाल्याने ते नुकतेच पंढरपूर येथील निवासस्थानी परतले आहेत. रविवारी राज्याचे कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी धोत्रे यांच्या निवासस्थानी भेट घेत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. तसेच लवकरात लवकर पूर्णपणे बरे व्हावे, अशा शुभेच्छा दिल्या. अपघाताची माहिती समोर आल्यानंतर राज्यभरातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातून दिलीप धोत्रे यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त होत होती. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही दूरध्वनीद्वारे त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती. विविध पक्षांतील अनेक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भेटी देत त्यांना धीर दिला. पंढरपूर येथील सामान्य नागरिकांसाठी कायम मदतीला धावून येणारे धोत्रे यांच्या पाठीशी साक्षात विठ्ठल असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## निधन वृत्त...

### पत्रकार सुधीर लोमटे यांना पितृशोक

**धाराशिव, दि. २४ मे-**



कळंब तालुक्यातील मलकापूर येथील सेवानिवृत्त शिक्षक शिवाजीराव भीमराव लोमटे (वय ८५) यांचे रविवारी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. ते बहुउद्देशीय सामाजिक संस्था तथा येरमाळा पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष आणि दैनिक तरुण भारतचे प्रतिनिधी पत्रकार सुधीर लोमटे यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात दोन मुलं, सुना, नातवंडे, पत्नी असा परिवार आहे. त्यांच्यावर रविवारी दुपारी १ वाजता मलकापूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. तरुण भारत परिवार सुधीर लोमटे यांच्या दुःखात सहभागी आहे.

# लवंगी मिरची कला केंद्रावर छापा

## बार्शी तालुका पोलिसांची मध्यरात्री मोठी कारवाई

**- ५० लाख १३ हजारांचा मुद्देमाल जप्त**

**- नृत्यांगना, ग्राहक, चालक व मालकांसह तब्बल ७२ जणांवर गुन्हा**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २४ मे -**

बार्शी तालुका पोलिसांनी शनिवारी मध्यरात्री लातूर रोडवरील लवंगी मिरची कला केंद्रावर छापा टाकला. कारवाईत तब्बल ५० लाख १३ हजार ४६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध व्यवसायांविरोधातील धडक मोहिमेअंतर्गत पोलिसांनी मोठी कारवाई करत मध्यरात्री छापा टाकला. पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या आदेशानुसार बार्शी तालुका पोलीस ठाणे हद्दीत अवैध व्यवसायाविरोधात मोहीम राबविण्यात येत आहे.

रविवार दि. २४ मे रोजी मध्यरात्री सुमारे १.३० वाजण्याच्या दरम्यान बार्शी-लातूर रोडवरील लवंगी मिरची कला केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या वेळेनंतरही सुरु असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिस पथकाने तत्काळ धाड टाकली असता, कला केंद्रात नृत्यांगना, ग्राहक, चालक व मालक अशा एकूण ७२ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र पोलीस अधिनियम तसेच महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

कारवाई दरम्यान पोलिसांनी रोख रक्कम, मोबाईल फोन, विविध साहित्य, चारचाकी व दुचाकी वाहने तसेच देशी दारुच्या बाटल्या असा एकूण ५० लाख १३ हजार ४६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गुन्ह्याचा तपास बार्शी तालुका पोलिस करीत आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे तसेच सहायक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक महेश माने, पोलीस उपनिरीक्षक बालाजी वळसने, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय भालेराव, पोसई चंद्रकांत घोळवे, पोहेकॉ धनराज केकाण, पोहेकॉ डुकळे, पोहेकॉ स्वाती काटे, पोकॉ राहुल बोंदर, पोकॉ बिरकले, पोकॉ कांबळे, पोना चौधरी तसेच चालक पोकॉ खराडे यांच्या पथकाने पार पाडली.

**रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई करणार**

तालुका ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसायांवर यापुढे धडक कारवाया करण्यात येणार आहेत. अवैध दारू विक्री, मटका, गुटखा, पत्यांचा जुगार क्लब, लॉजेस वरील वेश्याव्यवसाय, रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर तडीपार कारवाई करणार आहे.

- **महेश माने,** प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक, बार्शी तालुका ग्रामीण पोलिस ठाणे.

# बार्शी तालुका पोलिस ठाण्यात शांतता कमिटीची बैठक

**कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबाबत चर्चा**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.२४ मे -**

आगामी बकर ईद सण आणि निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात शांतता, सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक पार पडली.

बैठक आज रविवार दि. २४ मे रोजी पार पडली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने, पीएसआय भालेराव, एएसआय गवळी, पोलीस हवालदार शेलार, मंगरुळे तसेच इतर पोलीस अंमलदार तसेच पत्रकार, पोलीस पाटील, मोहल्ला कमिटी सदस्य, मुस्लिम बांधव, कुरेशी (खाटीक) समाजाचे प्रतिनिधी, शांतता समिती सदस्य उपस्थित होते.

बैठकीत सर्व समाजबांधवांना पोलीस प्रशासनास पूर्ण सहकार्य करण्याचे, सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याचे आणि अफवा, आक्षेपार्ह पोस्ट किंवा चुकीच्या संदेशांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.



**मुख्य सूचना**

* बकर ईद सण शांततेत, कायद्याचे पालन करून साजरा करावा.
* गोवंश हत्या करु नये. मांस विक्री उघड्यावर करू नये.
* परिसर स्वच्छ ठेवावा.

**ग्राम सुरक्षा दलाला साहित्य वाटप**

बैठकीत ग्राम सुरक्षा दलातील सदस्यांना गाव परिसरातील सुरक्षा आणि आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी लाठी, शिट्टी आणि टॉर्चचे वाटप करण्यात आले. रात्रगस्त, जनजागृती आणि संशयास्पद हालचालींवर नजर ठेवण्यासाठी या साहित्याचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# वादळी पावसाने मंद्रूप परिसरात मोठे नुकसान

**झाडे कोसळली, वीजेचे खांब पडले**

**तभा वृत्तसेवा**
**दक्षिण सोलापूर, दि. २४ मे -**

मंद्रूप परिसरात शनिवारी रात्री अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने पिकांसह अनेक घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. बाशा शेख यांच्या शेतातील बैलावर वीज कोसळल्याने बैलाचा मृत्यू झाला.

शनिवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास पाऊस, गारपीट आणि प्रचंड वेगाच्या वाऱ्यामुळे नागरिकांची मोठी धावपळ उडाली. वीजांच्या गडगडाटामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण दिसून आले. अनेक घरांवरील पत्रे उडून गेले. काही ठिकाणी पत्र्याच्या शेडही हवेत उडाले. वाऱ्याचा वेग इतका जबरदस्त होता की गावातील अनेक मोठी झाडे रस्त्यावर कोसळली. त्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली. अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून रस्त्यावर पडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे व्यापारी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचे मोठे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.

महावितरणच्या वीज वाहिन्यांनाही मोठा फटका बसला आहे. वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी वीज तारा तुटल्या आहेत. काही भागांत वीज वितरण कंपनीचे खांबही कोसळले. त्यामुळे मंद्रूप परिसरातील वीजपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला. काही भाग अंधारात गेले असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. महावितरणचे कर्मचारी तातडीने दुरुस्तीचे काम सुरू करण्यासाठी घटनास्थळी दाखल झाले आहेत.

गारपिटीमुळेही शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. फळबागायत पिकांना फटका बसला आहे. काही ठिकाणी पत्रे आणि फांद्या रस्त्यावर उडत असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला होता. वादळी वाऱ्यामुळे काही ठिकाणी घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले. घरातील संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान झाले असून अनेक कुटुंबांना रात्रीच्या वेळी अंधारातच परिस्थितीचा सामना करावा लागला. गावातील काही भागात मोबाईल नेटवर्क सेवाही काही काळ विस्कळीत झाली होती. नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले, तर काहींनी सुरक्षिततेसाठी नातेवाईकांच्या घरांचा आसरा घेतला.

**वीज अंगावर पडून बैलाचा मृत्यू**

शनिवारी रात्री झालेल्या वीजांच्या गडगडाटामुळे पावसाचे रौद्ररूप दिसून आले. यावेळी वीज पडून मंद्रूपमधील बाशा शेख यांच्या बैलाचा मृत्यू झाला. शनिवारी दिवसभर मशागत करून शेतात बैल बांधले होते. रात्री अचानक वीज बैलाच्या अंगावर वीज कोसळली. घटनेचा तलाठी रावसाहेब कोकरे यांनी पंचनामा करून शासनाकडे अहवाल पाठविल्याचे सांगितले.

# बार्शी तालुक्यात वादळी पावसाने तडाखा

**पिंपळगांव (धस) येथे वीज पडून दुभती म्हैस ठार**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ मे -**

बार्शी तालुक्यात शनिवारी रात्री विजांचा कडकडाट, वादळी वारे आणि मुसळधार पावसाने मोठा तडाखा दिला. पावसामुळे अनेक ठिकाणी नुकसान झाले. पिंपळगांव (धस) येथे वीज पडून शेतकऱ्याची दुभती म्हैस जागीच ठार झाली. धामणगांव दुमाला येथे जोरदार वाऱ्यामुळे जुने पिंपळाचे झाड पत्र्याच्या शेडवर कोसळले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

शनिवारी रात्री बार्शी शहरासह पिंपळगाव (धस), आगळगांव, उंबर्गे, काटेगाव परिसरात तसेच वैराग परिसरातील अनेक गावांना वादळी वारे आणि जोरदार पावसाचा फटका बसला. अनेक ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाला. शेती व घरांच्या नुकसानीच्या घटना समोर येत आहेत.पिंपळगाव (धस) येथील शेतकरी संदीप पाटील यांनी आपली दुभती म्हैस नेहमीप्रमाणे घराबाहेर बांधली होती. रात्री अचानक विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. याच दरम्यान म्हशीवर वीज कोसळल्याने ती जागीच मृत्युमुखी पडली.

दुभती म्हैस मृत झाल्याने शेतकरी संदीप पाटील यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, शासनाने पंचनामा करून तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे. धामणगांव दुमाला येथे वादळी वाऱ्यामुळे जुने मोठे पिंपळाचे झाड पत्र्याच्या शेडवर कोसळूले. मात्र, सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

घटनांची माहिती मिळताच तहसीलदार एफ. आर. शेख यांनी मंडळ अधिकारी, तलाठी व ग्रामसेवक यांना तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**हवामान खात्याचा सावधानतेचा इशारा**

हवामान विभागाने पुढील काही दिवस वादळी पाऊस आणि विजांच्या कडकडाटाचा इशारा दिला आहे. नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी व सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सोलापूर विधान परिषद बिनविरोध करा : पालकमंत्री

**संख्याबळ नसल्याने विरोधकांनी इतिहास घडवावा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ मे -**

विधान परिषदेच्या सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत एकूण ६१६ मतदारांपैकी एकट्या भाजपकडे ४५० च्या आसपास मतदार आहेत. मित्रपक्षांचेही बरेच सदस्य आहेत. त्यामुळे विरोधकांनी ही निवडणूक बिनविरोध करून इतिहास घडवावा असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

पालकमंत्री जयकुमार गोरे हे पंढरपूर इथे आषाढी वारी आणि महाराज मंडळींची भेट घेण्यासाठी आले होते. त्या नंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. सोलापूर विधान परिषदेच्या निवडणुकीबाबत गोरे यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्यातील नगर पालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि सोलापूर महापालिका निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळाले आहे. होऊ घातलेल्या विधान परिषद निवडणुकीसाठी एकूण ६१६ मतदार आहेत. त्या पैकी एकट्या भाजपकडे साडेचारशेच्या आसपास मतदार आहेत. या शिवाय महायुतीमधील शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी ( अजित पवार) पक्षाची अशी मिळून संख्या मोठी होती. तर विरोधकांकडे संख्याबळ कमी आहे. त्यामुळे विरोधकांनी ही निवडणूक बिनविरोध करावी.व्यवस्थेवरही ताण येऊ नये म्हणून विरोधकांनी निवडणूक न लढवता बिनविरोध करावी.

कोणाला उमेदवारी देणार हा निर्णय पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील. कार्यकर्त्यांना आपल्या नेत्याला तिकीट मिळावे हे वाटणे स्वाभाविक आहे. त्यामुळे पक्ष जो निर्णय घेईल तो प्रमाण मानू असे ते म्हणाले. आषाढी वारी संदर्भात नियोजन सुरू आहे. सर्व प्रशासकीय यंत्रणा वारीला येणाऱ्या भाविकांना नवे तंत्रज्ञान वापरून चांगल्या सोयीसुविधा देणार आहे असेही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

**कॉरिडॉर सुरू होण्यापूर्वीची शेवटची आषाढी वारी**

पंढरपूर कॉरिडॉरचे काम सुरू होण्यापूर्वीची यंदाची शेवटची आषाढी वारी असणार आहे. वारीसाठी अनेक स्तरावर तयारी सुरू आहे. मात्र पुढील वर्षी कॉरिडॉरच्या वेगळ्या माहोलात पंढरपूरची वारी होईल. कॉरिडॉरच्या अनुषंगाने महत्त्वाचे निर्णय मुख्यमंत्री घेतील. मात्र टेंडर प्रक्रिया होऊन आषाढीनंतर बाधितांना योग्य मोबदला देऊन भूसंपादन होईल, अशी माहिती गोरे यांनी दिली आहे.



# रिअल अचिव्हर्स पुरस्काराने डॉ.यशवंत कुलकर्णी सन्मानित

**उत्कृष्ट व्यवस्थापनचा चौदावा पुरस्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २४ मे-**

श्रीपूर ता.माळशिरस येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखात्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांना ग्रीन वर्ल्ड रिअल अचिव्हर्स पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट व्यवस्थापनचा त्यांना हा चौदावा पुरस्कार मिळाला आहे.

ग्रीन वर्ल्ड या मान्यता प्राप्त संस्थेच्या वतीने उद्योग, शेती व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देवून गौरविण्यात येते. कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, इन्कमटॅक्स कमिशनर अजय केसरी, छत्रपती संभाजी नगरचे विभागीय आयुक्त दिलिप गावडे, जाधवर ग्रुप इन्स्टिटयूटचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, लीड जी डब्ल्यू फाउंडेशन ग्रीन वर्ल्डचे अध्यक्ष गौतम कोतवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. यशवंत कुलकर्णी यांना सन्मानित करण्यात आले .

यावेळी कारखान्याचे प्रोडक्शन मॅनेजर एम. आर. कुलकर्णी, मुख्य लेखापाल रविंद्र काकडे, मुख्य शेती अधिकारी संतोष कुमठेकर, ऊस विकास अधिकारी सोमनाथ भालेकर, संगणक व्यवस्थापक तानाजी भोसले, मुख्य अभियंते सचिन विभूते, इस्टेट मॅनेजर रमेश गाजरे, सिव्हिल इंजिनिअर हणमंत नागणे, इन्स्ट्रूमेन्ट मॅनेजर समर सय्यद, टाईम किपर सोपान कदम, सेक्रेटरी भीम बाबर उपस्थित होते .

गौतम कोतवाल म्हणाले की, उद्योग, शेती व सामाजिक क्षेत्रात विविध प्रयोगांमधून वैशिष्ट्यपूर्ण काम करून समाजोपयोगी काम करणाऱ्या कर्तुत्ववानांचे काम समाजासमोर यावे. यातून अनेकांना प्रेरणा मिळावी हा एकमेव पुरस्कार देण्यामागील उद्देश आहे.

**लघु उद्योगाद्वारे १५० जणांना दिले काम**

डॉ. यशवंत कुलकर्णी हे कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक साखर कारखान्यात उत्तम व्यवस्थापक म्हणून काम करत आहेत. त्यांनी कारखान्याची प्रगती साधलीच शिवाय व्यक्तिगत उद्योग मिनरल वॉटर, रिसॉर्ट या माध्यमातून सुमारे १५० युवकांना रोजगार उपलब्ध करून दिला हे निकष महत्वाचे आहेत.

# घोषाच्या गजरात सोलापुरात संघ शक्तिचा आविष्कार

## रा.स्व. संघाच्या 335 स्वयंसेवकांचे दिमाखदार संचलन

### शिस्त, समन्वय अन् घोष रचनांनी वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मे-**

घोषाच्या दणदणीत तालावर एकसमान पावलांनी पुढे सरकणाऱ्या स्वयंसेवकांनी रविवारी सायंकाळी सोलापूरकरांना संघ पथसंचलनाचा थरार अनुभवायला मिळाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघ शिक्षा वर्गातील ३३५ प्रशिक्षणार्थी स्वयंसेवकांचे शहरातून निघालेले शिस्तबद्ध संचलन केवळ एक मिरवणूक न ठरता संघटनशक्ती, आत्मविश्वासाचे प्रभावी दर्शन ठरले.

पूर्ण गणवेशातील स्वयंसेवक, पारंपरिक वाद्यांच्या लयबद्ध निनादात पुढे सरकणारी घोष पथकांचे संचलन मार्गावर अनेक ठिकाणी नागरिकांनी उभे राहून स्वयंसेवकांचे स्वागत केले. घोषाच्या विविध रचनांनी आणि स्वयंसेवकांच्या एकसमान पावलांनी शहराचे



संघमय वातावरण निर्माण झाले होते.

सायंकाळी ६.४५ वाजता हरिभाई देवकरण प्रशाला येथून भगव्या ध्वजाला प्रणाम करुन संचलनास प्रारंभ झाला. हरिभाई देवकरण प्रशाला, ज्ञानप्रबोधिनी मार्ग, डॉ.फडकुले सभागृह, डॉ.आंबेडकर चौक, महापौर बंगला, अशोक चौक, पटवर्धन चौक, शांतीसागर मंगल कार्यालय मार्गे पुन्हा हरिभाई देवकरण प्रशाला येथे संचलनाची सांगता झाली.

### संचलन रचना ठरली आकर्षण

संचलनाची रचना ही विशेष आकर्षण ठरली. प्रारंभी स्वयंसेवकांच्या वाहिन्या, त्यामागे घोष पथक आणि स्वयंसेवकांच्या वाहिन्या अशा क्रमाने संचलन पुढे सरकत होते. संपूर्ण मार्गावर घोष पथकाच्या तालावर स्वयंसेवकांनी राखलेली शिस्त आणि समन्वय. विशेष हॉस्पिटल समोर घोष वादन सौम्य असे हि बाब नागरिकांचे लक्ष वेधून घेत होती. या संचलनात संघ शिक्षा वर्गाचे सर्वाधिकारी शशिकांत फिरंगे, वर्ग कार्यवाह प्रशांत सहस्त्रबुद्धे, अखिल भारतीय व्यवस्था प्रमुख मंगेश भेंडे यांच्यासह विविध अधिकारी सहभागी झाले होते.

### संरक्षण दलाच्या संचलनाचा भास

पूर्ण गणवेशातील स्वयंसेवकांचे संचलन पाहताना अनेक नागरिकांना एखाद्या संरक्षण दलाची शिस्तबद्ध तुकडी शहरातून मार्गक्रमण करत असल्याचा अनुभव आला. घोषाच्या ठेक्यावर एकाच लयीत पडणारी पावले आणि स्वयंसेवकांची ताठ चाल संचलनाचे विशेष आकर्षण ठरली.

### व्यवस्थापनातही स्वयंसेवकांची तत्परता

संचलन सुरळीत पार पडावे यासाठी शहरातील अनेक स्वयंसेवकांनी व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली. मार्गावरील अडथळे दूर करणे, वाहतूक सुरळीत ठेवणे आणि नागरिकांना मार्गदर्शन करणे अशी कामे त्यांनी केली.

### आत्मविश्वास, संघटनबळ आणि राष्ट्रसमर्पणाची अनुभुती

संघ शिक्षा वर्गातील हे संचलन म्हणजे आत्मशिस्त, संघटनबळ आणि राष्ट्रसमर्पणाची अनुभूती आहे. येथे मिळणारे प्रशिक्षण स्वयंसेवकाची गुणवत्ता अधिक सक्षम करणारे असते. पुढील काळात समाजहित आणि राष्ट्रहितासाठी समर्पित कार्यकर्ता म्हणून स्वतःला सिधकरण्याचा प्रयत्न राहील. सोलापूरच्या घोष पथकाने अत्यंत उत्कृष्ट सादरीकरण केले, असे प्रतिपादन संघ शिक्षा वर्गाचे सर्वाधिकारी शशिकांत फिरंगे यांनी सांगितले.

## महत्वाचे...

### जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने फेक अकाउंट; पैशांची मागणी

**सोलापूर, दि.२४ मे-**

सोशल मीडियावर सोलापूरचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.यांच्या नावाने बनावट (फेक) अकाउंट तयार करून नागरिकांकडे पैशांची मागणी केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.काही अज्ञात व्यक्तींनी जिल्हाधिकाऱ्यांचे नाव व फोटो वापरून सोशल मीडियावर फेक अकाउंट तयार केले आहे. विविध कारणे सांगत नागरिकांकडे पैशांची मागणी केली जात असल्याची माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आली आहे. नागरिकांची फसवणूक होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे.



**सोलापूर : हुतात्मा स्मृती मंदिरात हौशी प्रायोगिक व्यवसायिक रंगकर्मी प्रतिष्ठान आयोजित कै.नामदेव वठारे नाट्य महोत्सव विक्रमाचा घातांक क्ष हे दोन अंकी नाटक सादर करण्यात आले.**



**अक्कलकोट : सदलापूर येथे झालेल्या बसवेश्वर केसरी कुस्ती मैदानात नेमलेल्या गादीवरील कुस्ती मध्ये श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांचे अमोलराजे पैलवान ग्रुपचा पै. व्यंकटेश (अजिंक्य) कुलकर्णी याने विजय मिळविला. त्याने श्री स्वामी समर्थ चरणी गदा ठेऊन आशिर्वाद घेतला. अमोलराजे यांनी त्याचा सत्कार करून अभिनंदन केले.**

## जगाच्या अस्तित्वासाठी शिव आणि शक्तीचा संगम अत्यावश्यक

### श्री.ष.ब्र. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी

### श्री नवदुर्गा माता मंदिरात अधिक मासानिमित्त धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ मे-**

जग चालविणाऱ्या पंचमहाभूतांमध्ये शक्ती देवीचे अस्तित्व आहे. जगाच्या अस्तित्वासाठी शिव आणि शक्तीचा संगम कायम राहण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन श्री गुरु संस्थान मठ गौडगावचे श्री. ष. ब्र. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले.ॉ

जोडभावी पेठेतील जय भारत समाजसेवा नवरात्र महोत्सव मंडळ श्री नवदुर्गा माता मंदिरातर्फे अधिक मासानिमित्त आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांचा प्रारंभ रविवारी झाला.यावेळी श्री. ष. ब्र. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण तसेच व गोमातेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी श्री वेदमूर्ती



विजयकुमार स्वामी (शास्त्री) यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. ष. ब्र. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी म्हणाले, जल, आकाश, वायू, पृथ्वी, आणि अग्नी या पंचमहाभूतांवर जग चालते. पृथ्वीमध्ये गुरुत्वाकर्षण शक्ती, जलामध्ये पिंडीकरण शक्ती, अग्नीमध्ये दाहक शक्ती, वायूमध्ये स्पंदन शक्ती तर आकाशामध्ये ध्वनी आकर्षण शक्ती आहे. श्री नवदुर्गा माता मंदिरातर्फे आयोजित करण्यात येणारे धार्मिक कार्यक्रम कौतुकास्पद आहेत. श्री नवदुर्गा माता जागृत देवी असून सोलापूरकरांनी या देवीच्या मूर्तीचे आवर्जून दर्शन घ्यावे, असेही श्री. ष. ब्र. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी सांगितले. याप्रसंगी मंडळाचे आधारस्तंभ सिद्धेश्वरन नाडार, संजय होमकर, भीमाशंकर पद्मगोंडा, नगरसेवक अक्षय अंजीखाने, उमेश उळागड्डे, नागेश होंड्राव, बाळासाहेब वाघमोडे, नरेंद्र होमकर, चंद्रकांत कलशेट्टी, रमेश उळागड्डे, गुरुराज पदमगोंडा, ऋतुराज वाघमोडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर अतनूरे यांनी केले.

### डॉ. शिवरत्न शेटे यांचे आज व्याख्यान

जय भारत समाजसेवा नवरात्र महोत्सव मंडळ श्री नवदुर्गा माता मंदिरातर्फे अधिक मासानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रम ांमध्ये सोमवारी (दि. २५) सायंकाळी ७ वाजता शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांचे धर्म संस्कृती व आजची स्त्री या विषयावर व्याख्यान होणार आहे. यावेळी सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## वटवृक्ष मंदिर परिसरात वाहतूक व्यवस्था रामभरोसे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ मे-**

अधिक मास उन्हाळी सुट्टी शनिवार रविवार सुट्टी यामुळे श्री दत्त अवतार श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनार्थ भाविकांची संख्या प्रचंड वाढली आहे. मंदीर परिसराची वाहतुक व्यवस्था रामभरोसे झाली आहे.

भाविकांच्या वाहनाची संख्या प्रचंड वाढली आहे . वटवृक्ष मंदिर परिसरात ३० मीटर बाहय वळण रस्ताता मंगरुळे चौक ते अन्नछत्र मंडळ रस्ता अतिक्रमण काढल्याने रस्त्यावर बेशिस्तपणे भाविकांची वाहने, अवैध प्रवासी वाहतुक वाहने ऑटोरिक्षा पार्क करणे होत आहे . या वर नगर पालिका ना अनधिकृत रिक्षा थांबेवर कारवाई करीत नाही ना वाहतुक पोलिस. वाहतुक पोलिसाची फिक्स्ड पॉईट नेमणुक होत नसल्याने वटवृक्ष मंदिर परिसरात मैंदर्गी रोड फ त्तेसिंह चौक बाहय वळण रस्ता वाहतुकीची कोंडी वारंवार



पहावयास मिळत आहे.

समस्याचा वाली कोण आहे का? भाविकांना त्रास कोण कमी करतील का ? शहरातील सीसीटीव्ही कॅमेरा द्वारे तरी वाहतुक कोंडीची दृष्ये पाहुन तरी याकडे उपाययोजना करिता कोण पुढाकार घेतील का हो ? असा प्रश्न वृध्द स्वामी भक्त लहान बालकांचे पालक यांच्याकडून विचारला जात आहे . तीर्थक्षेत्र अक्कलकोटी भाविकांची स्वामी दर्शनार्थ प्रचंड गर्दी झाली आहे. मंदिर परिसरातील वाहतुक कोंडी दुर करावी अशी म ागणी स्वामी भक्त नरेश अहिर पुणे, वसंत देडे , सुनिल कटारे, संभाजी जाधव ठाणे यांनी केली आहे .

## नई जिंदगीत दहशत निर्माण करणाऱ्या आरोपीची पोलिसांनी काढली धिंड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ मे-**

नई जिंदगी परिसरातील मौलाना चौक येथे जुन्या वादातून दोन गटांत भांडण झाले होते. कोयत्याने आणि लोखंडी पाईपने जीवघेणा हल्ला करून तरुणाला गंभीर जखमी करणाऱ्या सैफ मुकदूम शेख (रा. नई जिंदगी सोलापूर) या आरोपीवर एम आयडीसी पोलिसांनी कारवाई केली आहे. परिसरात आपली दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या या आरोपीची पोलिसांनी भररस्त्यातून धिंड काढून त्याला पोलीस ठाण्यात चालत आणले.

गुरुवार, दि.२१ मे रोजी सायंकाळी ६:३० च्या सुमारास नई जिंदगी परिसरातील मौलाना चौक येथे जुन्या वादातून दोन गटांत भांडण झाले होते. या भांडणाचे रूपांतर भीषण हाणाम ारीत झाले. आरोपी सैफ शेख आणि जैद शामू शेख (रा.नई जिंदगी) यांनी फिर्यादी मुस्तफा जाकीर शेख (रा. मौलाना आझाद चौक, नई जिंदगी) यांच्यावर लोखंडी पाईपने हल्ला केला. त्यांना उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी कारवाई करत आरोपींना नई जिंदगी परिसरातून ताब्यात घेतले. आरोपीची कोणतीही मोठी गुन्हेगारी पार्श्वभूमी नसली तरी परिसरातील त्याची दहशत मोडीत काढण्यासाठी पोलिसांनी आरोपीला गाडीत न नेता, परिसरातून पायी चालवत पोलीस ठाण्यापर्यंत आणले. या कारवाईमुळे परिसरात पोलिसांचा वचक निर्माण झाला असून, नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



### पोलिस चौकी के हिसाब से...

आरोपी सैफने नई जिंदगी परिसरात काही दिवसांपुर्वी एका हाताने गाडी चालवत एक व्हिडीओ तयार केला. यात ''पोलिस चौकी के हिसाब से शहर बाट रहे हो सुल्तान, चौकीयाँ चाहे पुलिस की हो, शहर के कमिशनर तो हम ही लोग है'' असा चित्रपटातील डायलॉग असलेला व्हिडिओ काढून व्हायरल केला होता. कारवाईनंतर आरोपी सैफ याने पोलिसाप्रति केलेल्या वक्तव्याची माफी मागून त्याचा ही व्हिडिओ व्हायरल केला आहे.

## रॉंग साईडने आलेल्या मोटारसायकलींची समोरासमोर धडक

### एकाचा मृत्यू, चौघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ मे-**

बार्शी-सोलापूर रोडवरील घोरवड्याच्या पुलाजवळ झालेल्या भीषण दुचाकी अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून, एकजण गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी रॉंग साईडने वाहन चालवून अपघात घडविल्याप्रकरणी संबंधित मोटारसायकल चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्यात सुनिल अर्जुन पवार (वय ५२, रा. पारधी कॅम्प, साठेलापूर रोड, बार्शी) यांनी फिर्याद दिली आहे.

यातील फिर्यादी यांचा पुतण्या युवराज विजय उर्फ विजू पवार व भाचा आकाश विजय पवार हे मुंबई येथे वास्तव्यास असून, समाजाच्या देवकार्याच्या निमित्ताने काही दिवसांपूर्वी बार्शी येथे आले होते. दि.२३ मे रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजता युवराज व आकाश हे मित्र सचिन राजू पवार यांची एमएच १३ ईयू १७७२ क्रमांकाची मोटारसायकल घेऊन सौंदरे (ता. बार्शी) येथे निघाले होते.

सायंकाळी सुमारे ६.४० वाजण्याच्या सुम ारास सोलापूर रोडवरील रेल्वे ब्रिज ओलांडून घोरवड्याच्या पुलाजवळ आल्यानंतर सम ोरून एमएच १३ डीडब्ल्यू ११४८ क्रमांकाची स्प्लेंडर मोटारसायकल रॉंग साईडने भरधाव वेगात आल्याने समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात युवराज पवार, आकाश पवार हे गंभीर जखमी झाले.

स्थानिक नागरिकांनी तत्काळ त्यांना




जगदाळे मामा हॉस्पिटल येथे दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी युवराज विजय उर्फ विजू पवार यास मृत घोषित केले. आकाश पवार याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. दरम्यान, दुसऱ्या मोटारसायकलवरील विवेक विश्वनाथ सातपुते, सम्राट अरविंद पाटील व सुदर्शन सुहास दळवी (सर्व रा.सासुरे, ता.बार्शी) हे तिघेही जखमी झाले असून, त्यांच्यावर सुविधा हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.




### श्रीमंतयोगी योगी युवक प्रतिष्ठानचा आदर्श पालक पुरस्कार प्रदान...

**सोलापूर : रंगभवन येथील समाज कल्याण केंद्रात रविवारी सायंकाळी श्रीमंत योगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने आदर्श पालक पुरस्कार प्रदान करण्यात आले.**




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE Printed at SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. Publised at TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, RNI No. MAHMAR/2023/86477
● CHIEF GROUP EDITOR : DILIP YASHWANT PETHE ● CHIEF EDITOR : PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## स्वीकृत सदस्यांना मतदान प्रक्रियेतून वगळले

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ मे : स्थानिक स्वराज्य संस्था (उस्मानाबाद-लातूर-बीड) मतदारसंघ निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि प्रभावीपणे पार पाडण्यासाठी धाराशिव येथे नुकतीच बैठक पार पडली. तसेच धाराशिव व लातूर जिल्हा परिषदेचे निवडून आलेले सदस्य, स्वीकृत सदस्य, नगरसेवक, स्वीकृत नगरसेवक आणि पंचायत समिती सभापती यांनाच मतदानाचा अधिकार राहणार आहे. पंचायत समिती सदस्य तसेच ज्या जिल्हा परिषदांनी स्वीकृत सदस्यांची निवड उशिरा केली आहे, त्यांना मतदान प्रक्रियेतून वगळण्यात आले असल्याचेही पुजार यांनी स्पष्ट केले. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. मतदार यादी तयार करणे, छपाई व तीन जिल्ह्यांतील समन्वयासाठी उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था (उस्मानाबाद-लातूर-बीड) मतदारसंघ निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि प्रभावीपणे पार पाडण्यासाठी धाराशिव येथे नुकतीच बैठक पार पडली. तसेच धाराशिव व लातूर जिल्हा परिषदेचे निवडून आलेले सदस्य, स्वीकृत सदस्य, नगरसेवक, स्वीकृत नगरसेवक आणि पंचायत समिती सभापती यांनाच मतदानाचा अधिकार राहणार आहे. पंचायत समिती सदस्य तसेच ज्या जिल्हा परिषदांनी स्वीकृत सदस्यांची निवड उशिरा केली आहे, त्यांना मतदान प्रक्रियेतून वगळण्यात आले असल्याचेही पुजार यांनी स्पष्ट केले.



## विविध वृत्त...

### गांजूर येथे शॉर्टसर्किटमुळे घराला आग

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ मे : चाकूर तालुक्यातील गांजूर येथे गुरुवार २१ मे रोजी ३ वाजता शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत घरातील खाद्य वस्तू, सोयाबीन, कुलर तसेच इतर घरगुती साहित्य जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. या आगीत मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. गांजूर येथील रहिवासी सिद्धेश्र्वर धोंडीराम मदने यांच्या घरात अचानक विद्युत शॉर्टसर्किट झाले. काही क्षणांतच आगीने उग्र रूप धारण केले. घरात ठेवलेले धान्य, खाद्यसामग्री, सोयाबीन, कुलर आणि विविध घरगुती साहित्य आगीत भस्मसात झाले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून प्रशासनाकडून पंचनामा करून मदत देण्याची मागणी करण्यात येत आहे.

### सोयाबीनच्या दरात तेजी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ मे : लातूरच्या आडत बाजारात मे मध्ये सोयाबीनच्या दरात दिवसागणीक वाढ होताना दिसून येत आहे. यावर्षी सोयाबीनच्या दरात नवनवे उच्चांक होताना दिसून येत आहेत. सोयाबीनचा दर बुधवारी ८ हजार ५१ रूपयांवर पोहचला होता. तर गुरूवार दि. २१ मे रोजी ६ हजार ३३१ सोयाबीनची आवक होऊन ८ हजार १२९ रूपये सर्वाधिक दर लातूरच्या आडत बाजारात मिळाला आहे. काही मोजक्या शेतकऱ्यांनी शेतमाल तारण योजनेचा लाभ घेत सोयाबीन तारण ठेवून आर्थिक गरजा भागवल्या. सोयाबीन तारण ठेवलेल्या ज्या शेतकऱ्यांनी अद्याप सोयाबीनची विक्री केली नाही. अशा शेतकऱ्यांना सोयाबीनच्या वाढत्या दराचा लाभमिळणार आहे. आज घडीला कांही मोजक्या शेतकऱ्यांकडे सोयाबीन शिल्लक आहे.

### बोर्डाचे निकाल लवकर : मार्कसीट उशिरा का?

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ मे : यावर्षी दहावी, बारावी परीक्षेचे निकाल अनुक्रमे २ मे आणि ८ मे रोजी लागले असून, विद्यार्थ्यांना अजून मार्कसीट प्राप्त झालेले नाहीत. विद्यार्थ्यांना मार्कसीटची उत्सुकता लागून राहिली आहे. सध्या ११वी प्रवेशाची प्रक्रिया सुरू झाली. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची पसंती देण्याची मुभा असली तरी मार्कसीटची हार्डकॉपी हातात पडल्यास विद्यार्थ्यांचे समाधान होणार आहे.

सध्या दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थी मार्कसीट कधी हातात पडते, याची विचारणा शाळा, महाविद्यालयांसह लातूरच्या बोर्डाकडे करीत आहेत. बारावीचे मार्कसीट सोमवारी (दि. २५) दुपारी शाळेत उपलब्ध करून दिले जाणार आहेत. दहावीचे मार्कसीट पुढे चार-पाच दिवसांत उपलब्ध होतील, असे लातूर बोर्डाच्या सूत्रांनी सांगितले. सध्या १० वी, १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्सुकता

अकरावी व बारावीच्या पुढच्या अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू झाले. यावर्षी दहावी, बारावी बोर्ड परीक्षेचे निकाल अपेक्षेपेक्षा लवकर लागले. विद्यार्थ्यांना मार्कसीट सुद्धा लवकर मिळेल, अशी आशा होती. परंतु फोल ठरली. वास्तविक, बोर्डाकडे दहावी, बारावी परीक्षेचे मार्कसीट तयार होते, असे निकाला दरम्यानच सांगण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना ओरिजनल मार्कसीटही लवकर मिळतील, असे वाटत होते. राज्य परीक्षा मंडळाच्या आदेशानंतरच लातूर बोर्ड मार्कसीट वितरित करते. २ मे रोजी बारावीचा निकाल लागला. नंतर ८ मेला दहावीचा निकाल लागला. निकाल लागून तीन आठवडे झाले. अद्याप मार्कसीट न मिळाल्याने विद्यार्थी प्रतीक्षेत आहेत. यावर्षी निकाल लवकर लागला; पण मार्कसीट उशिराने मिळत असल्याची विद्यार्थ्यांत चर्चा आहे.

### अकरावी ऑनलाईन प्रवेश पोर्टल डाऊन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ मे : इयत्ता ११ वीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेदरम्यान प्रवेश पोर्टल वारंवार बंद पडत असल्याने विद्यार्थी व पालकांची मोठी गैरसोय होत आहे. अनेकांना अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे तसेच महाविद्यालयांची पसंती नोंदविण्यात अडचणी येत आहेत. पोर्टल डाऊन असल्याने प्रवेश प्रक्रियेचे नियोजित वेळापत्रकही विस्कळीत झाले आहे. सायबर कॅफे व सुविधा केंद्रांवर विद्यार्थ्यांची गर्दी वाढली असून पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ द्यावी, अशी मागणी विद्यार्थी व पालकांकडून करण्यात येत आहे.

## भाजपचे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण महाअभियान संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ मे : जिल्हा (ग्रामीण) भारतीय जनता पार्टीच्या वतीने उदगीर येथील शिवम रिसॉर्टमध्ये आयोजित दोन दिवसीय 'पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाले. या निवासी प्रशिक्षण शिबिरामध्ये लातूर ग्रामीणमधील शेकडो कार्यकर्त्यांना पक्षसंघटन बळकटीकरण, वैचारिक जडणघडण आणि आगामी काळातील ध्येयधोरणांबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. लातूर ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रशिक्षण वर्ग प्रमुख तथा जि.प. गटनेते रामचंद्र तिरुके यांच्या संयोजनाखाली या शिबिराचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण महाअभियानातील सहा सत्रे काल पार पडली होती आणि उर्वरित ५ सत्रे आज यशस्वीरित्या पार पडली. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल विचारमंथन झाले, ज्यामध्ये सातव्या सत्रात 'विचार परिवार' या विषयावर ड. मीनल भोसले यांनी मार्गदर्शन केले व या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रकाश येरमे होते. त्यानंतर आठव्या सत्रात 'कार्यकर्ता विकास, काळजी आणि अपेक्षा' या विषयावर प्रमुख वक्ते संतोष कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले व अध्यक्षस्थान उत्तम महाराज पुरी यांनी भूषविले. नवव्या सत्रात प्रदेश प्रवक्ते विनोद वाघ यांनी 'कार्य विस्तार' या विषयावर जनसंपर्क आणि प्रभावी कार्यपद्धतीचे धडे दिले, ज्याचे अध्यक्षस्थान हनमंतराव खंदाडे यांनी भूषविले. शिबिराचा समारोप अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून समारोप सत्राचे प्रास्ताविक रामचंद्र तिरुके यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दोन दिवसीय प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सर्व प्रशिक्षणार्थी कार्यकर्त्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करून आगामी काळात तळागाळात पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या व जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांनी सर्व सत्र अध्यक्ष व वक्त्यांचे आभार मानले.

## विद्यार्थ्यांच्या हितासाठी नीट परिक्षाच रद्द करा

**नीट प्रकरणी तामिळनाडू चे मुखमंत्री थलपती यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, नीट ही परीक्षा पाहिजे कशाला ? बारावीच्या गुणावरच मेडिकलला प्रवेश द्यावा**

तभा वृतसेवा/ प्रमोद सुरवसे

लातूर दि.२४ मे : अवध्या दोन विद्यार्थ्यापासून सुरु केलेल्या खासगी शिकवणीचे नेटवर्क संबंध महाराष्ट्रभर पोहचवत केवळ बाकीस वर्षात जवळपास पंचेवीस हजार कोटींच्या घरात जमवलेली माया असल्याच्या बातमीनी जोर धरला आहे, त्यामुळेच सीबीआय च्या चौकशीनंतर ईडी मोटेगावकरांच्या अर्थकारणाचा समांतर तपास करणार असल्याचे सुजांकडून समजते

२००३ मध्ये मोटेगावकर यांनी रसायन शास्त्र विषयाची शिकवणी सुरु केली, जिल्ह्यातील तसेच तसेच परजिल्ह्यातील आणि राज्य आणि परराज्यातील विद्यार्थी शिक्षणासाठ लातूर मध्ये दाखल होतं, लातूर पॅटर्न आणि विद्यार्थी संख्या यामुळे २५ हजार विद्यार्थी ठरलेलेच याचा फायदा मोटेगावकर यांनी उचलत आरसीसी च्या माध्यमातून शहर तिथे शाखा उघडण्याचा जणू धडाकाच लावला, त्यातून जेईई, नीट यासाठी राज्यातून२० हजारांहून अधिक विद्यार्थी ठरलेलेच,

आता नीट पेपरफुटीमुळे मोटेगावकर यांना अटक झाल्यामुळे कारवायांचा फास अधिक घट्ट होताना दिसत आहे आरसीसीच्या माध्यमातून हजारो कोटींची उलाढाल होत असल्याने आता ईडी अधिक तपास करण्यास सज्ज झाली आहे प्रेम हे आंधळे असते असे म्हटले जाते ते उगाच नाही, कारण मोरेगावकर यांना त्यांच्या मुलावरील अति प्रेम या भानगडी करावयास भाग पाडली असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही कारण त्यांचा मुलगा यावर्षी नीटची परीक्षा देणार असल्यामुळेच त्यांनी नीट चा पेपर फोडून स्वार्थातून परमार्थ शोधला, एक पेपर फुकटात आणि बाकीचे पेपर करोडोत, यासाठी त्यांनी तयार केलेली साकळी कामाला आली

यातून दररोज नवनवीन माहिती समोर येत आहे, खोपेगाव येथील बांधकाम होन असलेल भलीमोठी बिल्डिंग जी भविष्यात मेडीकल कॉलेज साठी वापरली जाणार होती, पणहे बांधकामच अनधिकृत असल्याचे कळते, यासाठी जिल्हाधिकारी यांनी अधिकृत नोटीस बजावल्याचे समजते आहे,

नीट पेपर फुटी प्रकरणी आतापर्यंत लातूरमधून तीन ते चार डॉक्टर रडार वर असून दोन ते तीन डॉक्टरांची सीबीआयने चोक्शी केली आहे,

विशेष म्हणजे सर्वप्रथम लातूर मधून अटक केलेले पी . व्ही कुलकर्णी यांच्या माध्यमातून बरीच नावे दररोज लिक होत असल्याने सीबीआय लातूर मध्ये तळ ठोकून आहे, त्यामुळेच तर दरदिवशी पालक, विद्यार्थी आणि पेपरफुटी प्रकरणातील नवीन व्यक्ती यांची चौकशी होत आहे, त्यातूनच पहिले पालक ज्यांनी आपल्या पाल्यासाठी पेपर घेतला होता त्यांना अटक झाली आहे, पालकांना अटक करण्याची ही पहिलीच केस, कदाचित ही यादी मोठी झाली तर नवल वाटू नये उद्योग भवन हा परिसर सध्या शिक्षकासोबत इतर व्यवसायानी भरला असून जिल्हा उद्योग केंद्राने या सर्वांना नोटीस पाठवून जागा खाली करण्याची सूचना केली आहे, पण मुख्य असा आहे की, आतापर्यंत जिल्हा उद्योग केंद्र झोपी गेले होते का ? की . त्यांच्यात आर्थिक गाठीभेटी झाल्या ?मुख्यमंत्री थलपतींची ही प्रतिक्रिया बरीच बोलकी आहे, बारावीच्या गुणावरच मेडिकलला प्रवेश द्यावा, म्हणजेच पेपरफुटी होणार नाही, असे क्लास घेणारे लोप पावतील, कॉलेजमध्ये चांगले प्राध्यापक असतील तर क्लासची काय गरज?

काल केंद्रीय शिक्षण मंत्री म्हणाले की, पुढच्या वर्षी नीट परीक्षा संगणकावर घेणार, हे ठीक आहे पण येथे पेपर फुट होणार नाही कशावरून? त्यासाठी हीपरीक्षाच रहित करून बारावीच्याच गुणावर मेडिकल आणि इतर ठिकाणी अँडमिशन द्यावे, जेणेकरून हुशार विद्यार्थ्यांची माती होणार नाही

## नकली सोने दाखवून फसवणूक करणारी टोळी जेरबंद

### ५ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल व नकली सोन्याचे बिस्किट जप्त



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ मे : जिल्ह्यातील विविध भागात नागरिकांची फसवणूक करून सोन्याचे बनावट बिस्कीट विक्रीचा बहाणा करणे तसेच गर्दीच्या ठिकाणी खिसेकापू व चोरी करणारे सराईत तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली असून त्यांच्याकडून सोन्याचे दागिने, रोख रक्कम व बनावट सोन्याचे बिस्कीट असा ५ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात दाखल असलेले तब्बल ८ गुन्हे उघडकीस आले आहेत.

वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात पोउपनि प्रमोद देशमुख यांचे पथक तपास करीत असताना मिळालेल्या माहितीनुसार औसा-लातूर रोडवरील वासनगाव पाटी परिसरात तीन व्यक्ती सोन्याचे डुप्लीकेट बिस्कीट विक्रीसाठी ग्राहकाच्या प्रतीक्षेत थांबले असल्याची माहिती मिळताच पथकाने खात्री करून घटनास्थळी छापा टाकून बाबाराव सूर्यकांत जाधव (वय ३०), केशव छगन जाधव (वय ५०), संदीप दगडू जाधव (वय २९) तिघे रा. सलगरा ता. लातूर) यांची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातून सोन्याचे मनी मंगळसूत्र, रोख रक्कम तसेच सोनेरी रंगाचे डुप्लीकेट बिस्कीट मिळून आले. पोलिसांनी त्यांना विश्र्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता त्यांनी लातूर जिल्ह्यात विविध ठिकाणी फसवणूक व चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली.

आरोपींनी महिलांना 'सोन्याचे बिस्कीट' देण्याचा बहाणा करून त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरीकेल्याचे सांगितले. तसेच बसस्थानके, सरकारी रुग्णालय परिसर, गर्दीची ठिकाणे व सार्वजनिक कार्यालयांमध्ये नागरिकांच्या खिशातील व पिशवीतील रोख रक्कम चोरी केल्याचेही निष्पन्न झाले.

पोलिसांनी आरोपींकडून गांधी चौक, देवणी, अहमदपूर, शिवाजीनगर, कासार शिरसी, औसा, किनगाव व एमआयडीसी पोलीस ठाण्यांत दाखल असलेल्या गुन्ह्यांतील एकूण १ लाख ७३ हजार रुपयांची रोख रक्कम, २२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने किंमत ३ लाख ३० हजार रुपये तसेच बनावट सोन्याचे बिस्कीट असा ५ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तपासादरम्यान आरोपी संदीप दगडू जाधव हा उदगीर शहर, औसा, देवणी, शिवाजीनगर, उदगीर व चाकूर पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या फसवणुकीच्या अनेक गुन्ह्यांमध्ये पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील मुद्देमाल जप्त करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस स्टेशन गांधी चौक येथे हजर करण्यात आले आहे.

## इस्कॉन भागवत कथेला उत्तम प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ मे : आंतरराष्ट्रीय श्रीकृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन) लातूर श्री जगन्नाथ धाम मंदिरच्या वतीने सुरू असलेल्या भागवत कथेला भाविकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

इस्कॉन लातूरच्या वतीने अधिक मासनिमित्त २० मे पासून दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत भागवत कथा सप्ताह सुरू असून, वृंदावन येथील राधेश्यामानंद स्वामी महाराज यांच्या दिव्य वाणीमधून भाविक कथेचा आनंद घेत आहेत. हरिनाम संकीर्तन व सर्व भक्तांसाठी दररोज महाप्रसाद वितरण केले जात आहे. मंगळवार दि. २६ मे रोजी कथेची सांगता होणार असून त्यावेळी हरिनाम संकीर्तन, ग्रंथ वितरण व मो-ठ्या प्रमाणावर महाप्रसादाचे वितरण होणार आहे. याचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन इस्कॉन लातूर जगन्नाथ मंदिरचे आचार्य कृपा प्रभुजी यांनी केले आहे.

## काँग्रेस पक्षाच्या वतीने मुरुड नगर परिषदेसाठी स्वाक्षरी मोहीम



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ मे : मुरुड लातूर तालुक्यातील नगरपरिषद होण्याकरिता राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने व लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धीरज विलासराव देशमुख यांच्या आदेशावरून मुरुड मध्ये काँग्रेस पक्षाच्या वतीने स्वाक्षरी मोहीम सुरू केली होती. या स्वाक्षरी मोहिमेला १३ मे पासून सुरुवात झाली. मुरुडकराने या स्वाक्षरी मोहिमेला प्रचंड असा प्रतिसाद दिला. जवळपास २० हजाराच्या आसपास स्वाक्षऱ्या झाल्या असून मुरुड नगरपरिषद व्हावी याकरिता नागरिकांनी उत्स्फूर्तपणे स्वाक्षरी केल्या आहेत.

स्वाक्षरी मोहिम यशस्वी करण्याकरिता मुरुड शहराचे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष दीपक पटाडे, काँग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ते राजेंद्र मस्के, अमोलजी गाडे, ईश्र्वर प्रसाद चांडक, मुरुड राष्ट्रीय काँग्रेस युवा अध्यक्ष मुकेश सवासे, मुरुड राष्ट्रीय काँग्रेस कार्याध्यक्ष निलेश फेरे, ग्रामपंचायत सदस्य आनंद कणसे, तसेच शरीफ सय्यद, जगन चव्हाण, अविनाश शिंदे, चैतन्य पठाडे, उत्तम चव्हाण, आकाश देडे, अजय भोसले, समाधान गायकवाड तसेच इतर कार्यकर्त्याने दि. १३ ते २३ मे पर्यंत काम केले. नागरिकाकडून या कामाचा समाधान व्यक्त केले जात आहे, आणि लवकरात लवकर मुरुड नगरपरिषद होईल अशी आशा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धीरज विलासराव देशमुख यांच्याकडून व्यक्त केली जात आहे.

## प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ मे : लातूर शहर जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा. डॉ. शिवाजीराव जवळगेकर यांचा मस्के परिवार बाभळगावच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी सरपंच तथा मुख्यमंत्री बळीराजा रस्ते पाणंद समिती सदस्य साधुराम मस्के, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे निवृतवसुली अधिकारी मारुती मस्के, नारायण कांबळे, विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता कैलास मस्के, तंटामुक्त गाव समिती उपाध्यक्ष धनराज मस्के, पत्रकार अनिल अवघडे, प्रेरक बालाजी कदम, वाहतूक पोलिस कर्मचारी अजय मस्के, बळीराम बोयने, अमोल मस्के, अविनाश मस्के, विलास मस्के, विक्रम मस्के, अथर्व अवघडे आदी उपस्थित होते.

## एका वर्षानंतर बेपत्ता अल्पवयीन मुलाचा शोध

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २४ मे : शहरातील सिग्नल कॅम्प परिसरातून जून २०२५ मध्ये बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलाचा तब्बल एका वर्षानंतर तिरुपती (आंध्रप्रदेश) येथून सुखरूप शोध घेण्यात शिवाजीनगर पोलिसांना यश आले असून, लातूर पोलिसांच्या चिकाटी, तांत्रिक तपास कौशल्य व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे एका कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

प्रशांत गपाट, रा. इंदापूर ता. वाशी जि. धाराशिव यांनी पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर येथे दिलेल्या फिर्यादीत मुलगा अथर्व प्रशांत गपाट, (वय १४ वर्षे ९ महिने) हा सिग्नल कॅम्प, लातूर येथे वास्तव्यास असून दि. १७ जून २०२५ रोजी सकाळी नेहमीप्रमाणे शाळेसाठी घराबाहेर पडला. त्यावेळी घरात त्याची बहीण होती. ती सकाळी ट्युशनवरून परत आल्यानंतर तिला अथर्व घरात दिसला नाही. त्याची शाळेची बॅग देखील घरात नसल्याने तो शाळेत गेला असावा असे तिला वाटले. मात्र, संध्याकाळपर्यंत तो घरी न परतल्याने तिने वडिलांना संपर्क करून माहिती दिली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा केला. तपास पथकाने या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केला. तपासादरम्यान पोलिसांनी विविध तांत्रिक बाबींचा अभ्यास केला. अल्पवयीन मुलाने सोशल मीडियावर फेसबुक व इन्स्टाग्राम अकाउंट सुरू केल्याची माहिती मिळाल्यानंतर सायबर पोलीस स्टेशनच्या मदतीने विविध डिजिटल पुरावे, ऑनलाइन हालचाली तपासल्या. अखेर दि. १९ मे रोजी तिरुपती, आंध्रप्रदेश येथे अल्पवयीन मुलगा असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर तत्काळ पथक पाठवून संबंधित मुलास ताब्यात घेण्यात आले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मुलास सुखरूपपणे त्याच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## नळदुर्ग येथे अधिकमासानिमित्त भागवत सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ मे -**

हिंदू धर्मामध्ये पवित्र मानल्या जाणाऱ्या अधिकमास महिन्यानिमित्त नळदुर्ग येथील प्रतिष्ठित नागरिक तथा सेवानिवृत्त वन अधिकारी विनय परळकर आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या सेवानिवृत्त व्यवस्थापक सुप्रियाताई परळकर यांच्या निवासस्थानी भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २५ मे ते ३१ मे दरम्यान हा भागवत सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. यावेळी वेदशास्त्र संपन्न वेणुगोपालाचार्य काशीकर यांच्या अमृतमयी वाणीतून भागवत कथा सांगितली जाणार आहे.

रोज सकाळी ८ ते १२ या वेळेत संस्कृतमधून संहितावाचन होणार असून दुपारी ४ ते ६ या वेळेत मराठीतून अर्थानुवाद व कथा निरूपण करण्यात येणार आहे. दि. ३१ मे रोजी भागवत सप्ताहाची सांगता होणार आहे.

नळदुर्ग येथील जगताप नगर परिसरात आयोजित या धार्मिक सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन परळकर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# तुळजाभवानी मंदिर परिसरात बाल भिक्षुकांचा वाढता विळखा; भाविक त्रस्त, प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ मे -**

राज्याचे कुलदैवत असलेल्या श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात सध्या बाल भिक्षुकरी आणि भीक मागणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे विदारक चित्र समोर येत आहे. दररोज हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी येत असताना मंदिर परिसर, मुख्य प्रवेशद्वार, पार्किंग परिसर, प्रसाद विक्री मार्ग तसेच मंदिराच्या पायऱ्यांलगत लहान मुले आणि वृद्धांकडून सातत्याने भीक मागितली जात असल्याने भाविकांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे काही बाल भिक्षुकांकडून भाविकांच्या मागे लागून सक्तीने पैशांची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

दर्शनासाठी आलेल्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेरगावाहून आलेल्या पर्यटकांना वारंवार अडवून पैसे मागितले जात असल्याने मंदिर परिसरातील धार्मिक आणि शांत वातावरणाला गालबोट लागल्याची भावना भाविकांमधून व्यक्त होत आहे.

दर्शनानंतर अनेक भाविक मंदिरासमोर किंवा परिसरात सेल्फी व ग्रुप फोटो काढण्याचा प्रयत्न करतात. मात्र त्याचवेळी काही बाल भिक्षुक अचानक फोटोमध्ये येऊन उभे राहणे, पैसे मागण्यासाठी गर्दी करणे किंवा फोटो काढणाऱ्यांच्या मागे लागणे असे प्रकार सातत्याने घडत असल्याने भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

अनेकदा भाविकांनी पैसे देण्यास नकार दिल्यानंतर संबंधितांकडून हात धरून विनवण्या करणे, वाहनांजवळ गर्दी करणे तसेच लहान मुलांना पुढे करून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न होत असल्याचेही समोर येत आहे.

दररोज लाखो रुपयांची उलाढाल आणि हजारो भाविकांची वर्दळ असलेल्या तुळजापूरमध्ये मंदिर परिसराची प्रतिमा जपण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी भाविकांमधून जोर धरत आहे.

### सुरक्षा यंत्रणा बघ्याच्या भूमिकेत?

मंदिर परिसरातील प्रशासकीय भवनासमोरच हे प्रकार सातत्याने घडत असताना मोठ्या प्रमाणात सुरक्षा रक्षक, पोलीस बंदोबस्त आणि मंदिर संस्थानची यंत्रणा तैनात असूनही प्रभावी कारवाई होत नसल्याचे चित्र दिसत आहे. अनेक भाविकांनी सुरक्षा रक्षकांकडे तक्रारी करूनही संबंधितांना काही वेळ हटवले जाते; मात्र काही वेळातच पुन्हा तेच प्रकार सुरू होत असल्याचे सांगितले जात आहे.

### पुनर्वसन आणि संयुक्त कारवाईची मागणी

भाविकांच्या मते, मंदिर परिसर 'भिक्षामुक्त' करण्यासाठी प्रशासनाने कायमस्वरूपी नियोजन करण्याची गरज आहे. बाल भिक्षुकांसाठी पुनर्वसन मोहीम राबविणे, महिला व बालकल्याण विभागाने संयुक्त कारवाई करणे, बाल भिक्षुकरीमागील टोळ्यांची चौकशी करणे तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या गैरवापराबाबत कठोर पावले उचलण्याची मागणी पुढे येत आहे.

## सामाईक बोअरच्या वादातून थरारक खून; कार्ला येथे एकाचा मृत्यु

### युवक गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

तुळजापूर तालुक्यातील कार्ला येथे सामाईक बोअरमधील मोटार काढण्याच्या वादातून झालेल्या मारहाणीत एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून एका युवकाला गंभीर दुखापत झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाणे येथे चार जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी विष्णु बब्रुवान मोटे, गौतम बब्रुवान मोटे, योगेश गौतम मोटे आणि मनोज गौतम मोटे (सर्व रा. कार्ला, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी दि. २१ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास मयत ब्रम्हदेव बब्रुवान मोटे यांना सामाईक बोअरमधील मोटार आम्हाला न विचारता का काढली, असा जाब विचारत वाद घातला.

वादाचे रूपांतर हाणामारीत होत आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी तसेच लोखंडी पाईप, काठी आणि कोयत्याने मारहाण केली. या मारहाणीत ब्रम्हदेव बब्रुवान मोटे यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, भांडण सोडवण्यासाठी आलेले फिर्यादी महेश ब्रम्हदेव मोटे यांनाही आरोपींनी जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## परंड्यात जागा वाटणीच्या वादातून मारहाण



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

जागा वाटणीच्या कारणावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीस गंभीर मारहाण करण्यात आल्याची घटना नृसिंहनगर, परंडा येथे घडली असून या प्रकरणी परंडा पोलीस ठाणे येथे चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शाम सुंदर ताटे, सुरज ताटे (दोघे रा. नृसिंहनगर, परंडा ह.मु. पुणे), तसेच प्रदीप रामराव कदम आणि रितेश कदम (रा. कार्ला, ता. औसा, जि. लातूर) यांनी दि. २० मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास नृसिंहनगर, परंडा येथे फिर्यादी मधुसुदन कानिफनाथ ताटे यांच्याशी जागा वाटणीच्या कारणावरून वाद घातला.

वाद वाढल्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण करून मधुसुदन कानिफनाथ ताटे यांना गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी फिर्यादी मधुसुदन कानिफनाथ ताटे यांनी दि.२२ मे २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरावरून परंडा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ढोकी तेरणा कारखाना वसाहतीतून मोटारसायकल चोरी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

तेरणा कारखाना वसाहत, ढोकी येथून अज्ञात चोरट्याने मोटारसायकल चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत राहुल विजय पाटील (वय ३७, रा. तेरणा कारखाना वसाहत, ढोकी ता. जि. धाराशिव) यांनी ढोकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्यांची अंदाजे २५ हजार रुपये किंमतीची हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. एमएच २५ सी ४१४४) ही दि. २१ मे २०२६ रोजी पहाटे १.३० ते सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान घरासमोरून अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

या प्रकरणी राहुल पाटील यांनी दिलेल्या प्रथम खबरावरून ढोकी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## नारंगवाडी शिवारातील रोहीत्रावरील अल्युमिनियम तार चोरी; ४९ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

तालुक्यातील नारंगवाडी शेतशिवारात अज्ञात चोरट्यांनी रोहीत्रावरील अल्युमिनियम तार चोरी करून तब्बल ४९ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२० मे रोजी रात्री १० वाजल्यापासून ते दि. २१ मे रोजी सकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत नारंगवाडी शेतशिवारातील गट नं. ७८/१ व ७९/१ येथील रोहीत्रावरील सुमारे १४०० मीटर अल्युमिनियम तार अज्ञात व्यक्तींनी चोरून नेली. चोरीस गेलेल्या मालाची किंमत अंदाजे ४९ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

याप्रकरणी तानाजी विश्वनाथ जाधव (वय ३१, रा. मानेगोपाळ, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी दि.२१ मे रोजी उमरगा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## समाजसेवेचा मानाचा तुरा! युवा उद्योजक पंडित जळकोटे यांना 'बसवरत्न पुरस्कार' प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथील प्रसिद्ध युवा उद्योजक, समाजसेवक तथा धाराशिव जिल्हा बसवरत्न पुरस्कार सोहळ्याचे यशस्वी संयोजक पंडित जळकोटे यांना सोलापूर मध्यवर्ती महात्मा बसवेश्वर जन्मोत्सव व समाजसेवा मंडळाच्या वतीने यंदाचा मानाचा 'बसवरत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. सोलापूरचे पालकमंत्री नामदार जयकुमारजी गोरे यांच्या शुभहस्ते तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार अत्यंत दिमाखदार वातावरणात प्रदान करण्यात आला.

उद्योग क्षेत्रासोबतच सामाजिक कार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पंडित जळकोटे यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान बहाल करण्यात आला.

समाजहितासाठी सातत्याने पुढाकार घेणे, गरजू व गोरगरीबांना मदतीचा हात देणे तसेच सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविणे, ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये ठरली आहेत.

धाराशिव जिल्हा बसवरत्न पुरस्कार सोहळ्याचे संयोजक म्हणूनही त्यांनी सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीला नवी दिशा दिली आहे. महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचा वारसा जपत समाजप्रबोधन आणि सेवाभाव जिवंत ठेवण्याचे कार्य त्यांनी प्रभावीपणे केले आहे.

त्यांच्या कार्यामुळे अनेक युवकांना प्रेरणा मिळत असून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे काम ते सातत्याने करीत आहेत.



पंडित जळकोटे यांना प्राप्त झालेल्या या मानाच्या पुरस्काराबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पंडित जळकोटे यांच्या रूपाने एका कर्तृत्ववान युवा उद्योजक आणि खऱ्या समाजसेवकाचा सन्मान झाला आहे, अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या.

त्यांच्या पुढील सामाजिक आणि व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छाही देण्यात आल्या आहेत.

## येडशीत इनोव्हा कारमधून अवैध विदेशी दारू वाहतूक उघड; ६.३४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने येडशी येथे धडक कारवाई करत इनोव्हा कारमधून सुरू असलेली अवैध विदेशी दारूची वाहतूक उघडकीस आणली. या कारवाईत दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून वाहनासह तब्बल ६ लाख ३४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि.२१ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक धाराशिव जिल्ह्यात मालमत्तेविषयक गुन्हे उघडकीस आणणे, फरारी आरोपींचा शोध घेणे तसेच अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी पेट्रोलिंग करत होते.

दरम्यान, इनोव्हा कार क्रमांक एमएच १५ बीएक्स ६८२० मधून अवैध दारूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार सायंकाळी साडेपाचच्या सुमारास संशयित वाहनाला थांबवून तपासणी करण्यात आली. तर मागील सीटवर बसलेल्या इसमाने आपले नाव दादा रामा काळे (वय ४६, रा. जुना बस डेपो, पारधी पिढी, धाराशिव) असे सांगितले. पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता कारमध्ये विदेशी दारूचे बॉक्स आढळून आले. त्यानंतर इनोव्हा कारसह विदेशी दारू असा एकूण ६,३४,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपी सुभाष काळे व दादा रामा काळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### वाहतूक नियमभंगावर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहतूक नियमभंग करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली.

दि.२२ मे रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर एकूण २१३ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईदरम्यान १ लाख ७७ हजार रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

## शेत नांगरण्याच्या वादातून दुधोडीत तुफान मारहाण

### महिलेसह चौघे जखमी, दागिने हिसकावल्याचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

तालुक्यातील दुधोडी येथे शेत नांगरण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका कुटुंबावर लाठी-काठ्यांनी हल्ला करून गंभीर मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी महिलेसह चौघांविरुद्ध भूम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अतुल रावण महानवर, संगीता रावण महानवर (रा. दुधोडी, ता. भूम), माउली संदीपान महानवर (रा. बावी, ता. भूम) व बबलु संजय तांबे (रा. हाळगाव, ता. जामखेड, जि. बीड) यांनी दि.१८ मे २०२६ रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास शेत नंबर ३५ च्या बांधावर फिर्यादी मिनिनाथ अजिनाथ महानवर (वय ३५, रा. दुधोडी, ता. भूम) व त्यांच्या आई सिंधुबाई महानवर यांच्यासोबत शेत नांगरण्याच्या कारणावरून वाद घातला.

वादाचे रूपांतर हाणामारीत होत आरोपींनी शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी तसेच काठी व खोऱ्याच्या दांड्याने मारहाण करून दोघांना गंभीर जखमी केले. दरम्यान, फिर्यादीचे भाऊ रमेश महानवर व वहिनी अश्विनी महानवर हे भांडण सोडवण्यासाठी आले असता आरोपींनी त्यांनाही मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

तसेच, आरोपींनी अश्विनी महानवर यांच्या गळ्यातील दोन तोळ्यांचे सोन्याचे मिनी गंठण व दीड तोळ्यांचे कानातील झुमके जबरदस्तीने ओढून घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

याप्रकरणी मिनिनाथ महानवर यांनी दि.२१ मे रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भूम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## परंड्यात जुगार अड्ड्यांवर पोलिसांची धडक कारवाई; २९ जण ताब्यात

### १३ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

धाराशिव जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी पुन्हा एकदा धडक मोहीम राबवत परंडा शहरातील ७ चक्री जुगार अड्डे आणि २ अवैध तीन पत्ती (तिरट) क्लबवर मोठी छापेमारी कारवाई केली. या कारवाईत २९ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून तब्बल १३ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक धाराशिव रीतु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली तथा परि. पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दि.२१ मे रोजी ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सहायक पोलीस निरीक्षक विजय आटोळे, सहायक पोलीस निरीक्षक प्रविण सोमवंशी, पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र बहुरे तसेच पोलीस अंमलदार व चालकांचा सहभाग होता. सदरील कारवाई गोल्डन चौक, आठवडी बाजार परिसरातील तीन ठिकाणे, गोल्डन चौक, बस स्थानकासमोरील परिसर 'बुलबुल कलेक्शन' समोरील जागा, रमाई चौक परिसर, 'समर्थ जेन्ट्स पार्लर' समोरील जागा, कुर्डुवाडी रोडवरील 'जगताप ढाबा' शेजारील खोली, संत मीरा शाळेमागील करमाळा रोडलगत निळ्या पत्र्याच्या शेडमधील क्लबमध्ये करण्यात आली. सदर छापेमारीदरम्यान एकूण ९ गुन्हे परंडा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले असून, आरोपींविरुद्ध गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. पोलिसांनी आरोपींकडून जुगार साहित्य, रोकड व इतर मुद्देमाल असा एकूण रु. १३,०१,७३३ किमतीचा ऐवज जप्त केला. यामध्ये रु. ४,९३,०३३ रोकड तसेच अंदाजे रु. ८,०८,७०० किमतीचा इतर मुद्देमाल समाविष्ट आहे.

या कारवाईनंतर पोलीस अधीक्षक रीतु खोखर यांनी अवैध व्यवसाय करणाऱ्यांना कठोर इशारा देत जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे सुरू आढळल्यास यापुढेही कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.

## उमरग्यात जुगार अड्ड्यांवर पोलिसांचे छापे; मटका जुगार प्रकरणी दोन्ही ठिकाणी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

उमरगा पोलीस ठाणे हद्दीत जुगार विरोधी मोहिमेदरम्यान पोलिसांनी दोन ठिकाणी छापे टाकून मटका जुगार चालविणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत जुगार साहित्य आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली असून दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२१ मे २०२६ रोजी सायंकाळी ७.३० ते ७.५० वाजण्याच्या दरम्यान उमरगा पोलिसांनी छापेमारी केली. यावेळी आरोपी अविनाश हरिदास राठोड (वय २५, रा. उमरगा) आणि विकी राठोड (रा. पळसगाव तांडा, ता. उमरगा, जि. धाराशिव) हे अस्टमी बारच्या बाजूच्या मोकळ्या जागेत मिलन नाईट मटका जुगाराचे साहित्य आणि ७४० रुपयांची रक्कम स्वतःच्या ताब्यात ठेवून जुगार खेळताना आढळले. त्यानंतर दुसऱ्या कारवाईत आरोपी बबलु ख्यामन्ना पुजारी (वय ३३, रा. उमरगा) हे हॉटेल रविराजच्या बाजूला मिलन नाईट मटका जुगाराचे साहित्य आणि १,१९० रुपयांची रक्कम ताब्यात ठेवून जुगार चालवत असल्याचे पोलिसांना आढळून आले.

दोन्ही ठिकाणांहून पोलिसांनी जुगार साहित्य आणि रोख रक्कम जप्त केली आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## वाशी उपकेंद्रातून १७.९० लाखांचा मुद्देमाल लंपास

### कॉपर कॉईल व ट्रान्सफॉर्मर ऑईल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

वाशी पोलीस ठाणे हद्दीतील वाशी उपकेंद्रामधून तब्बल १७ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.१६ एप्रिल २०२६ ते २७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्याने वाशी उपकेंद्रामधून १८०० किलो कॉपर कॉईल तसेच ३४०० लिटर ट्रान्सफॉर्मर ऑईल असा एकूण १७ लाख ९० हजार रुपयांचा माल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी पराग दादाराव तुरखडे (वय ४१, रा. ब्राम्हणसभा कॉलनी, परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती, ह.मु. वाशी ता. वाशी जि. धाराशिव) यांनी दि. २२ मे २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरावरून वाशी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास पोलीस करत असून उपकेंद्रातील सुरक्षेच्या व्यवस्थेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### संतोष माळी यांनी गटशिक्षणाधिकारी पदाचा स्वीकारला

**कळंब, दि.२४ मे -**

पंचायत समिती कळंब अंतर्गत गटशिक्षणाधिकारी पदाचा पदभार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांच्या आदेशान्वये संतोष माळी यांनी स्वीकारला आहे. यावेळी मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड, ईटकुर केंद्रप्रमुख सोमनाथ चंदनशिव, मोहा केंद्रप्रमुख आशोक डिकले आदी मान्यवरांनी संतोष माळी यांचे अभिनंदन करून दत्तात्रय बारगजे लिखित फकीरी : एक अवघड प्रवास ही कादंबरी भेट देत सत्कार केला. संतोष माळी यांच्याकडे उपशिक्षणाधिकारी (नियोजन) धाराशिव या पदाचा अतिरिक्त कार्यभारही आहे. कार्यकुशल, सर्वसमावेशक व कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून त्यांची ओळख असून त्यांच्या नेतृत्वाखाली कळंब तालुका गुणवत्तेच्या बाबतीत आघाडीवर राहील, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

### फातेमा मुखेर यांना पीएचडी पदवी प्रदान

**भूम, दि.२४ मे -**



भूम तालुक्यातील माणकेश्वर येथील इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका फातेमा इरफान मुखेर यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएचडी पदवी प्रदान केली आहे. त्यांनी ऑस्ट्रेलियन कादंबरीकार रिचर्ड फ्लनॅगन यांचे साहित्य या विषयावर प्रबंध सादर केला होता. विद्यापीठाने (२०२५-२६) २४१-५१ या पत्राद्वारे त्यांना पदवी प्रदान केली. या संशोधन कार्यासाठी त्यांना डॉ. मेहरून्नीसा पठाण यांचे मार्गदर्शन लाभले. फातेमा मुखेर सध्या बीड येथील मिल्लिया कॉलेजमध्ये इंग्रजी विषयाच्या अध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या सचिव श्रीमती सबीया खान, प्राचार्य डॉ. इरफान सिद्दीकी तसेच डॉ. फैसल चाऊस यांनी अभिनंदन केले आहे. पीएचडीच्या प्रवासात त्यांना मातोश्री, पती व बंधू यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

### मधुकर जोशी यांचे निधन

**धाराशिव, दि.२४ मे -**



धाराशिव तालुक्यातील पाडोळी (आ.) येथील ग्रामजोशी मधुकर व्यंकटेश जोशी यांचे पुणे येथील भारती हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८१ वर्षे होते. त्यांच्या निधनाने पाडोळी परिसरासह पंचक्रोशीतील सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. ते महेश जोशी तसेच सचिन जोशी यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, दोन सुना व तीन नातवंडे असा परिवार आहे.

### धाराशिवात जुगार अड्ड्यांवर छापे

**धाराशिव, दि.२४ मे -**

जुगार विरोधी कारवाईदरम्यान धाराशिव शहर पोलिसांनी दि.२२ मे रोजी शहर पोलीस ठाणे हद्दीत दोन ठिकाणी छापे टाकून मटका जुगार प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. पहिल्या कारवाईत विजय रावसाहेब गुंडरे (वय २८, रा. यमाई मंदिराजवळ, धाराशिव) हे श्रीदेवी नाईट मटका जुगाराचे साहित्य व ६८० रुपयांची रक्कम स्वतःच्या ताब्यात बाळगताना पोलिसांना आढळले. तर दुसऱ्या कारवाईत ओमकार सुनिल शिंदे (रा. सांजा, ता. जि. धाराशिव) हे जे. के. तांबोळी यांच्या पानटपरीसमोर मिलन नाईट मटका जुगाराचे साहित्य व ४९० रुपयांची रक्कम बाळगताना आढळून आले.

# चालत्या ट्रकमधून मेंढ्या चोरीचा पर्दाफाश; ३.१९ लाखांचा मुद्देमाल जप्त

### येरमाळा पोलिसांची धडक कारवाई...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ मे -**

येरमाळा पोलीस ठाणे हद्दीत दि.२३ मे २०२६ रोजी पहाटे हायवेवरून जाणाऱ्या चालत्या ट्रकमधून अज्ञात चोरट्यांनी मेंढ्या चोरून नेल्याची घटना घडली होती. या घटनेचा छडा लावत स्थानिक गुन्हे शाखा आणि येरमाळा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत ३ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशानुसार स्थागुशा पथक, आरसीपी पथक क्रमांक १ आणि क्यूआरटी पथक रवाना करण्यात आले होते. पोलीस पथक येरमाळा हायवेवरील पुलाजवळ तपास करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, तेरखेडा येथील लक्ष्मी पारधी पिढी आणि उमरा पारधी पिढी येथील काही इसमांनी चालत्या ट्रकमधून मेंढ्या चोरी करून आणल्या असून त्या उमरा पिढीजवळील बाभळीच्या झाडाखाली उभ्या असलेल्या लाल रंगाच्या टमटममध्ये ठेवण्यात आल्या आहेत. यानंतर तात्याराव भालेराव आणि पोलीस कर्मचाऱ्यांसह पथकाने घटनास्थळी धाव घेतली. तेथे एका बाभळीच्या झाडाखाली लाल रंगाचे टमटम उभे असल्याचे दिसून आले. टमटमजवळ ७ ते ८ इसम बसलेले होते. पोलिसांची चाहूल लागताच संबंधित इसमांनी घटनास्थळावरून पळ काढला. पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला, मात्र आरोपी पसार होण्यात यशस्वी झाले.

पोलिसांनी टमटमची तपासणी केली असता त्यामध्ये मेंढ्या आढळून आल्या. फिर्यादीशी संपर्क साधून मेंढ्यांचे वर्णन सांगितले असता त्या चोरी गेलेल्या मेंढ्याच असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर मेंढ्या आणि टमटम असा एकूण ३ लाख १९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी येरमाळा पोलीस ठाणे येथे जमा करण्यात आला.



ही कारवाई पोलीस अधीक्षक रितु खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सपोनि. सचिन खटके, सपोनि. तात्याराव भालेराव, पोलीस हवालदार विनोद जानराव, नितीन जाधवर, बबन जाधवर, महिला पोलीस हवालदार शोभा बांगर, पोना संतोष तिघाडे, संदीप चौघुले, रोहित दंडनाईक तसेच आरसीपी आणि क्यूआरटी पथकाने पार पाडली.

# विंड वर्ल्ड कंपनीचा जुना वाद पुन्हा ऐरणीवर

### थकीत पैशांवरून शेतकऱ्यांचा संताप

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२४ मे -**

वाशी तालुक्यात पुन्हा सुरू होत असलेल्या विंड वर्ल्ड पवनचक्की कंपनीच्या कामांमुळे जुना वाद पुन्हा पेटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. कंपनी बंद होताना अनेक शेतकऱ्यांचे जमिनीचे भाडे तसेच स्थानिक नागरिकांच्या पगारी वाहनांचे भाडे थकीत ठेवण्यात आल्याचा गंभीर आरोप बाधित शेतकऱ्यांनी केला आहे.

मसोबाचीवाडी, कडकनाथवाडी, वडजी आणि नांदगाव परिसरातील शेतकरी मागील अनेक वर्षांपासून आपल्या हक्काच्या पैशांसाठी पाठपुरावा करत आहेत. मात्र अद्यापही संबंधितांना पूर्ण पैसे मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याप्रकरणी बाधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे लेखी तक्रारी दाखल करून न्यायाची मागणी केली आहे. अगोदर शेतकऱ्यांचे आणि वाहनधारकांचे थकीत पैसे द्या, त्यानंतरच कंपनीची कामे सुरू करा, अशी ठाम भूमिका स्थानिकांनी घेतली आहे. दरम्यान, कंपनीच्या प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेत पुढील १५ दिवसांत संबंधितांचे पैसे देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे तोंडी आश्वासन देण्यात आल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. मात्र विशेष बाब म्हणजे यासंदर्भात कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी माहिती देण्यास स्पष्ट टाळाटाळ केल्याचे समोर आले आहे. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी अधिकृत भूमिका मांडण्यास नकार दिल्यामुळे संशय अधिक गडद झाला आहे. नेमके किती शेतकऱ्यांचे पैसे थकीत आहेत? कंपनी प्रत्यक्षात पैसे देणार की पुन्हा वेळकाढूपणा करणार? याबाबत अधिकाऱ्यांकडून मौन बाळगले जात असल्याने परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे.



यापूर्वीही पवनचक्की कंपन्यांविरोधात धाराशिव जिल्ह्यात मोठी आंदोलने उभी राहिली होती. त्यामुळे विंड वर्ल्ड कंपनीने तात्काळ ठोस निर्णय घेतला नाही तर पुन्हा एकदा शेतकरी रस्त्यावर उतरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# विधान परिषद निवडणुकीत रंगत वाढली

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ मे -**

राज्यातील १७ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर धाराशिव-बीड-लातूर मतदारसंघातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. १८ जून रोजी होणाऱ्या या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये चुरशीची लढत होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. महायुतीकडून भाजपच्या वाट्याला ही जागा जाण्याची शक्यता असून माजी आमदार बसवराज पाटील, दत्ताभाऊ कुलकर्णी, अर्चना पाटील-चाकूरकर आणि नितीन काळे यांच्या नावांची चर्चा आहे. तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे माजी आमदार धीरज देशमुख आणि अशोक जगदाळे यांची नावे आघाडीवर आहेत. २०१८ च्या निवडणुकीत भाजपचे सुरेश धस यांनी अपक्ष उमेदवार अशोक जगदाळे यांचा ७२ मतांनी पराभव केला होता. सध्याच्या संख्याबळानुसार महायुतीकडे ५३७ तर महाविकास आघाडीकडे २४१ सदस्यांचे पाठबळ असल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, अशोक जगदाळे यांनी पुन्हा निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली असून काँग्रेसकडून उमेदवारी मिळाल्यास रिंगणात उतरणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

### डिझेल तुटवड्यामुळे शेतीकामे खोळंबली; शेतकरी चिंतेत

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२४ मे -**

इराण-अमेरिका-इस्राईल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या इंधन तुटवड्याची झळ आता ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना बसू लागली आहे.

पावसाळा तोंडावर आला असून शेतकरी पूर्वमशागतीच्या कामात व्यस्त असतानाच डिझेल टंचाईमुळे शेतीची कामे अडचणीत आली आहेत. नांगरणी, मोघडणी, कुळवणी यांसारखी बहुतांश शेतीकामे ट्रॅक्टरच्या सहाय्याने केली जात असल्याने डिझेलअभावी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा पुरवठा कमी झाल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून तासन्तास प्रतीक्षा करूनही अनेकांना रिकाम्या हाताने परतावे लागत आहे.

डिझेल तुटवडा कायम राहिल्यास खरीप हंगामाच्या तयारीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# तुळजाभवानी दर्शनासाठी लाखोंची गर्दी; तुळजापूरनगरीत भक्तिमय वातावरणात



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर दि.२४ मे -**

उन्हाळी सुट्ट्या, शनिवार-रविवारची जोड तसेच सलग सार्वजनिक सुट्ट्यांचा लाभ घेत राज्यासह कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि विविध राज्यांतून लाखो भाविकांनी श्री तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे. त्यामुळे संपूर्ण तुळजापूर नगरी भक्तिमय वातावरणाने फुलून गेली असून मंदिर परिसरात दिवसभर भाविकांची प्रचंड वर्दळ पाहायला मिळत आहे.

पहाटेच्या आरतीपासूनच दर्शन रांगा मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारापासून बाहेरील मार्गांपर्यंत पोहोचल्या होत्या. अनेक भाविकांनी रात्रीपासूनच दर्शनासाठी रांगेत थांबून आई तुळजाभवानीचे दर्शन घेतले.

जय भवानी... जय तुळजाभवानी... च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता मंदिर संस्थान प्रशासन, पोलीस विभाग आणि नगरपालिकेकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे. गर्दी नियंत्रणासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून मंदिर परिसरात सीसीटीव्हीच्या माध्यमातून सतत नजर ठेवण्यात येत आहे.

महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह आलेल्या भाविकांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांना सुरळीत दर्शन मिळावे यासाठी बॅरिकेड्स उभारण्यात आले असून शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक शाखेकडून विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत.

भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे तुळजापूरमधील हॉटेल, लॉज, भोजनालये, प्रसाद विक्रेते, फुलविक्रेते तसेच पूजा साहित्य विक्रेत्यांच्या व्यवसायालाही मोठी चालना मिळाली आहे. बाजारपेठेत दिवसभर खरेदीसाठी गर्दी होत असून व्यापाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.



काही भाविकांनी, आई तुळजाभवानीच्या दर्शनासाठी कितीही गर्दी असली तरी मनाला वेगळे समाधान मिळते. आईच्या दर्शनाने सर्व थकवा दूर होतो, अशी भावना व्यक्त केली.

रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांची रांग कायम असल्याने तुळजापूर नगरीत यात्रेसारखे वातावरण निर्माण झाले आहे.

# २०११ पूर्वीच्या निवासी अतिक्रमणांना दिलासा; नगर परिषद कळंबकडून नियमितीकरण मोहिमेला वेग

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२४ मे -**

राज्य शासनाने २०११ पूर्वीच्या निवासी अतिक्रमणांना नियमित करण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी नगर परिषद कळंब कडून सुरू करण्यात आली असून त्यामुळे शहरातील शेकडो कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना आता अधिकृत मालकी हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे शहरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडून नगर परिषद प्रशासनाचे स्वागत करण्यात येत आहे.



कळंब शहरातील बसस्थानकाच्या पाठीमागील परिसर, सरकारी दवाखान्यामागील भाग, कल्पना नगर पारधी वस्ती, जुने पोलीस स्टेशन समोरील परिसर, कळंब कन्या शाळेसमोरील भाग तसेच इतर अनेक वस्त्यांमधील रहिवाशांना या निर्णयाचा थेट लाभ होणार आहे. अनेक वर्षांपासून नागरिक अतिक्रमणाच्या भीतीत राहत होते.

मात्र शासनाच्या नव्या धोरणामुळे त्यांना आता कायदेशीर संरक्षण आणि मालकी हक्क मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी नगर परिषद कळंबच्या अध्यक्षा सुनंदा शिवाजी कापसे यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने विशेष मोहीम सुरू केली आहे. नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांनी सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा केला. शहरातील विविध भागांना भेटी देऊन त्यांनी अतिक्रमणधारक नागरिकांशी संवाद साधला आणि नियमितीकरण प्रक्रियेबाबत माहिती दिली. त्यांच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आमचे आजोबा-पंजोबा पूर्वीपासून येथे राहत आहेत. त्यामुळे आम्ही ही जागा सोडू शकत नाही. शासनाने आमच्या कुटुंबीयांचा विचार करून आम्हाला आमच्या हक्काचे घर द्यावे, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. नियमितीकरण प्रक्रियेची माहिती देत नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या निर्णयामुळे भविष्यात स्थैर्य मिळणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. तसेच शासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नगर परिषद कर्मचाऱ्यांनी आवश्यक ते मार्गदर्शन करून सहकार्य केल्याचे नगराध्यक्षा सुनंदा शिवाजी कापसे यांनी सांगितले.

मुख्याधिकारी मंजुषा गुरमे यांनी शासन निर्णयांचा सखोल अभ्यास करून नियमितीकरणासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्यास सुरुवात केली आहे.

संबंधित लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रे जमा करण्याची कामे वेगाने सुरू असून नगर परिषद कर्मचारी नागरिकांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करत आहेत. अर्ज प्रक्रियेमध्ये येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठीही विशेष मदत करण्यात येत आहे.

यासंदर्भात बोलताना नगराध्यक्षा सुनंदा शिवाजी कापसे यांनी सांगितले की, हा निर्णय नगर परिषद कळंबच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. सर्वसामान्य कुटुंबांना याचा प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे.

नगर परिषद प्रशासनाने पात्र नागरिकांना आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याचे आवाहन केले आहे.

शासन नियमांनुसार पात्र लाभार्थ्यांना नियमितीकरणाचा लाभ दिला जाणार असून कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.